म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
वा. क्र. १९

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

संग्रहालय क्रमांक ११५

लेखक

सन १८

पुस्तकाचें नांव रिचर्ड कावडेन यांचे चरित्र

११५

चरित्र

सं.क्र. १८५८

अनु.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

सा.क्र. १८५८, ~~६०~~ नवीन

# रिचर्ड कावूडेन याचें चरित्र.

## भाग पहिला,

### पूर्ववय.

हांपशायरच्या सरहद्दीपासून थोड्याच मैलावर वेस्टससेक्सच्या एका कोपऱ्यांत हेशॉट नामक खेडें आहे तेथें डनफर्ड नांवाच्या शेतवाड्यांत तारिख ३ जून १८०४ इसवी रोजीं कावूडेन कुळांत आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला. अकरा मुलांपैकीं हा चवथा होता. कावूडेन यांचें घराणें मिडहर्स्ट येथें शेतगाती करून बरेंच डगडगीत असे. १४ व्या शतकापासून यांची वस्ती याच प्रांतांत होती. तथापि गेल्या पांचशें वर्षांत ह्या घराण्यावर लक्ष्मीचा विशेष अनुग्रह कधींच झाला नव्हता. आमच्या नायकाच्या आजाचें नांव रिचर्ड कावूडेनच होतें. तो माल्ट नामक पदार्थ तयार करणारा शेतकरी असून बरींच वर्षे मिडहर्स्टपुरांत बेलीफचें काम करीत होता. सन १८०९ मध्यें त्यास देवाज्ञा झाली. त्यानें आपल्या मागें अगदींच बेताबेताची जिंदगी ठेवली होती. त्यास एकच मुलगा. त्याचें नांव वुइल्यम कावूडेन. डनफर्ड विकून तो मिडहर्स्टच्या सरहद्दीवरील एका शेतांत रहावयास गेला. हा स्वभावानें गरीब व मायाळू होता पण यास कामाचा वकूब बिलकूल नसे. अतिशय साधा, भोळसर व प्रामाणिक असल्यामुळें सर्व जग आपल्या सारखेंच इमानी व सच्चा आहे असें त्यास वाटे. तो बोलतां बोलतां फसला जाई. आपल्या हातांतून पळून चाललेली मालमिळकत फिरून मिळविण्याचा जोम त्याच्या आंगांत मुळींच नसल्यामुळें लक्ष्मीबाईच्या ज्येष्ट भगिनीनें यांच्या येथें आपलें ठाणें कायमचें दिलें. त्याची बायको जात्या हुशार, समजूतदार व तारतम्यवती असून मनाची खंबीर होती, पण असले भागुबाई यजमान असल्यावर बायकोचें शहाणपण कितीसें उपयोगी पडणार! या वेळचे दिवस पाहिले तर शेतकऱ्यास फारच चांगले होते. नुकतीच आटपलेली लढाई व

उपयोग होण्यास अवकाश मिळाला; व त्याच गुणांनीं तो पुढें लोकांचीं मनें आकर्षणारा बडा मुत्सद्दी झाला. शिवाय त्यास त्या कामांत विशेष आनंद वाटे त्याचें कारण हें कीं जगाची माहिती मिळविण्याची त्याची जी बळकट इच्छा असे ती पूर्ण होण्याचा संभव येथें पुष्कळ होता. खरें आणि उपयोगीं असें ज्ञान मिळविण्याची व तें समजून घेण्याची त्याच्यासारखी अनावर इच्छा दुसऱ्या कोणाएकामध्यें दिसून येत नाहीं असें पुढील कालांत प्रसिद्धीस आलेले त्याचे मित्र ह्मणतात. कांहीं तरी वरवर ज्ञान मिळवून पोरकटपणानें ज्या त्या कामांत हात घालण्याचा जो कित्येकांस हावरेपणा असतो, किंवा कोष्टकें करून आंकडे मांडून त्यांतून नीरस असे सिद्धांत काढण्याची जी कित्येकांस होस वाटत असते त्यांपैकीं कोणताही प्रकार काब्डेन् साहेबाच्या संबंधानें नव्हता. नुसतीं पुस्तकें वाचण्याचा त्यास छंद नसे; कारण तो नेहमीं ह्मणे कीं ज्ञानास योग्य अशी गोष्ट त्यांत कोणी लिहीतच नाहीं. केवळ बुद्धीचे कल्पनातरंग वाढविण्याकरितां त्याची खटपट नसे. कांहीं सार्थ प्रमेयांचीं तत्वें व्यवस्थेनें एका जागीं करून अर्वाचीन समाजाची तात्विक कल्पना त्यानें ठरवून ठेविली होती त्याच्या समर्थनार्थ हें सर्व मिळविलेलें ज्ञान त्यानें एकवट करून जास्ती ज्ञान मिळवावें व तें सर्व एकजीवि करावें असा त्यानें विचार केला. गाडींत व व्यापाऱ्यांच्या दुकानांत मिळणारी माहिती जरी हलक्या दरजाची असे तरी ती भिन्न प्रकारची, ताजी आणि खऱ्या व्यवहारास उपयोगी पडणारी अशी असे. काब्डेनच्या कार्यकर्त्या स्वतंत्र बुद्धीस असली माहिती फार फायदेशीर होई. त्याच्या आदरशील दृष्टीखालून बारिकसारिक गोष्टी सुद्धां सुटून जात नसत. सुंदर देखाव्याकडे विशेष लक्ष न देतां समाजसंबंधीं महत्वाच्या गोष्टी तो २१ वर्षांचा असतांनाच पाहूं लागला. १८२५ सांत आयर्लंडांत फेरी करीत असतांना त्यास डब्लीन सोडल्याबरोबर असें वाटलें कीं आपण दारिद्र्य, अज्ञान आणि अन्यायपूर्ण अशा देशांतून चाललों आहों. आयर्लंडचे शेतकरी पाहून त्याचें अंतःकरण दुभंग झालें. "येथें मध्यम वर्गाचे लोक मुळींच नाहींत. कांहीं श्रीमंत व बाकीचे बहुतेक कंगाल, अशी स्थिति आहे. मनुष्यांस जोडा अगर पायमोजे घालण्याची चैन करण्याचा प्रसंग कधींच येत नाहीं. घरास कांच कोठेंही मिळावयाची नाहीं. एका खोलीशिवाय जास्ती जागा मिळण्याचा संभवच नाहीं, तीच बसण्याची व नि-

जण्याची जागा व तेथेंच त्यांच्या पशूंची व्यवस्था होते !!" ही आयर्लंडची दैन्यावस्था त्याच्या लक्षांत तेव्हांच आली.

१८२५ आणि १८२६ सालीं व्यापारास धक्का बसून जे अनर्थ झाले त्याचें अजून विस्मरण झालें नाहीं असे पुष्कळ लोक अजून हयात आहेत 'गाडीबरोबर नळ्याला यात्रा' या न्यायानें काब्डेनच्या यजमानांचा धंदा बसून त्यास नावडणारी बिनरोजगारी सुट्टी कांहीं दिवस घ्यावी लागली. वडिलांच्या गृहस्थितींचा जो पूर्वी मासला होता तोच कायम होता. चोहोंकडे आकाश अभ्रमय झाल्यावर यांच्याच घरावर कुठला सूर्याचा प्रकाश? तथापि संकटसमयीं एकत्र राहून त्यांनीं आपल्या उत्साहजनक आनंदी स्वभावानें आलेल्या दारिद्र्याचें विशेषसें दुःख मानलें नाहीं. तथापि त्यास वेस्टमिन्स्टर सोडून फार्नाम येथें जावें लागलें. त्यांच्या कुटुंबांतील सर्व माणसें घस सोसणारीं असल्यामुळें शेजाऱ्यापाजाऱ्यांस त्यांच्या जाण्याबद्दल पुष्कळ दुःख झालें.

इतक्यांत रिचर्ड यानें **पॉटींज व ग्राईस** यांच्या वखारींत नोकरी पत्करिली. पॉटींज यास काब्डेनच्या अत्यंत उपयुक्ततेबद्दलची माहिती होती म्हणून त्यानें त्यास नोकरीस ठेविलें व पुनः आमचा नायक मलमल व छिट यांचे नमुने घेऊन हिंडूं लागला. येथें त्यानें दोन वर्षें एकाग्रतेनें काम केलें. अग्निरथ नसणाऱ्या काळांत साधारणपणानें ४० मैलांचा रोजचा त्याचा फिरत असतां प्रवास होत असे.

१८२८ सांत त्याच धंद्यांतील दोन मित्रांसमवेत आपल्याच नांवावर धंदा सुरू करण्याची महत्वाची पहिली पायरी काब्डेन साहेब चढला. मांचेस्टर येथें जाऊन मोठमोठ्या छिटाचे कारखानदारांशीं, 'कमिशन' घेऊन माल विकण्याचा धंदा ठरविण्याचा त्यांचा बेत ठरला. हा धंदा चालण्यास लागणारें अर्धें अधिक भांडवल कर्जाऊच घेतलें. म्यांचेस्टर येथें त्याची कोणाचीही ओळख नव्हती. " तथापि **लंडन** येथें आमची मोठमोठ्यांकडे ओळखपाळख असल्यामुळें, **लंडन** येथील धंद्याच्या अत्यंत फायदेशीर शाखेचें आम्हांस उत्कृष्ट ज्ञान असल्यामुळें, व लोकप्रिय होणाऱ्या नमुन्यांची आम्हांस उत्तम पारख असल्यामुळें आम्हांस आमच्या बेतांत जय येईल अशी आमची खात्री होती. दोन वर्षांत **फोर्ट्स** आणि कंपनी यांचा ४० हजार पौंडांचा माल आमच्या नांवें बाकी

होता, आणि आमचे जामीन ह्मणजे आमचा इमानीपणा व व्यापारांतील माहिती! आणि आमची स्वतांची शिल्लक ह्मणजे एकेकाजवळ दोनशेंच पौंड!! काब्डेनचें नेहमीं ह्मणणें असें कीं "वर्तणूक, अनुभव, ओळखपाळख—मग पैशासंबंधानें ओळख दुसरीकडे नसेना—आपल्या धंद्याची माहिती, जीवनकलहांत तिचा उपयोग करून घेण्याचें सामर्थ्य या गुणांवरून शाहणे भांडवली लोक मनुष्याची पारख करितात तीं बरोबर आहे." धंदा कसा काय चालेल या उत्कट काळजीचा साधारण निरास दरसाल काब्डेन मंडळीपैकीं प्रत्येकास ८ शें पौंड नफा मिळणार या खात्रीनें नाहींसा झाला. आपल्या कुटुंबाचा समाचार घेण्याचा समय आल्यामुळें काब्डेन यास विशेषच आनंद झाला. वडील भावास त्यानें त्या वेळीं पत्र लिहिलें त्यांत पुढील वाक्य होतें. "आपल्या नेहमींच्या लहरी स्वभावानुसार देवानें अत्यंत कमी योग्यतेच्या धाकट्या भावाकडे ऐश्वर्यसुख चुकून केलें आहे, तथापि माझ्यावर जी त्याची मेहरनजर होईल त्यांतील अर्धा वांटा तुह्मी घेतलाच पाहिजे असा हट्ट मी धरून तुह्माला तो भाग दिला ह्मणजे त्याची चुकी आपण दुरुस्त केल्यासारखें नाहीं का होणार?" यांत शब्दगौरव नव्हता. खऱ्या व खोल इच्छेचे प्रदर्शक हे शब्द होते व काब्डेन यानें आमरणपर्यंत आपला वचनभंग केला नाहीं; व शेवटपर्यंत आपल्या भावाचा प्रतिपाळ केला ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

---

# भाग दुसरा

## व्यापारवृद्धि व मानसोन्नति.

हें पानीचें दुकान काढून फार दिवस झाले नाहीं तोंच काब्डेनचे हजारों नवीन बेत सुरू झाले. १८३१ मध्यें त्यानें आपला धंदा वाढवून आपलें छीट आपणच छापावें असा निश्चय केला. व्यापाराची संधीही आतां चांगलीच होती. आजपर्यंत शेंकडा पन्नास, कधीं कधीं शेंकडा १०० जकात छिटाच्या कापडावर असे. त्यामुळें १८२५।३०पर्यंत त्या व्यापा-

राची विशेष मंदाई होती. शेवटीं छिटाच्या व्यापाऱ्यांनीं पार्लमेंटमध्यें जागा मिळवून आपली तक्रार सांगण्याचा निश्चय केला; इतक्यांत त्यानीं आजवर केलेल्या संक्षोभनास यश येऊन छिटावरील जकात १८३१ मध्यें सुटली, व छिटाचा व्यापार दुप्पट वाढला. नंतर काब्डेनमंडळींनीं आपला धंदा साब्डेन येथें नेला. **फोर्ट आणि कंपनी** यांचा तेथें कारखाना होता तो विकत घेतला, आणि धंदा सुरू केला आमच्या चरित्रनायकानें मांचेस्टर शहर व तेथील उद्योग पाहिल्यावर त्यास आश्चर्य वाटलें. "खिशांत एक फुटकी कवडी नसतांना जर **लांकाशायर**मध्यें माझ्या अनुभवासह मला सोडला तर, तेवढ्या भांडवलावर लाखो रुपये कमाई करीन," असें या वेळेस तो ह्मणत असे. "संपत्ति मिळविण्याच्या कामांत आड येणारे विघ्नांवर जोरानें हल्ला करून त्यास पादाक्रांत करीनच करीन अशी प्रसिद्ध **नेपोलियन**सारखी माझी बालंबाल खातरजमा आहे," असा त्याचा जब्बर दम असे. "माझा सट्टा खातरीचा आहे, सध्यां फायदा होणार इतकेंच नाहीं, तर माझ्या अतिशय मोठ्या आकांक्षा कधीं तरी पुऱ्या होऊन माझीं अमर्याद अनुसंधानें सिद्धीस जाणार असें माझ्या मनांत घोळूं लागून मला झोंप येईनाशी झाली आहे. ही कशाची येवढी हरण काळजी? पैशाकरितां खास नव्हे. कारण त्याची विशेष फिकीर मला कधींच वाटत नाहीं. जर माझ्यावर अनेक विघ्नसमुदाय आले नाहींत तर माझा उदय झालाच पाहिजे." असे त्याचे या वेळचे लेख आहेत. पण काब्डेनवर पहिल्या पहिल्यांदा विघ्नपरंपरा फारच फिदा होती. १८२९ त फ्रेड्रिकनें लांकडाचा व्यापार सुरू केला. पण तो नीट चालेना. एक भाऊ व बहिण या संधीस देवलोकीं गेलीं. फ्रेड्रिकची प्रकृती बिघडली. भावाचा सर्व पैसा गेला. असा चोहोंकडून काब्डेन नाडला गेला होता तरी त्याचा धीर खचला नाहीं. त्यानें साब्डेन येथें लोककल्याणकर्तृत्वाच्या शकाचा पहिला 'श्रीगणेशा' सुरू केला. तेथें शाळा अगर दवालय कांहींच नव्हतें. मजूरदार वाटेल तेव्हां एक एक आठवडाभर सुटी घेऊन शहरांत जात आणि एक छदामही खिशांत न ठेवतां दारू पिऊन झिंगलेले परत फिरले तर मात्र त्यांस गांवीं येण्यास लाज वाटत नसे. ही आपली मजूरदार मंडळी सुधारण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें तेथें एक जोरदार व्याख्यान देऊन लोकांचें मन वळविलें, व सर्वांचें लक्ष विद्येकडे लागण्याकरितां मांचेस्टर येथील २०

लहान सुशिक्षित मुलांचें प्रदर्शन केलें: आपला पातीदार **जार्ज फास्टर** यास लिहितांना तो ह्मणतो "तुमचा हेतु फार चांगला आहे. चांगल्याचे बी-जारीपणानें चांगलें वाढत गेलें ह्मणजे पुढें त्याची विशेषशी काळजी घ्यावी लागत नाहीं. **वाईटाचें बीं रुजतच नाहीं. वाईट नाशक्षम आहे.** तेव्हां आपण साव्डेन येथें ज्ञानाचा प्रकाश पाडून तेथून सर्व परिस्थित देशावर उजेड पाडूंआणि तेथून लंडन शहरास दिपवून टाकूं. हें काम शिस्तवारीनें लोकां-समक्ष केलें ह्मणजे अर्थातच ते मदत करण्यास येतात. **काम कसें करावें हें माहीत नसल्यामळें पुष्कळ जनहितैषी लोकांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.**" ह्या शेवटच्या वाक्यांत काब्डेनच्या पुढील सार्वज-निक कृत्यांच्या सिद्धीची गुरुकिल्ली आहे. "ह्या जन्मफेरींत 'दम खाऊन आहे त्यांत तृप्ति माना' ह्या म्हणीप्रमाणें वागण्याचें माझ्या नशीबीं नाहीं.

'उत्सुक हृदयीं दमखाणें हें नरकवाससम होतें'

हें इंग्लंडांतील **एक प्रसिद्ध युवा कवी बायरनचें** वाक्य माझ्या संबंधानें अगदीं अक्षरश: सत्य आहे." पण ही त्याची मनाची अस्वस्थता निष्फल धांदलरूपानें कधींही बाहेर येत नसे. काम हातीं घेतलें असतां त्याच्या साधनक्रमांत काब्डेनची अत्यंत शहाणपणानें दम खाण्याची शक्ति दिसून येते. पैसा मिळविण्याचा धंदा करीत असतांनाही त्याची ज्ञान मिळविण्याची इच्छा अनावर होती. आपल्या नवीन कारखान्याच्या नवीन गडबडींतसुद्धां त्यानें ल्याटिन भाषेचा व उच्चप्रतीचे गणिताचा अभ्यास जारीनें सुरू ठेवला होता. त्यानें ह्याच वेळेस एक नाटक लिहिलें, पण त्याच्या व इंग्लंडच्या सुदैवानें तें कोणत्याही छापखानेवाल्यास चांगलें वाट-लें नाहीं; ह्मणून तो नाद सुटला, व देशास फायदा झाला. मांचेस्टर येथें स्थानिकस्वराज्य असावें याबद्दल १८३५मध्यें त्यानें तेथील वर्तमानपत्रांत पहिल्यानें लेख लिहिला व याच वर्षी 'इंग्लंड, आयर्लंड व अमेरिका' या नांवाचें एक छोटेखानी पुस्तक लिहिलें. महत्कृत्यांच्या समुद्रामध्यें आपली नौका ढकलण्याच्या आधीं त्याच्या बुद्धिशक्तीचा उद्योग वर लिहिल्याप्र-माणें अव्याहत चालला होता. १८३७मध्यें मांचेस्टर येथें रहावयास आल्याव-र लिहिलेल्या वरील पुस्तकावरून असें दिसून येतें कीं "**स्टर्नेटिस**ची म-नोदारता, †**ल सेज**चा आनंदी स्वभाव, ‡स्पेन्सरची मधुरता, बर्कचें

* 'डानक्विझोट' नामक अत्यंत सुरस कादंबरीचा, कर्ता † 'जिल्ब्लास' चा कर्ता ‡ 'फेरीक्वीन' चा कर्ता.

भव्य बुद्धिवैभव यांची ओळख करून घेऊन ( ही पुस्तकें वाचून ) युरोपाचा प्राचीन इतिहास व अर्वाचीन कालांतील प्रचलित असणारे सर्वगामी शक्तिसंघाची त्यानें उत्कृष्ट माहिती मिळवून ठेविली होती. तो जें काय वाची किंवा त्यास इतरांकडून जी काय माहिती मिळे त्या सर्वांचा तो आपल्या प्रधान विषयाचें स्पष्टीकरण करण्याच्या कामीं उपयोग करी. यावरून 'तो आपल्या ज्ञानसीमेपर्यंत बोलतो' असें ह्मणत असत. असो; तो १८३३ मध्यें आपल्या धंद्याच्या संबंधानें पारिस शहरीं गेला. पुढील सालीं स्वित्सर्लंडास गेला, तेथील पर्वत व अरण्यें पाहून त्यास समाधानकारक आश्चर्य वाटलें. " सृष्टीमध्यें प्रगल्भ अशा दोन गोष्टी आहेत. एक स्थिर व दुसरी चल आहे. आल्प्स पर्वताचा देखावा हें स्थिर प्रागल्भ्य आणि नायगाराचा धबधबा हें चल प्रागल्भ्य." सृष्टीवैभव पाहण्यांत त्यास जरी आनंद वाटे तरी त्यास मनुष्यचरित्र ऐकून व देशांतील संस्थांची माहिती घेऊन विशेष आनंद होत असे. शेवटीं त्याच्या समाजविषयकविश्वासपूर्ण व अत्युत्साही मनाचा कल अमेरिकेकडे वळला. धंदा चांगला होता व काब्डेन इंग्लंडांतच राहिल्यास फायदेशीर होईल असें जरी त्याच्या भागीदारांस वाटत होतें तथापि त्यांनीं आपल्या उलाढाली मित्रास अमेरिकेस जाण्याची परवानगी दिली. १८३५ मध्यें आपलें प्रथम छोटेसानी पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर तिकडे जाण्याची त्यानें तयारी केली. आणखी एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे ती अशी कीं त्याचा बाप १८३३ मध्यें गतप्राण झाला. फेड्रिक, हा काब्डेन जवळ राहूं लागल्यावर म्हातारा लंडन येथें मुलींजवळ राहण्यास गेला. येथें त्यास चैन पडेना व जन्मभूमीप्रत जावें अशी उत्कट इच्छा प्राप्त होऊन दिवसानुदिवस तो खंगूं लागला. ह्वाक्सफोर्ड येथें त्यास नेलें पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मुलगा चांगले पैसे मिळवीत आहे हें ऐकून व आपल्या मुलाबाळांचें आपल्यावर अविनाशि प्रेम आहे असें पाहून त्यास कांहीं बरें वाटण्याचा प्रसंग आला खरा, पण या मृत्युलोकाच्या विशाल विपरीत घटनेमध्यें नित्यशः घडणारी अशी अत्यंत कटुतम गोष्ट ही आहे कीं तो आनंद प्राप्त होण्यापूर्वींच मुलाचा विजय शुद्धानंदानें पाहूं इच्छिणाऱ्या वयोवृद्ध झालेल्या नेत्रांवर झांकण पडतें !!

# भाग तिसरा.

## पूर्व व पश्चिम दिशेकडील प्रवास.

"हा देशाचा रमणीय करण्याची संपत्ति आणि व्यापार यांकडून होईल तितकी खटपट हजारों वर्षें झाल्यावर या न्यूयार्क शहरच्या आंतील उपसागरास किती अवर्णनीय शोभा येईल ! हें अमेरिकेंत पाऊल ठेवल्याबरोबर **काब्डेन**चें पहिलें वाक्य होतें. त्यानें आपल्या भावास पत्र लिहिलें त्यांत "मानवपरिपूर्णत्वाच्या नाहींत तर मानसोन्नतीच्या तरी ज्या कल्पना आहेत व ज्या मला नेहमीं सुखमूलक आहेत त्यांपैकीं कांहीं या नव्या पृथ्वीमध्यें खचीत सफल होणार," असा उद्गार काढला होता. प्रवाशास अवश्य लागणारें विनमोल युक्तिबाहुल्य, धिमेपणा, आणि जिगजिग झाली असतांही मनोभंग न होणें हे गुण त्याच्यामध्यें भरपूर असत. त्यामुळें त्यास कधींही त्रास झाला नाहीं. ते लोक राजकीय विषयांची वाटाघाट करीत नाहींत, त्या लोकांस निर्मल आणि निष्कलंक अशी आपली स्तुति फार आवडते, आपल्या मातृनगरीची ते फार निंदा करितात वगैरे दोष त्याच्या बारीक नजरेस तेव्हांच आले. जेथें प्रसंग आला तेथें त्यांस सत्यानें ह्मणून पाडण्यास त्यानें कधींही कमी केलें नाहीं. एकदां बोलतांना त्यानें साफ सांगितलें कीं "कोणत्याही राष्ट्राची पारख करण्यास पन्नास वर्षें फारच थोडीं आहेत. लढाया, दुष्काळ इत्यादि अनेक संकटें, संपत्ति वगैरे गोष्टी, देशाच्या खंबीरतेची परीक्षा करणारीं साधनें होत. आज ७०० वर्षें इंग्लंड देश स्वतंत्र, संपत्ति व सुधारणा इत्यादिमध्यें अप्रतिहत पुढें चालला आहे व सर्व जगास खऱ्या तत्वज्ञानाचें व खऱ्या धर्माचें शिक्षण देत आहे. व आजपर्यंत एकदांसुद्धां शत्रूच्या हस्तगत झाला नाहीं. याप्रमाणें ६०० वर्षांनीं तुमच्या वंशजांस जर ह्मणतां आलें तर मात्र तुह्मीं स्तुतीस पात्र व्हाल." नायगरा नदीचा धबधबा पाहून त्यास फार गंमत वाटली. "अश्वनालांतून खालीं पडण्याच्या अगोदर एक दोन मैल पर्यंत पाण्याचे लोट कल्लोळ करीत गडबडा लोळत आणि फुसकारे टाकीत येतात त्यावरून असा भास होतो कीं पुढें प्राप्त होणारा कडेलोट ध्यानांत येऊन त्यास अत्यंत दुःख झालें आहे. पडणारें पाणी फेसाच्या माळाच आहेत किंवा प्रवाही धूमसमूह आहे अशी भ्रांति होते, इतक्यांत एखादा फेनसमुच्चय

आडव्या आलेल्या खडकावर हापटल्या मुळें शतधा चिंधड्या होऊन पुढें खालीं पडण्याच्या भयानें वरती तुषार रूपानें जावयास लागतो तों सदै-व अधोधो जाणाऱ्या लोटामध्यें सांपडून कोणीकडे नाहींसा होतो !! वर पाण्याची निरनिराळी खोली असल्या मुळें कांहीं ठिकाणीं खालीं पडणाऱ्या पाण्याचें अर्ध्या वाटेवर येई पर्यंत स्वरूप बदलत नाहीं व कांहीं शुद्ध स्वर्गंगेंतील तारकसमूहाचा वेश घेऊन खालीं येतें यामुळें मोठी मजा वा-टते." "टेबल नांवाच्या खडकावरून आह्मीं इंद्रधनुष्याचें पूर्ण वर्तुल पाहिलें. येथील स्नानस्थानांत उन्हाळयांत रहावें असें वारंवार मनांत येई."अमेरिकें-तील विशाल सरोवरें, भव्य नद्या, प्रचंड अरण्यें पाहून त्यास भास झाला कीं ईश्वरानें पुन्हा नीट विचार करून हें दुसरें जग रमणीय वस्तूंनीं निर्माण केलें असावें. मामुथ नामक प्रचंड हत्ती उत्पन्न करणाऱ्या या भूमीमध्यें मनुष्य वर्गाचा खुजटपणा व शक्तिहीनता पाहून आणि सशक्त,टवटवीत आणि सुंदर अशा स्त्रियांचा अभाव पाहून त्यास वाईट वाटलें. परंतु " त्यांची बुद्धि, इमान व उचित अहंमन्यता हे गुण अलौकिक आहेत. या चंचल आणि स्वोत्साही जातीमध्यें रहाण्यास चपलतादेवीनें स्थान शोधून काढिलें तें योग्य आहे. त्वरा, त्वरा, त्वरा, हीं अक्षरें जिकडे तिकडे प्रत्यक्षत्वानें दिसतात. यांच्यापेक्षां जास्ती वेळ वांचविणारे लोक निर्माण होणार असतील तर त्यांस खाणें, पिणें आणि निद्रा हें वर्जच असलें पाहिजे !! सारांश यांच्यापेक्षां जास्ती भरभराटीस पावणारे लोक निर्माण होणेंच कठीण आहे. माझी येथें राहण्याची सोय असती तर जन्मभर येथेंच मोठ्या खुषीनें कालक्रमणा केली असती. "

आगस्ट महिन्यांत तो इंग्लंडास सुखरूप पोंचला. वाटेनें येतांना तो आपला वेळ गलबतावर असणारे सहप्रवाशांच्या रीतिभाती पाहून त्याव-रून त्यांचें वर्गीकरण करण्यांत घालवी. घरीं आल्यावर १५ महिनेंपर्यंत राहिलेले कामाचा फडशा करून व्यापार वाढविण्याचे नवीन बेत करूं लागला. परंतु सार्वजनिक कामें त्यास हळू हळू दुसरीकडे नेण्यास जबर मोह घालीत होतीं. सार्वजनिकसभेंत त्यानें पहिलें भाषण केलें त्यांत घाबरून जाऊन तो अतिशय गोंधळला व मध्येंच त्यास आपलें भाषण थांबवावें लागलें. व शेवटीं अध्यक्षास त्याच्या तर्फेनें माफी मागावी लागली. मागें 'इंग्लंड,आयर्लंड व अमेरिका' असें पुस्तक छापलें होतें त्याच्या एक वर्षांत ३ आवृत्ति निघाल्या होत्या; १८३६ सांत पांचवी आवृत्ति त्यानें

काढिली. याच वर्षी 'रशिया' नामक पुस्तक छापलें. कामाच्या अशा दगदगीमुळें त्याची प्रकृति बिघडली व वैद्यांनीं त्यास हवा बदलण्याकरितां इंग्लंडाच्या बाहेर जावयास सांगितलें. व्यापारास तेजी होती यामुळें "मुख्य कमानीस" (काब्डेनास) तेथेंच राहण्याची विशेष गरज नव्हती. तो युरोपांत फिरण्यास निघाला. तो पत्रें लिहिणारा मोठा खंबीर होता; कसली अडचण, कसली घाई असली तरी वेळांतवेळ करून तो पत्रें लिही. व्यापाराच्या माहितीनें त्याचीं या वेळेचीं पत्रें भरलेलीं आहेत. कित्येक निव्वळ इतर लोकांच्या गमतीविनोदानें भरलेलीं आहेत. आयात व निर्गत मालाची चौकशी करीत असतांनाही उडया मारणें, वजन फेंकणें, पोंहणें इत्यादिक खेळ खेळण्यास त्यास वेळ सांपडे. तुर्क लोकांविषयीं लिहितांना त्यानें त्यांच्या स्वस्थ स्वभावाविषयीं गमतीदार गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांतील एक येथें देतों "कैरो येथें एकदां खिडकींतून बाहेर बघत होतों. तेथें खालींच तीन गृहस्थ एका चटईवर तंबाखू ओढीत आसनमांड्या घालून बसले होते. तिकडून वाळूचीं ओझीं नेणारें गाढव हकणारा एक पोरगा त्यास पळवीत पळवीत तेथें आला तों हे तंबाखूपी जेथें बसले होते तेथेंच तें गाढव पडून सर्व वाळु सांडली ती सर्व त्यांच्या अंगावर उडाली. पोरानें फांवडें घेऊन ती गोळा केली आणि निघून गेला. पण चमत्कार हा कीं त्या पोराची व या तिघांची एकदां सुद्धां दृष्टादृष्ट झाली नाहीं का तें तेथून हालले नाहींत. दोन तासांनीं मी त्या रस्त्यानें गेलों तेव्हां ते जसेच्या तसे बसले होते व आजूनही त्यांच्या आजूबाजूस सांडलेली वाळु जशीच्या तशीच होती!"

एप्रील २१ला तो घरीं परत आला. या प्रवासांत त्यानें अनेक प्रकारची राजकीय माहिती मिळविली आणि त्यानें केवळ आपल्या सहजन्य तारतम्यज्ञानाच्या आणि विचाराच्या साहाय्यानें राष्ट्रीयवर्तनाचीं प्रचलित तत्त्वें वाईट ह्मणून ठरविलीं होतीं त्यांच्या दुष्टत्वाचा सजीव परिचय करून घेतला.

---

## भाग चवथा

### त्याचीं दोन लघु पुस्तकें.

पार्लमेंट समाजाच्या संबंधानें जे निरनिराळे प्रश्न येत होते त्यांचा

परस्पर संबंध ध्यानांत ठेवून तात्विक विचार करण्याचें काल्डेन यास मनः- सामर्थ्य आलें होतें. १८३२ मध्यें सुधारणेचा कायदा पसार करण्या- करितां देशामध्यें संक्षोभन होऊन लोकांस ज्या महदाशा उत्पन्न झाल्या होत्या त्यां लिबरलपक्ष प्रबल असतांही पुऱ्या झाल्या नाहींत. आणि हें ही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, १८४० पासून १८७० पर्यंत जीवंत असणाऱ्या पिढीचे विचार व मनोविकार हे, १८३२–१८४० पर्यंत जी ताजी आणि स्वातंत्र्यमूलक कर्तुमिच्छा विचारी लोकांनीं प्रगट केली होती त्यावरूनच निर्माण झाले होते. याच वेळेस भूतदया, परोपकार, सुधारण्याची इच्छा यांची–सारांश सामाजिक भावांची–लाट निराग्रहानें व उदारमनस्कतेनें विचार करणाऱ्या मनुष्यांवर येऊन आदळली होती. राजकीयविचार मूर्तिमंत चोहोंकडे स्वैरगतीनें संचार करीत होता. जास्त सुखकर मानसोन्नतीनें समाजरचना बळकट करून कर्तव्यताशक्ती- च्या नव्या नव्या साधनांनीं ती पुष्ट करावी अशी लोकांमध्यें प्रबल इच्छा उत्पन्न झाली होती. समाजाचा पुनर्जन्म करावा अशी धर्माचार्यांचीच इच्छा होती असें नाहीं तर कारखानदारांच्याही प्रांतांत तीच मनीषा प्रबलत्वानें वास करीत होती. उन्नत होण्याच्या इच्छेस या आठ दहा वर्षांत जो हा ऊत आला होता त्यामुळेंच श्रीमंत लोकांचें तत्वज्ञानाचा अर्थप्रचुर शब्दांनीं निरस्कार करणारा *कार्लाइल व करुण रसानें परि- प्लुत अशा कादंबऱ्यांनीं गरीब लोकांची दैना वर्णन करणारा †डिकेन्स यांचा त्यावेळीं उद्भव झाला.

सार्वजनिक संसारयात्रेमध्यें निराळ्या मूळगोष्टींची योजना केली पाहिजे आणि लोकवर्तनास निराळी इयत्ता ठरविली पाहिजे अशी वेळ आली आहे, अशी काल्डेनची खातरी झाली होती. काल्डेन, ‡आर्नोल्ड व §मिल्ल यांच्या कर्तुमिच्छेची मीमांसा पाहिली असतां असें निघतें कीं व- रिष्ट प्रतीच्या समाजव्यवस्थेचा पाया घालण्याची त्यांस आशा होती आणि उच्च प्रतीच्या सुखाचा चोहोंकडे प्रसार करण्याचा त्यांचा मानस होता.

---

* एक सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार. याचा ग्रंथ समुद्र अगाध असून त्यांत अनेक विचाररत्नें बुडवून ठेविलीं आहेत.

† एक लोकविश्रुत इंग्रजी कादंबरीकार. याचे ग्रंथ वाचून ज्याचे विचार फिरले नाहींत असा समंजस पुरुष विरळाच. ‡रोम शहराचा इतिहासकार.

§ इंग्लंडातील एक मोठा तत्ववेत्ता.

शिवाय; आपली शरीररचना विश्वरचनेशीं संबद्ध असून सर्वसाधारण व अप्रतिहतनियमांनीं बांधली गेली आहे; मनाची व स्वभाववर्तनाचं आरोग्यता शरीराच्या स्थितीवर अवलंबून आहे; प्राचीन मताप्रमाणें शरीराची अज्ञानानें अगर उदासीनतेनें अनास्था केली असतां सुखास व मनःक्रियेस अत्यंत विरोध प्राप्त होतो; आणि शरीरारोग्य हें नीतिवर्धनाचें मुख्य साधन आहे अशा तत्वांचें प्रणयन ज्यांत आहे असें सन १८२८ मध्यें **जार्ज कोंबी** यानें प्रसिद्ध केलेलें लोकमान्य पुस्तक वाचनानें **काब्डेन** यास पुष्कळ लाभ झाला. पौराणिक मतांच्या चक्रांतून सुटण्याविषयीं आतुर झालेल्या, दुराग्रहाच्या मेघःश्याम आकाशांत कोठें उजेड दिसेल काय या इच्छापुर्तीची जपमाळ घेऊन बसलेल्या, व मानवकर्तृत्वाच्या योगानेंच दुष्कर गोष्टी साध्य होणार याविषयीं खात्री झालेल्या आमच्या नायकास हें पुस्तक वाचून मोठी हुशारी प्राप्त झाली व मानवी स्वभाव आणि हेतु हे शरीरघटनेकडे लक्ष दिल्यानें मात्र सुधारणें शक्य आहे असें ध्यानांत आल्याबरोबर सामाजिक संस्था सन्मार्गाकडे वळवून घेण्यास व सत्कृत्यें करण्यास आपल्यास अनंत अवकाश सांपडेल हें लक्षांत येऊन त्यास अपरिमित आनंद झाला.

मुलांच्या शिक्षणक्रमामध्यें, वेड्यांशीं वर्तन करतांना, व अपराध्यास शासन करतांना पुराणप्रसिद्ध परंतु अत्यंत निरुपयोगी अशा दांडगाईच्या, कठोरतेच्या आणि क्रूरजुलुमाच्या रीति अस्तंगत होऊन त्याबद्दल योग्य नेमस्तपणा व हितकारी दया, आणि मनाची शांतता हे गुण ज्या सार्वत्रिक इच्छेच्या योगानें प्रबळ झाले त्याच इच्छासामर्थ्यानें उदित झालेल्या ' रशिआ,' व ' इंग्लंड, आयर्लंड व अमेरिका ' नामक ह्या आपल्या दोन पुस्तकांत निर्बुद्ध पशूंप्रमाणें रक्तपात न करितां श्रेष्ठतर आणि विशेष शक्तिमान् अशा बुद्धिप्रेरित आणि नीतियुक्त सामोपचारानें कोणत्याही मतांतराचा निरास करावा असें **काब्डेन**नें अत्यंत आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें आहे. **जर्मनी**, **फ्रान्स**, **रशिआ** यांचें कांहीं असो, परंतु **इंग्लंडानें** ही नवी पद्धत स्वीकारल्यास त्याचें अतिशय हित होणार आहे हा ह्या पुस्तकांतील सारांश आहे. त्यानें पुस्तक लिहिलें तें इंग्लंडच्या लोकांकरितां. ब्रिटिश लोकांचें राष्ट्रीय अस्तित्व आणि राष्ट्रेतरांशीं अन्योन्यसंबंध ह्या विषयांतील निःसंशय प्रत्यक्ष प्रमाणें घेऊन त्यानें असें स्पष्ट करून दाखविलें कीं "केवळ नीतिवर्चस्वच

नव्हे पण राष्ट्रसंपत्ति, अंतःसुधारणा, व बाह्यसंरक्षण करण्याची देशाची शक्ति, ह्या सर्वच गोष्टी 'परराज्याशीं व्यवहार करतांना अंधःकारमूलक रुणकारस्थानी पद्धति सोडून द्या' असें मोठ्या उच्चस्वरानें आरडून सांगत आहेत." सारांश तो गुलाबी छाती पांघरून अमर्याद सिद्धांत ठोकून देणारा संन्यासी नव्हता. त्याची भूतदया वास्तविक होती. " परकीय सरकारांस आपआपला कारभार करण्याची परवानगी देऊन आपण आपल्या विस्तीर्ण राज्याच्या अडचणींचा व लोकस्थितीचा विचार करूं लागलों तर दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास न साधणारें, उदारनीतीचें उदाहरण आपण घालून दिलेंसें होईल व त्यांत आपलेंही स्वहित उत्कृष्ट रीतीनें साधलें असें होईल. " असा या पुस्तकांत त्यानें उपदेश केला; व हाच उपदेश प्रत्येक राष्ट्रास हितावह आहे.

त्याच्या तरतरीत राजकारणी बुद्धीस सध्यांच्या वेळेचें इंगित समजलें होतें. " लोकस्थितीस अनुरूप व सुधारणेस योग्य, अशी परस्थिति उत्पन्न करण्याच्या हेतुनें आपल्या राज्यांतील अंतःस्थितीचा जीर्णोद्धार करण्याची व पृथ्वीवर जे अनेक फेरफार झाले आहेत त्यांस योग्य अशी परराज्याशीं संबंध ठेवण्याची वेळा प्राप्त झाली आहे. " असें त्यानें हजारों वेळां ओरडून सांगितलें आहे.वाफेच्या जादूनें निर्माण झालेले कारखाने, खाणी, मुशी इत्यादि धंद्यांमध्यें पोट भरण्यास उत्तरेकडे जाणारी लोकसंख्या अन्य तऱ्हेच्या कायदेपद्धतीचा आग्रह धरील हें त्याचे लक्षांत केव्हांच येऊन चुकलें होतें. इंग्लंड हा कारखान्यांचा मध्यभाग व्हावा अशी इच्छा त्यानें या पुस्तकांत प्रगट केली. अनिर्णायक कारणांनीं प्राप्त होणाऱ्या औद्योगिक पंथाशीं, परकीयांचा बहिष्कार, व्यापाराचा मक्ता व बंदी, कायदे करण्यांत जमिनीच्या इनामदारांचें प्राबल्य इत्यादि गोष्टींचा अत्यंत विरोध आहे अशी त्याची ओरड एव्हांपासूनच सुरू झाली. लोकांमध्यें संपत्तिविपुलता असली ह्मणजे मानसोन्नतीला व नीतिनियमांना बळकट पाया मिळतो येवढेंच नाहीं तर स्वतंत्र मनुष्यांच्या आधुनिक व बहुसंख्याक समाजामध्यें चिरंजीवि होऊं पाहणारी अव्यवस्था व अनर्थमूलक क्रांति यांचें आगमन होऊं न देणारा असा हा एक खंबीर व अभेद्य तटच होऊन राहतो, असें त्याचें मत होतें तें अगदीं बरोबर व सशास्त्र होतें. 'इंग्लंड, आयर्लंड व अमेरिका' या पुस्तकांत पुढील विचार आहेतः—" अॅटलांटिकच्या

दुसऱ्या किनाऱ्यावर एक राष्ट्र उत्पन्न होत आहे व तें अनेक कारणांनीं थोड्याच दिवसांत आमच्या कारखान्याशीं खरी प्रतिस्पर्धा करूं लागेल.त्याच्याशीं सामना करण्यास इंग्रजी कारखानदारांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या दोन जबरदस्त अडचणी आहेत. पहिली आमची संरक्षकपद्धति व मर्यादित व्यापार, दुसरी परकीयराष्ट्रांत ढवळाढवळ करण्याची आमची अनावर हौस. दुसरीच्या योगानें आमच्या डोक्यावर कर व कर्ज लादलें जात आहे व पहिलीच्या योगानें आह्मांस आमच्या उन्नतीमध्यें मदत करणाऱ्या साधनांचा पुरा उपयोग होत नाहीं. अन्यायपूर्ण पद्धतीनें काबीज केलेल्या व जबरीनें राखून ठेविलेल्या आयर्लंडाचें लोढणें आमच्या गळ्याला तात लावून राहिलें आहे तें निराळेंच!" 'रशिआ' नामक पुस्तकांत रशिआ व टर्की यांची तुलना केली आहे. व शेवटीं खालील सिद्धांत ठरविले आहेत."मृत्युदायक मोंगलाई राज्यपद्धतीची तरवार आणि अग्नि हीं दोन जबरदस्त शस्त्रें त्यांनीं समूळ नाश करणाऱ्या टर्कीच्या ख्रिस्ती प्रांतांवर रशिआ चाल करून येत आहे ही आनंदाची गोष्ट आहे, कारण रशिअन अमलानें त्या प्रांतांत सुधारणा होण्याची कांहीं तरी आशा करण्यास जागा होईल. त्यांत इंग्लंडचा कोणत्याही प्रकारचा तोटा नाहीं. कारखानें काढणाऱ्या व्यापारबद्ध इंग्रज लोकांस अत्यंत सुपीक व उत्कृष्ट हवेंतील देशांना टर्कीच्या अमलाखालीं ठेवून त्यांस भिकार स्थितींत कुजूं देण्यामध्यें काय फायदा आहे? ते लोक सधन झाले तर आमचा माल विकत घेण्याची त्यांस शक्ति येणार नाहीं काय? व मग सहजच आपल्या देशाचा फायदा झाल्याशिवाय कसा राहील? रशिआनें पोलिश लोकांस क्रूरतेनें वागविलें असेल, पण पोलंड स्वतंत्र राष्ट्र असतांना त्यांस जें दुःख होत होतें त्यापेक्षां तेथील लोकांस रशिअन अमलाखालीं राहून पुष्कळ सुख होत नाहीं असें कोण ह्मणेल? पोलंड सुखी असावें, टर्कीनें सुधारावें, रशिआनें नीतिमान् व स्वतंत्र असावें व या सर्व सुखकारक गोष्टी आमच्या हातून व्हाव्या हें आम्हांस व आमच्या प्रतिपक्ष्यांस कबूल आहेच. वाद काय तो साधनांमध्येंच आहे. तरवार घेऊन हें काम करावें असें आमचा प्रतिपक्ष ह्मणतो. पण आजपर्यंतचा अनुभव त्यांच्या या ह्मणण्याविरुद्ध आहे. जुलुमानें सुधारणा होत नाहीं याची हजारों वेळां प्रतीति आली आहे. आमचा उपाय याहून निराळा आहे. शांतता हा आमचा उपाय. घरची सुधारणा करावी, कायदेपद्धति लोकहितकारी होईल असें

वर्तन सपास्थानें सुरू करावें हा त्या शांततेचा उपयोग. आणि देशांत संपत्ति, भरभराटी, शक्ति व अजिंक्य स्वस्थिति असतांही शांतता ठेवण्यास आपण तयार असल्याचें उदाहरण इतरस्थ राष्ट्रांस दाखवावें हेंच आमचें बक्षीस: दुसऱ्याचें हितानहित तुह्मांस बिनचूक रीतीनें कळणें अशक्य आहे. कळलेंच तर दुसऱ्यांवर तरवारीनें उपकार लादण्याची सनदही तुह्मांस कोणी दिली नाहीं. तेव्हां ही पद्धत चुकीची आहे. व शांतता उत्पन्न करणारी आमची पद्धति बरोबर आहे. "

या दोन्ही पुस्तकांतील भाषेत खणखणीत स्पष्टता, व मनोहारक उद्दामता असून शब्दयोजनालीलेचें व सहजस्फुर्तीचें निदर्शक आहे. महाविद्यालयांत प्रवेश हेंच भाषा सुधारण्याचें साधन अशा लोकसमजास काब्डेन हा अपवाद होय. ज्याचीं लहानपणचीं वर्षे व्यर्थ व उनाडपणांत गेलीं, तारुण्य वखारीच्या खटपटींत गेलें, ज्वानीचा पहिला भर अडाणी व्यापाऱ्यांच्या मंडळींत गेला त्यानें ३१ सावें वर्ष उलटलें नाहीं तोंच एक नवीनच लेखनपद्धति काढून त्यांतील धीटपणा, स्वातंत्र्य, शुद्धता व आकर्षक गंभीरता अशा गुणांमध्यें सर्व जीवंत ग्रंथकारांस मागें ढकलून यावें हें आश्चर्य नव्हे काय?

काब्डेन पूर्वेकडून परत आल्यावर थोडेच दिवसांनीं इंग्लंडचा राजा ४ था वुइल्यम मेला. व व्हिक्टोरिआ राणी गादीवर बसल्यानंतर रीतीप्रमाणें सभासदांची पुन: सर्वत्र निवडणूक झाली. कांहीं दिवसांपासून काब्डेनचें नांव लोकांपुढें होतेंच तेव्हां स्टाकपोर्ट येथील कांहीं लिबरल लोकांनीं त्यास आपला प्रतिनिधि नेमावा अशी खटपट केली. काब्डेनची इच्छा आणखी दोन वर्षे पार्लमेंटांत जाण्याची नव्हती तेव्हां तो या निवडणुकीच्या खटपटींत प्रथमत: साधारण उदासीनच होता; त्याची निवडणूक झालीच असती तर त्याला वाईट वाटलें नसतें इतकेंच. पण त्याचा पार्लमेंटमध्यें केव्हांना केव्हां तरी शिरण्याचा निश्चय मागेंच झाला होता. परंतु निवडानिवडीची तारीख जसजशी जवळ आली तसतसें त्यानें आपलें अंत:करण तिकडे घातलें. कारण, कसलाही ब्रह्मज्ञानी उमेदवार झाला तरी त्याचा जयकामुकतेचा विकार आयत्यावेळीं उष्णतर होत जातोच जातो, मग हा तर काय जात्याच उद्योगशील!! त्यानें भाषण केलें त्यांत सरकारापासून कारखान्यांत काम किती तास असावें, याविषयीं कायदा मागूं नये

व व्यापारस्वातंत्र्य असावें असे मुद्दे होते. असो; त्याला सगळ्यांत कमी मतें मिळालीं आणि तो निवडला गेला नाहीं. त्याच्या मंडळींनीं त्यास एक वडी मेजवानी दिली. तो निवडला गेला नाहीं हें त्याच्या खासगत धंद्यास बरें झालें. कारण फ्रेड्रीक हा साधारण बुद्धीचा असल्यामुळे त्याची इच्छा कॉब्डेननें या सार्वजनिक फंदांत न शिरावें अशी होती १८३६ च्या वह्यांवरून असें दिसतें कीं एकंदर कारखान्यास त्या वर्षी २३००० पौंड फायदा झाला. पण संपत्ती मिळवून गबर व्हावें हा त्याचा हेतु मुळींच नव्हता, तेव्हां कांहीं वर्षें खटपट करून आपल्या संसारास लागेल इतका संचय करावा आणि मग राहिलेला वेळ व मनःशक्ति दुसरीकडे लावावी असा त्यानें निश्चय केला, व त्यावेळीं आपले धाकटे भाऊ व्यापारास मदत करतील व आपल्यास तिकडे कांहीं बघावें लागणार नाहीं हें त्यास वाटणे साहाजिक होतें. "माझी प्रकृति सुधारण्याकरितां व माझ्या सुखास कांहीं अंशीं अवश्य अशा आवडींचा उपभोग घेण्याकरितां मला ५ वर्षांनं विश्रांति सांपडेल तर जन्मसार्थक होईल." असें तो वरचेवर ह्मणे "चिरंजीवी होण्यापेक्षां उपयुक्तजिवी असणें श्रेयस्कर आहे" असें तो आपल्या वडील भावास वरचेवर लिही. या त्याच्या जब्बर मनोविकारामुळें आपला धंद्याचा कारभार अपुरा राहिला होता तरी तो लोकहिताकडे विशेष लक्ष देऊं लागला. तो स्वाभिमानी असल्यामुळें अमर्याद दिसे साहस कर्मांत छाती, बोलण्यांत निर्भीडपणा, नव्या कल्पनांचा आग्रह ह्या सर्वांवरून त्यास लोक हलकट व छचोर समजत असत. पोषाखामध्ये त्याचा उघड निःकाळजीपणा पाहून हा व्यवहाराच्या लहानसान ठरले ल्या गोष्टींत बंडखोर आहे असें लोक बोलूं लागले. हा वृथाभिमान अगर दुष्टशाहीपणा नव्हता. उगीच्याउगीच स्वस्थपणानें अर्धा पाऊण घंटा रिकामटेंकड्या ठराविक मानपानांत व्यर्थ घालविण्याचें त्याच्या चपल व गंभीर स्वभावाला बिलकूल आवडत नसे. यामुळें गांवांतील उगीच चकाट्या पिटणाऱ्या भिकार लोकांची वर्तणूक त्यास असह्य होत असे. असो, आपल्या प्रसिद्ध शहरास स्थानिकस्वराज्याचा मान असावा याबद्दल त्याची जारीनें खटपट सुरू झाली. सुधारणेच्या व आपल्या देशांतील मोठ्या महत्वाच्या गोष्टींकडे त्याच्या विशाळ मनाचा ओघ वळला होता ह्मणून सध्यां त्याच्या हाताशीं असलेल्या कामाचा त्यानें तिटकारा केला नाहीं. वरील स्वराज्य मिळविण्याच्या महाखटपटींत कॉब्डेन

हाच जागतजोत होता. १८३२ मध्यें स्थानिक स्वराज्याचा कायदा होऊन कर देणाऱ्यांपैकीं अर्ध्याधिक वर्गानें स्थानिक हक्क मागितले तर द्यावे असा जरी नियम ठरला होता तरी स्वराज्यानें ज्यांचें नुकसान होत होतें असे पुष्कळ लोक असल्यानें त्यांनीं लांच देऊन व लबाडया करून ह्या खटपटीस अतोनात हरकत केली. त्यांनीं विरुद्ध अर्ज करण्याचा घाट घातला. पण काब्डेननें स्वतः खर्च सोसून, सहा महिने अहोरात्र खटपट करून त्यांचे घाणेरडे प्रकार लोकांपुढें आणले, कायद्यांतील लोकपक्षांचीं कलमें घालून तयार केलेल्या एका पत्राच्या पांच हजार प्रती काढून लोकांमध्यें वांटल्या, दुकानदारांमध्यें संक्षोभ केला, विरुद्धपक्षानें तीस हजार सह्यांचा अर्ज केला होता त्यांतील २४००० सह्या खोट्या आहेत असें सिद्ध केलें, लंडन येथें दोनदां वकीलातनामा घेऊन मंडळी नेली, टोरी व ऱ्याडिकल यांचा अपवित्र संगम झाला होता त्यांचीं कारस्थानें भगीरथ प्रयत्न करून बाहेर आणिलीं, व्हिग पक्षाचें प्रधानमंडळ टोरी लोकांच्या भयानें त्रस्त होऊन त्यांच्या मतांप्रमाणें काम करीत होतें त्यांस 'तुह्मांस लोकमतानें कामावरून हांकून देऊं' अशी दहशत घातली आणि आपण हातीं घेतलेलें काम मोठ्या चातुर्यानें सिद्धीस नेलें. "व्हिग लोकांमध्यें प्रस्थापित मतें नाहींत व राजकारणी इमानही नाहीं, शिवाय ज्या वर्तनानें धैर्य व स्वतंत्रता येते त्या सत्यवर्तनाचा एक लवलेशही त्यांच्यामध्यें नाहीं आणि जे त्यांस भंडावतील ते त्यांस हवे तसे वांकवितील" अशी त्याची खात्री झाली. *चार्टिस्ट लोकांनीं जो १८३८ मध्यें दंगा केला त्यामुळें त्याचें धैर्य खचलें नाहीं. † रॅडिकल लोकांनीं ढोबळ चुक्या केल्या ह्मणून त्यांचा पक्ष त्यानें सोडला नाहीं. तो ह्मणे "हे लोक उतावळे असतील, गुर्मीखोर असतील, अज्ञानीही असतील पण यांच्यापेक्षां राज्य करणारे लोक वाईट नाहींत काय? आपलपोट्ये, पद्धतवार लुटालूट करणारे आणि राजकीय कामांत चोऱ्या करणारे असे हे नांवाजलेले बडे लोक नाहींत काय? परप्रवेश होऊं न देतां मक्त्याच्या तत्वानें राज्यकारभार करणारे हे लुटणारे लोक आपण पत्करण्यापेक्षां, अंधोपस्थ न्यायानें

---

* राजकीय हक्क मागणारे लोक.

† प्रत्येक हक्क प्रतिमनुष्यास पाहिजे असा आग्रह धरणारे लोक.

कां होईना पण बहुजनसमाजाचें हित करणारे लोक राज्यकारभारांत पत्करणें हें शहाणपण आहे. मी त्यांचें जहाज कधीं कधींही सोडणार नाहीं. त्यांच्या चुकया दुरुस्त करीन, उतावळ्यांस दम खावयास सांगेन. ही विस्कळीत असलेली मंडळी ' धान्याच्या कायद्या ' सभोंवतीं गोळा करितां येतील. आणि दास्यविमोचनाबद्दल संक्षोभन करून ज्याप्रमाणें लोकमत शेवटीं अनिवार झालें त्याप्रमाणेंच धान्यविमोचनाबद्दल धर्म व नीति यांचें साहाय्य घेऊन लोकमत संक्षुब्ध केलें असतां तें अपरिहार्य होईल यांत तिळमात्र संदेह नाहीं. मी देशांत पाय ठेवल्याबरोबर या विषयाच्या पिच्छेस लागणार. " असा त्याचा या वेळचा लेख आहे. हें जरी काब्डेनचें मत होतें तरी स्वदेशांतील जनसमूहाची किंमत त्यास माहीत होती. " ते गाढ आणि अभेद्य अज्ञानांत लोळत आहेत. त्यांस राजकीय माहिती इमानानें सांगितली असतां ' पालथ्या घागरीवर पाणी ' होणार आहे. हल्लींचे संक्षोभक असंभवनीय गोष्टी सांगतात, कारण त्या कधीं सरतच नाहींत. ह्या त्यांच्या लपंडावानें लोक फसतात. शहाणे व सत्यप्रिय लोक या पोकळ संक्षोभकांशीं अर्थातच स्नेह करीत नाहींत. जनसमूहाचा हा अज्ञान दोष घालविण्यास शिक्षण ( विद्यादान ) पाहिजे. जसें शेंपूट व धड आहे तसल्याच मासल्याचें डोकें ! ! अज्ञान आणि दुर्गुणी समाज आणि ज्ञानी व सद्गुणी नायक असले चमत्कार सृष्टींत असावयाचेच नाहींत. तेव्हां शिक्षण हाच उपाय आहे. शिक्षणानें सुधारणा चिरंजीवी होते. संस्थाक्रांतीनें तात्कालिक विनियम होऊन पुनः पहिले फाडे येतात. तेव्हां विद्येकरितां खटपट करा. "

१८३८ मध्यें पुनः तो जर्मनीमध्यें " धान्याच्या कायद्या " करितां दारूगोळा मिळविण्याकरितां एक महिनाभर गेला. तेथून त्यानें पत्रें पाठविल्यांपैकीं फ्रेड्रिकास एक होतें, तें हें. " रोजमुरा चांगला असला ह्मणजे 'व्हाइट बेअर' च्या गुत्यावर जाऊन यथेच्छ ब्रांडी झोंकणारे आमचे कानड्याच्या डोक्याचे द्विपाद गेल्या वर्षाच्या मंदाईनें जरा शुद्धीवर येतील व कारखान्याच्या बाहेरच्या आपल्या हिताच्या गोष्टींकडे लक्ष्य देतील असें वाटतें. येथील बुद्धिमान व सुशिक्षित लोक पाहून आमच्या लोकांबद्दल विचार करण्याची मला लाज वाटते. " लंडनशिवाय आपलें विचारस्वातंत्र्य व मनसोक्त वर्तन कायम ठेवण्यास दुसरी जागा नाहीं

असें त्यास माहीत होतें तरी ज्या समाजामध्यें आपण नशीबानें पडलों आहों तो मांचेस्टरचा समाज सोडून जाणें त्यास इष्ट वाटलें नाहीं. १८३८ मध्यें मांचेस्टरास स्थानिक स्वातंत्र्य मिळालें व लोकांनीं त्यानें केलेली खटपट ध्यानांत आणून त्यास 'आल्डरमन' ची जागा दिली. या स्थानिक स्वातंत्र्याचा उपयोग मांचेस्टरनें एका महत्वाच्या राष्ट्रीय कृत्याचें उगमस्थान व्हावें असा झाला तो

## कटाची स्थापना होय.

'धान्यकायद्याविरोधी कट' ह्या नांवावरून युरोपखंडीय परस्थ लोकांनीं ह्या संक्षोभनाची त्या वेळीं पूर्ण पारख केली नाहीं. त्याप्रमाणेंच इतरांचा आतांही गैरसमज होण्याचा संभव आहे. अन्नावरील संरक्षक जकातीचा निरास व संरक्षक पद्धतीचा चुथडा या दोहोंपैकीं एकीनें वर्गनियतवर्चस्वाच्या विरुद्ध अर्वाचीन झगडा (कलह) करून अन्न स्वस्त केलें व दुसरीनें सर्व जगभर नागरायणाच्या (सुधारणेच्या) उच्च कल्पनांचा अरुणोदय केला. ह्या महा प्रसंगामध्यें दृग्गोचर झालेले उत्साह, युक्ति, तत्परता आणि धैर्य ह्यांचे आश्चर्यजनक लेख काब्डेनच्या चरित्रकारास वरील फलांमुळें अत्यंत महत्वाचे होतात. प्रथमतः या भांडणांत मांचेस्टर शिरलें तें विशिष्ट वर्गाचा फायदा करण्याकरितां होय हें जरी असत्य नाहीं तरी कारखानदार आणि व्यापारी या विशेष वर्गाचा फायदा झाला ह्मणजे सर्व जनसमूहाचा फायदा होता हें कबूल करणें भाग आहे.आणि ज्या वर्गाविरुद्ध त्यांनीं भांडण केलें त्याचें हित हें देशावर विनाकारण ओझें होऊन पडलें होतें हें विसरतां कामा नये. शिवाय चांगला पक्ष वर्धमान होत असतां मार्गांत त्यास मोठ्या महत्वाचे मुद्दे येऊन मिळतात आणि त्यांच्या आगमनानें तत्पक्षीय वीरांचे उत्कृष्ट मनोधर्म प्रगट होण्यास अवकाश मिळतो.

या भांडणांतील मूळ प्रश्न असा होता. "दररोज १००० मनुष्यें ज्या देशांत जन्मास येतात, तेथें श्रमाच्या विनियोगाकरितां सदैव वाढत जाणारे बाजार असल्याशिवाय (श्रमकारांस नवें नवें काम शोधून काढल्याशिवाय) पोट भरण्याइतके रोजमुरे मजूरदारांस कसे मिळतील आणि आपण परस्थ लोकांचें धान्य,लांकूड अगर जें काय त्यांच्यानें उत्पन्न करवतें तें स्वदेशांत विकत घेतले नाहीं तर आपले कारखान्यांत तयार झालेलें सामान इतर लोक कसें घेतील ? ह्मणजे आपण संरक्षक जकात कमी

केल्याशिवाय बाहेरून धान्य वगैरे कच्चा माल येणार नाहीं. तो आला नाहीं तर आपला कारखान्यांतील माल परस्थांस विकावयास सांपडणार नाहीं ह्मणजे कारखाने वाढवितां येणार नाहींत ह्मणजे अर्थात रोजमुऱ्याचा दर लोकसंख्या वाढत असल्यामुळें कमी होत जाईल आणि रोजंदार उपाशीं मरतील; शिवाय उत्तर न देण्याजोगा एक मुद्दा असा होता कीं पार्लमेंट आपले कायदे कायम ठेवण्याच्या आग्रहानें परस्थ कारखानदारांचें मात्र आमच्या खर्चानें हित करीत आहे. कारण आह्मी त्यांचें धान्य घेत नाहीं ह्मणून जास्त धान्य उत्पन्न करण्याची शिलक राहिलेली शक्ति ते नवीन कारखाने उत्पन्न करण्यांत खर्च करतील व आमचे कारखानदार उपाशीं मरतील.

व्यापारासंबंधी हा विचार झाला, पण लवकरच देशाभिमान व दारिद्र्यविमोचन हे दोन सद्धेतु या संक्षोभनामध्यें घुसल्यामुळें मोठ्या मठ्ठ माणसास सुद्धां त्यानें लवकरच आपलेंसें केलें.

काब्डेनच्या विचारी अंतःकरणानें या संक्षोभनाची योग्य किंमत तेव्हांच ताडली. इंग्लंड कोणतीं सत्कृत्यें करण्यास योग्य आहे अशाविषयीं त्याचें मत काय होतें तें आपणास ठाऊक झालेंच आहे. धान्याचा कायदा फक्त अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या व सत्कृत्यांस अडथळा आणणाऱ्या दुष्ट राजसंस्थेचा एक लहानसाच भाग आहे हें जरी त्याच्या लक्षांत आलें तरी हाताशीं करण्यासारखें काम आहे तें टाकून देऊन लोकांनीं आपली युक्तिसिद्ध पद्धति सर्वच्या सर्व चट्कन् गिळावी असें ह्मणणाऱ्या अजागळ सुधारकांपैकीं तो नव्हता. आपल्यास पुढें काय कसें घडवून आणावयाचें हें त्याच्यासारखें दुसऱ्या कोणत्याही समाजसुधारकास समजत नव्हतें असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां येथें सत्कृत्य करण्याचें साधन आहे तें साधून घ्यावें ह्या हेतूनें या शतकांत जी पहिली स्वारी निघाली (धान्याच्या कायद्याविरुद्ध संक्षोभन सुरू झालें) त्यांत धर्मप्रसारक आचार्यांच्या हिमतीनें स्वार होऊन तो भांडण्याकरितां ताडकन बाहेर निघाला.

१८३६ मध्यें † ग्रोट, मोलस्वर्थ, ह्यूम, व रोबक यांनीं लंडन येथें धान्याच्या कायद्याविरुद्ध एक सभा उत्पन्न केली होती व या मंडळींत बुद्धिचापल्य, विषयानुप्रवेश व कल्पनागौरव हे गुण जरी विशेष होते तरी

---

† हा ग्रीस देशाचा इतिहासकार.

लोकप्रिय हिकमतींचा त्यांच्यामध्यें अभाव असल्यामुळें ही सभा जिथल्या तेथेंच जिरली. शिवाय संक्षोभन करण्यास लंडन ही जागा चांगली नाहीं. कारण या विस्तृत नगरींतील समंजस लोक विस्कळीत असल्यामुळें फलदायी जनसंघ तेथें कधींच करितां येत नाहीं. यामुळें ही सभा उत्पन्न होऊन न होऊन सारखेंच झालें. १८३८ च्या आगस्टमध्यें गहूं ७७ शिलिंगांनीं १४ शेर झाले; भरपावसांत पिकें काढण्याची व मळणी करण्याची वेळ येणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं; वसूल कमी होऊं लागला; खर्चास पैसा नाहीं हा शब्द घरगुती झाला; भिकार वाढूं लागले; आणि सरकार व इनामदार यांनीं कृत्रिमत्वानें धान्याचा भाव वाढवून ठेवल्यामुळें कारखाने बुडूं लागण्याची भीति उत्पन्न झाली. या सर्वांचें मूळ कारण स्पष्टपणानें समजलें नव्हतें तरी त्याविषयीं अनिश्चित संशय येऊं लागला होता. कोणतेंही दुःख असह्य झाल्याशिवाय, किंवा अत्यंत तत्पर, दूरदर्शी व अजिंक्य अशा महात्म्यांनीं त्या दुःखाचें शक्तिसर्वस्व व महत्व लोकांपुढें स्पष्ट मांडून ठेवल्याशिवाय, त्या दुःखाचें खरें औषध सांपडत नाहीं हा सर्वसाधारण नियम आहे.

त्याच वर्षीं आक्टोबरमध्यें 'धान्यशासनविरोधी कट' या नांवाची सभा ७ मनुष्यांच्या टोळीनें काढली. पुढें लवकर काब्डेन त्यांत मिळून सल्ला देणें अगर काम करणें यांमध्यें पुढारीपणानें काम करूं लागला. प्रत्येक सिद्धीस गेलेल्या चळवळीच्या इतिहासामध्यें असें दिसून येतें कीं संक्षोभन करणाऱ्या पक्षांतच एक अंतःपक्ष उत्पन्न होऊन त्या दिवसापासून आपल्या प्रश्नाला दिनावधी अगर त्यामध्यें तोडजोड ह्या दोन्ही गोष्टी त्यास खपत नाहींशा होतात. ही गोष्ट येथेंही प्रत्ययास आली. १८३९ मध्यें ही मंडळी संक्षोभन करण्याच्या तयारीनें वर्गणी गोळा करूं लागली. याच वेळेस काब्डेननें लोकांपुढें एक वाक्य फेंकलें तें हें:—"सर्वच मालाची लुटालूट होत आहे ती थांबविण्याकरितां आपण आपली अर्धी मिळकत येथें व्याजीं लावूं या. तात्पर्य या कटास आपण वर्गणी देऊन त्याकडून संक्षोभन करवूं या." अथवा "सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः," ह्या वाक्यानें लोकांचें लक्ष इकडे लागून बराच कार्यभाग झाला. एक महिन्याच्या आंतच ६००० पौंड जमा झाले. ६००० देतों ह्मणून वचनें मिळालीं. प्रथम त्यांनीं व्यापारस्वातंत्र्यास खरी मदत करणाऱ्या पार्लमेंटांतील प्रतिनिधींस मेजवानी दिली.

देशांतील "धान्यशासनविरोधी" नामक सर्व सभांकडून एका शिस्तीनें जोरदार चळवळ सुरू करण्याची सूचना काब्डेननें आणली ती मंजूर होऊन १८३९ च्या जानुआरींत ही सभा सुयंत्रित झाली व नंतर आपण काय करणार याबद्दलचें एक 'पत्रक' प्रसिद्ध केलें. त्यांत हेतु प्रदर्शित केला होता तो असा कीं "कायदेशीर राज्यपद्धत्यनुरूप मार्गानें चोहोंकडे स्थानिक सभा स्थापणें, व्याख्यानें देणें, पुस्तकें वांटणें, पार्लमेंटास अर्ज करणें, व धान्याच्या कायद्याची तात्कालिक सबंध बंदी होईल असे उपाय करणें हें ह्या थोरल्या सभेकडून होईल." काब्डेन याची व्यवस्थापक मंडळींत नेमणूक झाली. व शेवटपर्यंत ती नेमणूक कायमच होती. "धान्याचा कायदा एकदम सबंध बंद करणें ह्मणजे राजपद नाहींसें करणें" असें मोठ्या शहाण्या व कांहीं अंशानें तो रद्द करावा असें ह्मणणाऱ्या लोकांस सुद्धां वाटत असे. या कायद्याविरुद्ध अर्ज आले होते त्यांची चौकशी करण्याकरितां कांहीं मंडळी नेमावी अशी व्हिलीयर्स याची सूचना नामंजूर झाली व सभेकडून कांहीं वकीलांस पार्लमेंटांत बोलूं न यावें अशी सूचना ४०० मंडळींनीं नाकारली. कारण उघडच आहे कीं बहुतेक सभासद जमीनदार होते. पुढें व्हिलीयर्स यानें या कायद्याचा विचार व्हावा ह्मणून संप्रदायाप्रमाणें आपली वार्षिक सूचना केली त्या वेळेस ह्या सूचनेस जोर यावा ह्मणून ३६ मुख्य शहरांतून प्रतिनिधी आले होते. पांच रात्री वादविवादांत खर्च होऊन शेवटीं ५४९ सभासदांपैकीं १९७ यांनीं व्हिलियर्सच्या सूचनेस अनुकूल मत दिलें. भांडणाचा अजून पुष्कळ पल्ला गांठावयाचा आहे अशी खात्री होऊन पुनः एकत्र जमण्याच्या हेतूनें मराठी पेंढाराप्रमाणें प्रतिनिधी गांवोगांव गेले. पहिल्यांदा कांहींनीं तेथेंच हातपाय गाळले, पण काब्डेनच्या मनोगांभीर्यानें पुष्कळांस दम आला. जर्मनींतील ऱ्हाईन, डॅन्युब, व एल्ब या नद्यांच्या तीरानें खडकांवर अभिषिक्त झालेले किल्ले जमीनदोस्त करून टाकून त्यांस नामशेष मात्र ठेवणाऱ्या तेथील सभेची हकीकत त्यानें आपल्या मित्रांस सांगितली व त्यांच्या प्रमाणेंच खटपट करून आपण ही जुलुमी इनामदारांच्या कायदेरूप किल्ल्याचा फडशा पाडूं असा त्यांस धीर दिला. शहरोशहरींच्या व प्रांतोप्रांतींच्या सर्व सभा एककेंद्रगामी केल्या. व्यवस्थापक मंडळी नेमिली व मँचेस्टर येथें सभेची मुख्य कचेरी केली. आपल्या मतांचा फैलाव करण्याकरितां

' आंटिकार्नलॉ सर्क्युलर ' नामक ( धान्याच्या कायद्याविरुद्ध भांडणारें ) वर्तमानपत्र काढलें, त्यांत राजकीय कामांत ढवळाढवळ करणारे दोन्ही पक्ष बेमानी व उथळे आहेत, आह्मी आपला प्रश्न सरकारी प्रधानमंडळी-कडे नेऊन आपलासा करून घ्या असें म्हणणार नाहीं, लोकमत प्रचल झाल्याशिवाय हा कायदा बंद करण्यासारखें धैर्य कोणाही मुत्सद्यांत नाहीं वगैरे, अशा अर्थाचे लेख येत असत. काब्डेन याची खातरी झाली होती कीं हें युद्ध फार लांबवर चालणार; कारण पुराणपक्षाच्या नायकास चिडवितां न येणाऱ्या सामाजिक पद्धतीमध्यें या कायद्याचीं मुळें गेलीं आहेत हें त्यास माहीत होतें. हें दीर्घसूत्री काम ह्मणून त्यानें हातिचें टाकून दिलें नाहीं. स्वस्ताईनें पत्रें पाठविण्याचें साधन झालें तें कालापव्ययाकडे लक्ष न देणारीं धीराचीं मनुष्यें पुढें आलीं, त्यांनीं पैसे खर्च केले, व समाजांत चोहोंकडे प्रचंड संक्षोभन केलें, तेव्हां पत्रें थो-ड्या हंशिलांत पाठवितां येऊं लागलीं; हें उदाहरण त्याच्या डोळ्यापुढें होतें. "घरीं बसून व कपाळास हात लावून रडत बसण्यानें कोणतेंही काम होत नाहीं; तर या कायद्याची रद्दी तरी घरीं बसून कशी होईल? आपण शहाणे आहांत, आपल्या व्यापाराची काळजी आपल्यास आहे, राष्ट्रीय कर्तव्याची आपल्यास काळजी आहे तर उठा, पैसे काढा, व्या-ख्यानें द्या, व सर्व राष्ट्रांत चळवळ करून सोडा तर कार्यसिद्धि होईल. नाहीं तर जन्मभर आपल्यास दुष्काळांत मरावें लागेल" हा त्याच्या भाषणाचा सारांश होता.

संक्षोभन ह्मणजे गोडवें काम नाहीं. विशिष्टवर्गाच्या फायद्याची गोष्ट कधींही लवकर मरत नाहीं. तिचा नाश करण्यास दीर्घ प्रयास लागतात. असो. अर्थशास्त्राचे उपदेशक गयावळ कटानें पाठविले त्यांचे बुरे हाल झाले. त्यांस व्याख्यानें द्यावयास जागा मिळेना, पाषाणमार सोसून घ्यावा लागला, मारेकरी आले, भोजनगृहांत जागा राहवयास तर नाहीं-च पण चहाचा पेला पिण्यास सुद्धां मिळेना, दंगा होईल ह्मणून पोलीस आणावे लागले, व्याख्यान अर्धें टाकून जावें लागलें, जाहिराती काढ-ण्याला छापखाना मिळेना, भर विद्यापीठाच्या जागीं रक्तपाताचें भां-डण झालें, असे नानाप्रकारचे अनेक अडथळे नाना ठिकाणीं झाले. वर्तमानपत्रांतून 'बदफैली', 'क्रांतिकार', 'दिवाळखोर', 'नीति-भ्रष्ट', 'राजद्रोही', अशा पुष्पांजली येऊं लागून कित्येकांनीं तर

यांस तुरुंगांत पाठवावें अशी सूचना केली. "इतर राष्ट्रांच्या लोकांनी उत्पन्न केलेलें अन्न खाल्याशिवाय चैन पडत नसल्यास देशत्याग करा व आह्मांस आपलें काळें तोंड दाखवूं नका" अशा उपदेशाच्या गोष्टी कोणी सांगितल्या. **चार्टिस्ट्स** लोकही या चळवळीच्या विरुद्ध जाऊन, लोकांस सांगूं लागले कीं ही कारखानदार लोकांनीं आपली तुंबडी भरण्याची युक्ति काढली आहे. इतकें झालें तरी ही मंडळी निराश झाली नाहीं. गांवोगांव पाठविलेल्या व्याख्यानकारांनीं मजूर लोकांची जी दैन्यावस्थेची माहिती आणली होती ती त्यांनीं मांचेस्टर सभेंत सांगितली; त्यावरून तर व्यवस्थापक मंडळीस दुप्पट जोर आला तेथें अनेक उदाहरणें सांगितलीं त्यांत **सामरसेट** येथील एकानें उदाहरण सांगितलें तें घेऊं. "एक मजूरदार, त्याची बायको व १० वर्षांच्या आंतील पांच मुलें यांचा आठवड्यांतील खर्च याप्रमाणें आहे. पावणे दोनशेर गहूं, किंमत चार शिलिंग; दळणें, भाजणें वगैरे अर्धा शिलिंग सर्पण, अर्धा शिलिंग; भाडें, दीड शिलिंग; एकंदर प्राप्ति सात शिलिंग शिल्लक अर्धा शिलिंग; त्यांतून लत्ताकपडा, मीठमीरची, भाजीपाल इत्यादिकांची तर्तूद!!" असली खातरीलायक उदाहरणें डोळ्यापुढे असल्यावर मोठमोठ्या अधिकारी व वजनदार लोकांच्या मनःकल्पित भपकेदार गप्पा केवळ उपहासास्पद झाल्या. "धान्याचा कायदा रद्द केला तर सुगंध मारुत उत्पन्न करणाऱ्या सहस्रदीधितीची तं मंजूळ हांक, ती व्यवस्थेशीर छपर असलेली झोंपडी, ऐनभरांत येणार तो बगीचा, आणि रमणीय असें तें हिरवेंगार मैदान ह्या सर्व आनंददायक वस्तु सोडून देऊन, जेथें सर्वत्र धांदल आहे, जेथें कर्णकठोर असे कारखान्यांतील घंटानाद येत आहे अशा ठिकाणीं ऐनसुखांत असलेल्या मजूरदारांस जावें लागेल व हें कृत्य **कारोमांडल** येथून **मारिशिअस**चेटारस हिंदु मजूरदार नेण्यापेक्षांही घोरतर व हृदयद्रावक आहे." **सर जेम्स** **ग्राहाम**सारख्या पट्टाइत फडणीसाच्या तोंडून जेव्हां असे अज्ञानगर्भित शब्द आले तेव्हां साधारण सुधारकांची कंबरच खचावयाची! पण आमची संक्षोभक मंडळी, पार्लमेंटांत आपल्या विरुद्ध फार दुराग्रह आहे, वर्तमानपत्रांतून आपल्यास हजारो शिव्या प्रत्यहीं येत आहेत व शेंकडा ९० लोक अज्ञानांत लोळत आहेत हें पाहून बिलकूल डगमगली नाहीं आपण मांडतों आहोंत ते द्रव्याचा नाश होत आहे ह्मणून नव्हे तर

राष्ट्रीय अन्याय होत आहे तो बंद करण्याकरितां भांडतों आहोंत अशी त्यांची बालंबाल खातरी झाली होती ह्मणून त्यांचा धीर सुटला नाहीं.

या वेळीं **काब्डेन** हा **मांचेस्टर**मध्यें 'केस्रीट' आळीला राहत असे. त्याचा धंदा लख्ख चालला होता व आपल्या स्थितींत समाधान मानून राहता तर त्यास पुढें जीं अनेक दुःखें भोगावीं लागलीं तीं कदाचित् आलींच नसतीं. त्यानें पूर्वींच्या भागीदाराशीं फारकत करून आपल्या भावाच्या कल्याणार्थ त्यास भागीदार घेऊन **मांचेस्टर** येथें निराळीच वखार काढली. ही व्यवस्था ६ वर्षें चालली. पण या नवीन धंद्यांत **काब्डेन**च्या अकलेशिवाय कांहीं होईना. त्याचा भाऊ स्वभावानें चांगला हें खरें, पण धंद्यास उपयोगी धोरण ठेवावयाच्या बद्दल तो हरणकाळजीमध्यें असे आणि अंगामध्यें धाडस नसल्यामुळें भितरेपणाच्या चुका, झपाझप काम करण्यानें नाहींशा होतील अशी त्याची समजूत असे. सगळीच नवी विटी नवें राज्य झाल्यानें मांडवलापासून सर्व तयारी **काब्डेन** यास करावी लागली. अशाच वेळेस त्यानें एक जमीन विकत घेतली, पण तो सौदा फसला. मागें सांगितल्याप्रमाणें सहा वर्षांत पुनः स्थिरस्थावर झालें. याप्रमाणें गृहस्थितीवर जरा दुर्दैवाचें वारें आलें होतें तें नाहींसें होऊन चोहोंकडे सुचत्ता होते आहे तोंच त्यास सार्वजनिक कामाकडे ओढ लागली. याच सुमारास (१८४०) त्यानें **मिस क्याथराइन आन वुइल्यम्स**शीं लग्न लावलें. ती पांच पन्नास बायकांत सुरेख असून सभ्य चालीरीतीची होती; व तिच्यापासून **काब्डेन** यास आमरणांत कधींही त्रास झाला नाहीं. "आपण लग्न झाल्याबरोबर अमेरिकेंत गेलों असतों तर तुमच्या हातून जीं सत्कृत्यें झालीं व जी कीर्ति तुह्मी मिळविली ती मिळाली नसती हें खरें; पण एकंदरींत आपणा दोघांसही विशेष प्रापंचिक सुख झालें असतें" असें त्याची बायको त्याच्या शेवटच्या वर्षी ह्मणाली तेव्हां तो ह्मणाला "तुह्मी ह्मणतां तें अगदींच खोटें नाहीं;" पण १८४० सालं दुःखाचें स्वप्नही पडलें नव्हतें. त्यांनीं आनंदानें आपली लग्नयात्रा **फ्रान्स, स्वित्सर्लंड, जर्मनी** येथें केली. त्यावेळीं **काब्डेन** यास इतर मनुष्याप्रमाणेंच संपत्तिसुखाची, गृहानंदाची आशा होती; व देशाची प्रामाणिक सेवा आपण करूं असा दम होता.

# भाग पांचवा.

## धान्याचा कायदा.

व्हिग पक्षाची सरशी १८३० पासून १८४१ पर्यंत होती खरी पण दिवसानुदिवस राष्ट्रीय खर्च जास्ती वाढत जाऊन आदाकारच कमी होत चालला होता. १८४० सांत १०॥ लाख पौंडांची तूट आली. १८४१ सांत १८॥ लाखांची तूट येणार असा अंदाज होता. फडणिशी कामांत हा पक्ष ढिला होता हेंच या भयंकर तुटीचें कारण होतें असें नाहीं तर व्यापाराची हट्टी मंदाई व लोकांचें अनिवार संकट यांवरून कायम झालेल्या औद्योगिक व व्यापारिक गत्यभावाचें, ही तूट हें निदर्शन होतें; आणि ही व्यापाराची ढिलाई अर्थक्रांति झाल्यावांचून मोडणारी नव्हती. शिवाय व्हिग पक्षही रोडावत चालला होता. "प्रधान मंडळींनीं धोरण ठेऊन चांगला फांसा टाकिला तर सही होईल" असें मेकालेचें ह्मणणें होतें. आयत्या वेळेला व्हिग मंडळी व्यापारस्वातंत्र्याच्या पक्षाकडे मतांतर करून आली तें मनाची खातरी ह्मणून नव्हे तर बुडणाऱ्या माणसाप्रमाणें हातीं लागेल त्यास चिकटावयाचें ह्मणून त्यांनीं मतांतर केलें! पण यानें टिकाव कसला लागतो!

१८४० मध्यें आयातमालावरील जकातीच्या चौकशीकरितां एक मंडळी नेमली होती त्यांचा असा अभिप्राय पडला होता कीं पुष्कळ पदार्थांवर जकात घेण्यापेक्षां ज्याचा पुष्कळ खप होतो अशा मालावर जब्बर जकात ठेवावी व बाकीचे पदार्थ जकातमुक्त करावे. पील† साहेबानें १८४२ सांत जी सुधारणा केली ती याच आधारावर. पण जकात कमी करणें ह्मणजे उत्पन्न वाढविणें असें धैर्यानें समजून घेणारा पुरेशा अकलेचा व धडेल छातीचा दीलदार गडी मेलबोर्न प्रधान मंडळांत कोणीच नव्हता. त्यांनीं भीत भीत वरील तत्व घेण्याचा विचार केला, पण फसलें. "रिकाम्या खजिन्याच्या पेटीवर बसून अगाध तुटीच्या डोहामध्यें अंदाजपत्रकाकरितां ग-

---

† हे गृहस्थ कांहीं कालपर्यंत हिंदुस्थानसरकारचे कौन्सिलदार होते. पुढें हे पार्लमेंटांत शिरले व तेथें हे दुय्यम पक्षाच्या नायकांत मोडत असत. यांच्या भाषणाच्या वेळेला सर्व हाउस भरून जाई. यांचे लेख तर सुप्रसिद्धच आहेत.

ळ टाकणाऱ्या फडणिसाकडे पाहून मला फारच वाईट वाटतें" असें पील साहेब बोलल्याबरोबर व्हिग लोकांची कंबरच खचली. आपण साखरेवरील जकात बंद करण्याचा विचार सुरू केला न केला तोंच आपल्या विरुद्ध भयंकर जमाव झाला हें पाहून धान्यावरील जकात कमी करावी असा त्यांनीं बूट काढला, तेव्हां 'व्यापारस्वातंत्र्य' ह्याच मुद्यावर वागू लढाई होऊन साखरेच्या प्रश्नावर त्यांचा पराजय झाला. कारण त्यांचें मतांतर घाईनें झालेलें पाहून त्यांच्यावर कोणाचा विश्वासच बसेना. पराजय झाल्यावर राजीनामा द्यावा किंवा नवें पार्लमेंट बोलवावें तें न करितां तसेंच डोकें देऊन राहिले. ते जागा सोडीत नाहींत असें पाहून यांच्यावर आमचा विश्वास नाहीं अशी सूचना पीलनें केली त्यांत त्यास यश आलें; तेव्हां शेवटीं व्हिग पक्षानें नवें पार्लमेंट बोलावलें.

दोन्ही पक्षांनीं मतदारांवर स्वाऱ्या केल्या त्यांत व्यापारस्वातंत्र्य मागणारा आमचा कुटही मिळाला. पण मध्येंच एक अडचण आली. प्रधानमंडळ अर्धवट स्वातंत्र्य देण्यास तयार झालें होतें. ह्या त्यांच्या तडजोडीनें पुष्कळ मंडळीस आश्रा दिला. आपण नेमस्त व्यापारस्वातंत्र्यवाले आहों व फाजील स्वातंत्र्येच्छू नाहीं असें ह्मणावयास कित्येकांस फुरसत सांपडली व पुष्कळ मतदार मंडळी त्यांस पसंत करूं लागली. तेव्हां आमच्या पूर्ण स्वातंत्र्यवाल्या मंडळीला काय करावें ह्मणून पंचाईत पडली. नेमस्त व्यापारस्वातंत्र्यवाल्यांशीं कट्टा विरोध करावा तर आपल्या पक्षाकडे भीत भीत येणारे समंजस लोकांस आपण हांकून दिल्यासारखें होऊन अवश्य लागणारें शहाणपण व तारतम्य आपल्यांत नाहीं असें आपलें जगांत हसें होईल, व त्यांस मदत केली तर आपण सत्यपक्ष सोडला असें होईल ! ! तेव्हां त्यांनीं पुढील शक्कल काढली. जेथें पूर्ण व्यापारस्वातंत्र्याभिमानी येण्यासारखा असेल तेथें तो आणण्यास मदत करावयाची व जेथें नेमस्ताचीच डाळ शिजण्यासारखी होती तेथें त्यास मदत करावयाची. याप्रमाणें युक्तीनें खटपट करून त्यांनीं उत्तर प्रांतांत चोहोंकडे जय मिळविला. स्टाकपोर्ट येथें काब्डेन याची सरशी झाली. आपल्या भावास वखारीमध्यें एकटाच ठेवून पार्लमेंटमध्यें जाण्याची त्याची इच्छा नव्हती पण " तुमच्याशिवाय जकातींचा अभिमानी उमेदवार पडत नाहीं; तेव्हां तुह्मासच येथें उमेदवार उभें राहिलें पाहिजे. तुह्मी नेहमी सभेस हजर असलें पाहिजे असें आह्मी म्हणत नाहीं, तुह्मी सो-

यीस येईल तेव्हां तेथें गेलां तरी आमची हरकत नाहीं" वगैरे सयुक्तिक सौलत, मतदारांनीं दिल्यामुळें त्यास **स्टाकपोर्ट** येथील आमंत्रण पत्करावें लागलें. निवडणुकीमध्यें आपल्या प्रतिस्पर्ध्यास त्यानें चांगलाच झोडून काढला त्यामुळें त्या भागुबाईनें एक वाजतांच पोबारा केला. मग अर्थातच **कॉब्डेनास** जयलाभ झाला. **पील**च्या पक्षाचे ३० लोक जास्ती येतील असा लोकांचा अदमास होता तो फसून त्याकडे ९० लोक जास्ती आले. **कॉब्डेन**नें प्रथम दिवशीं * पोपच्या व प्रिटेंडरच्या विरुद्ध शफता घेतल्या. राज्यसूत्रें अर्थातच **पील**पक्षाकडे आलीं. हा पक्ष या वेळीं फारच प्रबळ होता. त्यांचा सेनापति पहिल्या प्रतीचा मुत्सद्दी असून त्या पक्षांत **लार्ड स्टानले** व **सरजेम्स** ग्रॅहामसारखे वजनदार लोक आले होते. ह्या भयंकर सैन्यसमूहाचा **कॉब्डेन**नें आपल्या कर्तबगारीनें कसा फडशा पाडला त्याचें वर्णन पुढें येईलच. 'व्यापारस्वातंत्र्या' चा प्रश्न बिलकुल काढावयाचा नाहीं असा **टोरी**पक्षाचा संकेत होता पण **कॉब्डेन**नें आपल्या मुग्धभाषणांत † एका वेडगळ **टोरी**वाल्यास चेकाळवून त्याकडून कारखानदारांस शिव्या देवविल्या तेव्हां अर्थातच **पील**साहेबास खुषी नव्हती तरी स्वसंरक्षणार्थ व्यापारस्वातंत्र्याचा वादविवाद सुरू करावा लागला. **कॉब्डेन**चे भाषणाची तान अश्रुतपूर्व सुरांत असल्यामुळें सर्व सभासदांचें लक्ष तिकडे ओढलें. त्याच्या भाषणामध्यें सत्याची रागदारी होती. लोकांस कळलें कीं हा गृहस्थ शब्दलाघवांत न पडतां अर्थगौरवाचा अंगीकार करणार. त्याच्या बोलण्यांत पक्षीय शिव्या, शब्दपूर्ण चऱ्हाट, रसाविर्भावाच्या ठराविक गोष्टी, यांचा अत्यंताभाव असून तो केवळ झोंबणारी वस्तुस्थिति सांगण्याकरितांच आला आहे असें दिसे. वर्गांचें हितानहित करण्याकरितां अगर अर्थशास्त्राच्या पोकळ सिद्धांतांचा शब्दपूर्णवाद ऐकण्याकरितां देशाची ओरड चालली नाहीं असें त्यानें ठासून सांगितलें. तें सभासदांच्या हृदयास झोंबलें, व देशांत त्याच्या संबंधानें पूज्यभाव वाढूं लागला. धान्याच्या कायद्याशिवाय दुसरा विषयच वादयोग्य नाहीं असा त्यानें बहुतेक लोकांच्या मताविरुद्ध आग्रह धरिला.

---

* "रोमन कॉथलिक धर्मास मिळणार नाहीं व तो नाहींसा करण्यास प्रयत्न करीन: व रोमन कॉथलिक धर्मपंथाचा राजा कबूल करणार नाहीं" अशी शपथ पार्लमेंट सभेंत गेल्यावर प्रत्येक सभासदास घ्यावी लागत असे.

† पार्लमेंटांतील सभासदाच्या प्रथम भाषणास मुग्ध भाषण ( maiden speech ) म्हणतात.

त्यानें सांगितलें कीं कुलीन इमानदार दर पौंडास गव्हाच्या संबंधानें $\frac{1}{100}$ पेनी कर देतात पण गरीब लोकांस तितक्याच रकमेवर १ शिलिंग कर पडतो. कारण धान्य हेंच त्यांचें मुख्य सार्ग आहे. हें वाक्य सर्वांच्या अंतःकरणास झोंबून गेलें. ह्या भाषणानें स्टाकपोर्ट व मांचेस्टर येथील मंडळीस खूप आनंद होऊन आपलें कार्य लवकरच फत्ते होणार अशी त्यांस आशा उत्पन्न झाली. काब्डेननेंही होईल तितका प्रयत्न करून आपला प्रश्न सभेपुढें आणण्याची खटपट चालविली. *ब्रोघामसारखे वजनदार लोक त्याची गांठ घेण्याची इच्छा प्रदर्शित करूं लागले. पीलच्या मनांतून ह्या कायद्यासंबंधानें ढवळाढवळ न करितां सुदैवावर भरंसा ठेवून 'व्यापारस्वातंत्र्य' प्रश्नास टाळा देण्याचा व दोन्ही पक्षांस फाशांत अडकवून राजकारभार करण्याचा बेत होता.

काब्डेन उत्तरेकडील स्थानिक नायकाशीं नेहमीं संबंध ठेवून त्यांचें मत काय आहे याचा तलास काढीत असे व त्यांच्या मताप्रमाणें चालण्याचा प्रयत्न करी. तो हाउसमधील सभासदांच्या मताविषयीं विशेषशी फिकीर करीत नसे. देशाचें मन समजून घेऊन त्यावर आपल्या मताचा मुलामा चढवावा व देशहित करावें अशी त्याची इच्छा असे. † पर्जन्यायनांत त्यानें दोनदां बोलण्याची संधी घेतली. पील व रसेल ‡ हे दोघे धान्याचा कायदा पक्षीय प्रश्नामध्यें ढकलीत होते तेव्हां यानें उठून सांगितलें कीं पार्लमेंटसभा ही वादविवाद करणारी शाळेंतील विद्यार्थी मंडळी नव्हे. "कारखान्यांच्या प्रांतांत उपासमार व दुःख-संपदा यांची गर्दा येऊन पडली आहे तेव्हां मुख्य प्रधानानें 'धान्य-कायद्या'चा प्रश्न हिमायनावर ढकलूं नये." हें बोलतांना त्यास नव्या तरण्या मंडळीनें त्रास देण्याचा प्रयत्न केला व त्याच्या आर्वाची-न पद्धतीची टर उडविण्याची खटपट केली. पण तो सगळ्यांसही पुरून उरणारा होता. दुसरा प्रसंगः—भिकाऱ्यांची सुधारणा करावी, वेड्यांकरितां दवाखाने बांधावे, धर्मप्रसार करावा वगैरे बोलणीं झाल्यावर त्यानें शां-

* एक प्रसिद्ध वक्ता. याच्या बुद्धीविषयीं अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत.

† पार्लमेंट कायदे करण्याकरितां दोनदां बसतें व तें जेव्हां कायदे करण्यास बसतें त्या कालास ( Session ) 'अयन' अशी संज्ञा आहे.

‡ प्रतिपक्षाचा नायक.

तपणानें आपल्या देशांतील कामकरी लोकांच्या आवश्यक रोटीवर जो विलक्षण कर आहे तो काढून टाकावा व सर्व देशहित करावें आणि धान्यावरील जकात माफ करावी; ह्मणजे देशस्थ कारखान्यांतील मजूरदारांस काम मिळून त्यांचें अन्न स्वस्त होईल, अशा अर्थाचें जोरदार भाषण केलें. शेवटीं तो ह्मणाला "मनुष्यजातीवर आपली भक्ति आहे असा तुह्मी को आव आणतां हें मला माहीत नाहीं; पण येवढेंच सांगतों कीं जर तुमच्या बोलण्यास जोम व सौन्दर्य आणावयाचें असेल तर पातालवासी निग्रोंची काळजी करून अगर धर्मालयें बांधून अगर खिस्ती धर्माचा प्रसार करून अगर एखादे वेळेस कारखान्यांत जाऊन तेथील पोरांशीं मिट्ठें बोलणें करुणरसानें बोलून हें साधावयाचें नाहीं. तुह्मी गरीबाचें अन्न विनकराचें कराल तर मात्र तुमची देशभक्ति खरी." टोरी मंडळी यास चिरडून टाकावा ह्मणून प्रयत्न करीत पण सर्वत्र याची हळु हळु ख्याति होऊन तो सर्वांच्या नजरेसमोर येत चालला. पीलनें आपलें अंदाजपत्रक आणलें त्यामधील खर्चाच्या रकमा वाटेल तशा मंजूर होत आहेत हें पाहून याच्या अंगाचा तिळपापड झाला पण करतो काय? मूग खाऊन त्यास स्वस्थ बसावें लागलें.

काब्डेनच्या बोलण्यानें समाजाच्या मोठ्या एका शक्तिमान वर्गांत स्ववर्चस्वस्थापनाचा नवा जोम तयार झाला हें सिद्ध झालें. पुढील पांच वर्षांचें भांडण ह्मणजे जकातरद्दीबद्दल नव्हे तर जमीनवाले बडे लोक व वतनदार उद्योगपंथी व्यापारी ह्यांचा राजकीय वर्चस्वाबद्दल व सामाजिक समता मिळविण्याबद्दल झालेला तंटा होय. नव्या वर्गाकडून प्राथमिकपद पटकावण्याचा हा सजीव पहिला प्रयत्न पाहून पौराणिक समाजास जें सरोषाश्चर्य वाटलें त्याची कल्पना त्यावेळेचा पत्रव्यवहार वाचल्याशिवाय व त्यावेळेच्या मनुष्यांशीं बोलल्याशिवाय येणें कठीण आहे. काब्डेन व ब्राइट हे ह्या नवीन वर्गाचे पुरस्कर्ते होत. या नवीन होतकरू लोकांचें धुरीणत्व पत्करून त्यांनीं २५ वर्षेपर्यंत लढाई चालविली व शेवटीं पुराणपंथास हाणून खालीं पाडलें.

# भाग सहावा.

## काब्डेन–संक्षोभक.

१८४१ मध्यें **काब्डेन** व **ब्राइट** यांचा पवित्र स्नेह झाला. या मैत्रीच्या योगानें जकातमाफीच्या संक्षोभनास विशेषच जोर आला. त्यांची ही मैत्री आमरणांत एकही ढग आल्यावांचून राहिली. "**राचडेल** येथें विद्याविषयक सभेमध्यें आपण व्याख्यान द्यावयास याल काय ह्मणून विचारावयास मी १८३७ मध्यें **काब्डेन**कडे गेलों. आपल्या-प्रमाणेंच इतर लोक ह्या प्रश्नाच्या संबंधानें वाटाघाट करीत आहेत हें पाहून त्यास आनंद झाला. बोलावयाची शक्ति जोपर्यंत होती तोपर्यंत त्याच्या वक्तृत्वांत जे गुण होते ते तो तरुण होता त्या-वेळेस सुद्धां चांगले दिसून आले. स्पष्टपणा, मुद्देशारता, व्यवहार-योग्य वक्तृत्व हे गुण त्याच्या पुढें मुर्तिमंत असत. त्याच्या तोंडावरील प्रफुल्लता व डोळ्यामध्यें असणारी सत्यसंबद्ध मनमो-हकता ह्यांचें वर्चस्व श्रोतेजनांवर एकदम होत असे." असें **ब्राइटनें काब्डेन** इह लोक सोडून गेल्यावर त्याचा पुतळा उघडतांना सांगितलें. उभयतांच्या स्नेहास याप्रमाणें १८३७ मध्यें प्रारंभ झाला. नंतर लवकरच **क्लु**टाची स्थापना होऊन **काब्डेन** पार्लमेंटांत शिरला.

पहिलें अयन संपलें. १८४१ मध्यें लोकांचें दुःख जास्तीच वाढ-त चाललें. या वर्षी **ब्राइट** साहेबाची पत्नी गतप्राण झाल्यामुळें तो खिन्नवदन होऊन प्रपंचास उदासीन झाला होता. "**काब्डेन** म-जकडे आला त्यावेळीं माझ्या घरांतील उजेड व सूर्यप्रकाश नाहीं-सा झाला होता ह्मणून मी क्लेशांधकारांत पंगू होऊन राहिलों होतों. त्यानें आल्यावर माझें शांतवन करण्याचा प्रयत्न केला पण तो सि-द्धीस जात नाहीं असें पाहून ह्मणाला 'मित्रा! याक्षणीं इंग्लंडमध्यें हजारों बायका, आया, आणि मुलें भुकेनें तडफड करून मरत आहेत, त्यांचें दुःख तुमच्या लक्षांत येत नाहीं काय? चला तुह्मी आम्ही मिळून त्यांचें दुःख निवारण करूं. आपला हा संबंध 'धान्यकायदा' रद्द झाल्याशिवाय तोडावयाचा नाहीं. उठा, दुसऱ्याचे हाल कसे होतात हें कळण्याकरितां ईश्वरानें तुह्मास दुःखांत घातलें आहे, तर परदुःखविमो-

धमानें आपलें स्वतःचें दुःख निवारण करा. त्यानें सांगितलेली गोष्ट खरी आहे असें पाहून मीही विवेक केला व त्यावेळेपासून त्याची संगत धरून संक्षोभन करण्याचा प्रयत्न करूं लागलों." मजूरदारांस अर्धी रोटी असावी अगर सगळी असावी याचा वाद् सारखा सात वर्षे चालला होता. त्यांपैकीं शेवटच्या ५ वर्षांत तर या दोघांनीं घरच्या कामास रजा देऊन प्रत्येक कामाची घटका या विषयाच्या प्रतिपाद्नाकडे यत्किंचितही कसूर न करितां लावली. या संक्षोभनांत पुष्कळ लोक होते परंतु संसारास लाथ मारून सार्वजनिक कामांत सर्वथैव शिरलेले हे दोघेजणच होत. संसाराचा त्याग करून, चालत्या धंद्यास रजा देऊन सर्व राष्ट्रभर आपल्यासारखें लोकमत व्हावें ह्मणून हिंडणाऱ्या या दोन साध्या धर्ममूर्ति पूर्वकालीन सन्याशांची आठवण देत असत. राजकीय संक्षोभनाच्या प्रचलित रीतींहून यांची तऱ्हा फारच निराळी होती. त्यांच्या प्रत्यक्षदर्शनानेंच लोकांचीं मनें त्यांच्या पक्षाकडे वळत. या दोघांची परहितकारी प्रचंड महायात्रा नाट्यकलेप्रमाणें मनोरम झाली. आपल्या श्रोतेजनांचा अंतःकरणौघ आपल्या म्हणण्याकडे वळविण्यासारखें कांहीं बोलावयाचें होतें ह्मणूनच ते वक्ते झाले. आपण वक्ते अशी कीर्ति मिळविण्याकरितां झाले नाहींत. सुदैवानें त्यांचें बोलणें सत्य, न्यायी व हितकारी असें होतें.

काब्डेनच्या अंगीं संक्षोभनसंप्रदायाचे गुण मुळींच नव्हते ह्मटलें तरी चालेल. नाटकी आविर्भावास योग्य शारीरिकसंपत्ति त्याला देवानें बिलकुल दिली नव्हती. लहानपणीं तो आटपसर बांध्याचा होता. पुढें उतारवयांत मात्र वायूनें त्याचें आंग फुगलें. त्याचें डोकें मोठें असून आपल्या कामांत खंबीर होतें. डोळ्यांमध्यें विलक्षण प्रामाणिकतेचें पाणी झळकत असे. त्याचा तोंडवळा मोहक नव्हता तरी बुद्धीच्या, मनोदारतेच्या व उत्साहाच्या प्रकाशानें त्याचा चेहरा तेजःपुंज दिसे व यामुळें तो मनाकर्षक होत असे. अंतःकरण वश करणारी त्याच्या जेवणीची ठेवण होती. त्याचा आवाज स्वच्छ, गोड, ठांसून येणारा व भिन्नरसांना अनुकूल असा असे. परंतु लोकसमूहाच्या झुंडीच्या झुंडी भाषण ऐकण्यास याव्या अशी व्यापकता अगर पहाडीपणा त्याच्या आवाजामध्यें नसे. त्याच्या आंगांत आवेशाग्नि पुष्कळ असे, पण हा अग्नि बलाढ्य कल्पनेच्या एकवर्णाभिस ज्वाळा उत्पन्न करणारा नव्हता.

संशयविच्छिन्न विचारशक्ति, बुद्धिकौशल्य आणि वाद्प्रखरता. यांच्या योगानेंच काय तो हा अग्नि प्रकाशित असे. पारदर्शक प्रामाणिकपणा, कल्पनावैशद्य आणि नियतकार्यपरता यांपासून त्याच्या आवेशाचा उद्भव होता. त्यानें ज्या विषयांचा अंगीकार केला होता त्यास हेच गुण अवश्यक होते. ब्राईट व काब्डेन यांमध्यें गुणसाम्य पुष्कळच होतें. दोघांसही अलंकारिक भाषणांचा कंटाळा असे. आपल्या कार्यास योग्य अशी कसलीही भिकार गोष्ट सांगण्यास ते कमी करीत नसत. ते दोन्ही पक्षांपासून अलग रहात. परंतु त्यांची राजकीय नीति व भूनद्या विलक्षण जोरदार असल्यामुळें त्यांस कधींही धोका आला नाहीं. उभयतांचेही दृष्टांत घरगुती असून दोघांचा साधेपणा चित्र काढण्यासारखा असे. परंतु ब्राईटचा प्रकोपाग्नि प्रखर असून नेहमीं प्रज्वलित असे. 'श्रेष्ठांचा' व इनामदारांचा आपमतलबीपणा पाहून त्याविषयीं त्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला होता, ह्मणून त्यांच्याशीं वादविवाद करितांना त्याचें देहभान कायम रहात नसे. त्याचे भाषणांतील त्वेष नुसता क्रोधज नव्हता. तो त्वेष खोल असून भीति उत्पन्न करणारा होता, ह्मणून त्याचें वजन पडून लोक त्याच्या बोलण्यानें दडपून जात. पण काब्डेन वाग्युद्धांत सर्वांस मित्रत्वाच्या नात्यानें वागवी. तो रागावला ह्मणजे ब्राइटइतकाच भयंकर होई. वाग्युद्ध करण्याचें त्याचे मनांत येऊन त्यानें चढ्ढीकाचा भिडविल्यानंतर मागें *मुसांडी घेऊन पटकन पेंच घालूं लागला कीं प्रतिस्पर्धी घाबरे होऊन मागें थबकत. पण असले प्रसंग क्वचित् येत. त्याचा मुख्य गुण 'मन वळविणें' हा होता. त्याचा साधेपणा, कळकळ, मनाची खातरी, आणि विशदीकरण करण्याची विलक्षण हातोटी या गुणसमुदायामुळें लोकांचें अंतःकरण त्याकडे ओढत असे. वेळेला प्राप्त झालेलें प्रमेय तयार करण्याची त्याची कुशाग्रता असाधारण होती, व तें तो अशा गोड व स्वल्प रीतीनें करी कीं कसलाही मंदधी श्रोता असला तरी त्यास तें पटापट समजून त्याची खातरी होत असे. त्याचा आनंदी स्वभाव आणि नवीन आक्षेप आला असतां त्याची गांठ घेण्याची जय्यत तयारी, हेही गुण लोकांचीं मनें गोंवण्यास कारण झाले. हलकटपणानें अगर पोकळ गर्वानें उत्पन्न होणारी त्याची धिटाई नव्हती. त्याचा धीटपणा निराळा असे. आप-

त्या प्रतिपाद्य विषयाची खातरी असे ह्मणूनच ज्ञान आणि तर्कशास्त्रादि साधनांनीं सिद्ध होण्यासारखा पदार्थवाद असला कीं काब्डेननें जिंकलीच!

धान्याच्या कायद्याविरुद्ध कट झाल्याबरोबर अपरंपार माहिती येऊं लागली, त्याखालीं दडपून न जातां उपयुक्त गोष्टी, ठसणारें उदाहरण, अगर नवीन आक्षेप, हे दिसल्याबरोबर तो त्यांचा संग्रह करी. नित्य वाढत जाणाऱ्या माहितीच्या पर्वतांतून हिंडतांना फल्गू सोडून देऊन सार तेवढें तो खाड्कर शोधून काढी. तोच मंत्र, तींच तत्वें, तींच उदाहरणें, व तींच वाक्यें सांगण्याची पाळी पुनः पुनः आली तरी तो कधींही डगला नाहीं. त्याचें बोलणें नेहमीं टापटिपीचें, मुद्देशीर, व पूर्णत्वानें सिद्ध, असें असे. तो आपली मर्यादा कधींही सोडीत नसे. आपला विषय काय, श्रोतेजन कोणत्या मासल्याचे, त्यांचे लक्ष्यांत काय राहील वगैरे सर्व गोष्टी त्याच्या ध्यानांत असत. प्रचलित सिद्धांताभासास काय उत्तरें द्यावीं हें तो आपलें कर्तव्य समजून दिलेल्या वेळांत संरक्षकपंथी लोकांचे किती वाकूछल खोडून टाकावयाचे याचें त्यानें प्रमाणच बसविलें होतें. मर्मच्छेदी, थट्टास्पद, कुत्सित, कारुण्यपूर्ण, वगैरे अलंकारशास्त्रांत नमूद असलेल्या साधनांचा अभाव असतांनाही त्याचें भाषण कधीं कंटाळवाणें झालें नाहीं. वक्तृत्वाचें लक्षण असें देतात कीं विकारावगुंठित विचार ह्मणजे खरें वक्तृत्व; ह्मणजे, लोकांचीं मनें मोहून त्यांच्या विचाराची गतीच कुंठित करणें ह्मणजे वक्तृत्व!! पण याचें तंत्र निराळेंच होतें. त्याची सरस्वती स्वोत्साहानें परिपूर्ण भरलेली असे त्यामुळें व्यासपीठावर त्यासारखा वक्ता झालाच नाहीं. त्याचा आनंदी स्वभाव, सौकर्य, ऋजुता, सहजता, सात्यकीत्व यांनीं व इतरत्र वक्त्याश्रोत्यांमध्यें न दिसणारा मित्रभाव व उघड असलेली मनोदारता या योगानें त्याच्या श्रोतेजनांनीं ह्याला पाहिल्याबरोबर त्यांस आनंदाची उकळी फुटे, व त्याविषयीं पूज्यबुद्धि होऊन त्याचा निष्कपट स्नेह करावा अशी त्यांस इच्छा उत्पन्न होई. मनुष्याचें अज्ञान पाहून तो कधींही संतप्त झाला नाहीं. राजकीय व व्यापारिक महत्वामें उत्पन्न झालेले स्पष्टपणा, सत्यप्रियता वगैरे गुणांबद्दल आपल्या देशबंधूंचा त्यास मोठा अभिमान असे. यामुळें त्यांच्यापुढें बोलतांना त्याचेकडून सन्मानपर शब्द येत असत, व हें पाहून त्यांच्याही मनांत त्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न झाला होता. लोकांस पूज्य वाटत असलेल्या धर्मपंथावर

त्याची पूर्ण श्रद्धा होती. (व ही प्रत्येक संक्षोभकास आवश्यक आहे). धर्मपंथानें चालणारे लोक त्यास आवडत असत. मनुष्यास मोठमोठालीं कृत्यें करण्यास उत्साह देणारें 'धर्मश्रद्धा' हें उत्कृष्ट साधन आहे अशी त्याची समजूत असे, व "या धर्मश्रद्धेमुळें मी धान्यकायद्याच्या भांडणांत विजयशाली झालों व यापुढें बुद्धिवर्धक व नीतिशिक्षक विद्येचा धर्मशिक्षणाशिवाय फैलाव व्हावा असें मी प्रतिपादिल्यास माझ्यावर कोणाचीही इतराजी होणार नाहीं," अशा सार्चीचे त्याचे लेख आहेत. त्याच्या पारदर्शक प्रामाणिकतेविषयीं कधींही कोणास संशय आला नाहीं. कांहीं सामाजिक हेतु ठरवून ते आपण सिद्धीस नेऊंच नेऊं असें त्यास खास वाटल्यावर भेटेल त्यास कच्ची हकीकत सांगणें ह्मणजे आपल्या हातानें कार्यविध्वंस करणें आहे असें समजून तो सावधगिरीनें गप्प राहत असे. कार्यशील मुत्सद्यास नेहमीं हाच मार्ग पत्करावा लागतो. तो वेळेस एकच काम हातांत घेई. सतरा पंधरा कामांमध्यें लडबड करीत नसे. त्याची समजूत होती कीं "आपला उपयोग जर लोकांस करून द्यावयाचा आहे तर मनुष्यानें आपल्यास साधेल व साजेल असें एकच काम हातीं घ्यावें, व दुसऱ्या विषयांवरील आपलीं मतें फार सावधगिरीनें बोलावीं." या योग्य व्यवस्थेमुळें मनुष्यप्रगमनाचीं कांहीं तत्त्वें त्यानें त्या वेळच्या व्यवहारराजनीतीच्या आटोक्यांत आणून सिद्धीस नेलीं. इतर विषयांमध्यें त्यांनें आपल्या मतांसारखें बहुमत केलें नाहीं हें खरें, पण त्यानें एक प्रबल अल्पपक्ष तयार करण्याचें कठीण काम सिद्धीस नेण्याचें श्रेय घेतलें.

कामाच्या संबंधानें पाहिलें तर तो मोठा जहांबाज होता. शत्रूचा मित्र करणें, विरुद्धपक्षाची जागा काबीज करणें, देशस्थ लोकांपुढें कटाचे हेतु आणणें, व नित्य नवे उपाय शोधून काढणें, ह्या कामांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. त्याच्या अंगामध्यें सेनापतीचें धैर्य, दक्षता, कार्यतत्परता, युक्तिबाहुल्य, उत्साह, शांतता आणि सौजन्य हे गुण असत. त्याच्या स्वभावांत कटुता इतकी थोडी होती कीं सात वर्षें संक्षोभन करून त्यानें एकही शत्रु संपादिला नाहीं, अगर एकाही व्यक्तीचे मनास दुखविलें नाहीं!! आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं त्यानें आपला मनोजय

कधींही मोकळा सोडला नाहीं. मोठमोठे वक्त्यांची पुढें अशी स्थिति होते कीं सत्यप्रतिपादनापेक्षां लोकांच्या मनांवर ठसा उंमटाविण्याविषयींची इच्छा प्रधान होऊन मोठमोठ्या सभा हेंच आपलें जन्मसाफल्य व गर्जनायुक्त पुष्कळ वेळ चालणारा टाळ्यांचा व स्तुतिपाठाचा गजर हेंच इंद्रभुवन असें वाटूं लागून गर्वानें व आत्मश्लाघेनें ते लोक अगदीं चिघडून जातात. पण परनिंदा करून बढाई मिरविण्याचें काब्डेनचें ब्रीदच नव्हतें. नाहीं ह्मणावयास एकदां मात्र त्याच्या तोंडांतून मुख्यप्रधानाविषयीं अपशब्द गेले होते व ते तसे जाण्यास कारणही होतें. तथापि त्याचें त्यास वाईट वाटून उभयतांनींही एकमेकांच्या क्षमा मागितल्या. याच वेळेस त्यास *मिस मार्टनूचें त्यानें उच्चारलेले अपशब्दांबद्दल सरोष पत्र आलें त्याचें उत्तर चटकदार आहे सबब तें येथें घेतों. "मी या जंगी सभांत जें बोलतों त्यावरून माझी पारख करूं नका. लोकांचें मनोरंजन केल्याशिवाय त्यांस शिकविणें हें काम अशक्य आहे. ते सभेंत येतात ते गंमत पाहण्याकरितां, आपली स्तुति ऐकण्याकरितां व चेकळून जाण्यारितां येतात. त्यांस नुसतें उपदेशपर व्याख्यानें देत बसलें तर ते पहिल्यांदा मात्र येतील. दुसऱ्या वेळेस ढुंकून सुद्धां पाहणार नाहींत. ते अनेक वेळ यावे अशी आह्मांस गरज असल्यामुळें मला गारुडी विद्येनें—डोक्यावर उभें राहून अगर विस्तव खाऊन नव्हे—त्यांच्या स्वाभिमानास, युद्धनिपुणत्वास, अगर त्यांच्या थट्टेखोर स्वभावास उल्लेखून भाषण करावें लागतें. या गारुडाचें पर्यवसान अर्थातच हांजी हांजी करणें, मत्सरयुक्त बोलणें, व अपशब्द उच्चारणें यांत कधीं कधीं होतें. मी या कचाट्यांतून इतका चांगला निभावलों कसा याचें मलाच आश्चर्य वाटतें. मी स्वभावतः सभापति नाहीं. सभेंत बोलावयाचें ह्मणजे मला मोठी जिकीर पडते. कर्तव्य असलें अगर उपयोग होणार असला तरच मी बोलतों. तेव्हां स्तुतिविषानें माझें माथें फिरेल असें स्वप्नींही आणूं नका. माझी लोकांपुढें यावयाची अवश्यकता संपेल त्या दिवशीं मी आपल्यास सुखी मानीन व आनंदानें या कामाची रजा घेईन."

---

* एक विदुषी मुलगी. हिनें हिंदुस्थानचा इतिहास, अर्थशास्त्रावर गोष्टी वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. पुष्कळ दिवसपर्यंत ही विलायतेंतील एका पत्रास नेहमीं निबंध लिहीत असे.

# भाग सातवा.

## नवीन धान्यकायदा.

१८४२ सांतील हिमायन सुरू होण्यापूर्वी प्रधानमंडळीकडून धान्याच्या कायद्यासंबंधानें कांहींएक झालें नाहीं ह्मणून उत्तरेकडील मंडळी संतापली होती व त्यांनीं हें प्रधानमंडळ हांकून देण्याकरितां खटपट सुरू केली होती. त्यांस काब्डेननें सुरेख पत्र लिहून त्यांचा कोप शांत केला, व त्यांस 'गम खा' ह्मणून उपदेश केला; तथापि लोकमत वळविण्याचें संक्षोभन त्यानें चालू ठेवलेंच होतें. डरबी येथें मोठी सभा भरली होती, त्यांत त्यानें कपटपटु इनामदारांवर सणसणीत हल्ला केला. उद्योगी कारखानदार लोकांच्या मोठमोठ्या जागांतून सभा करून, अर्ज पाठविणें व जिल्हानिहाय प्रतिनिधींची सभा भरविणें, इत्यादि गोष्टी अवश्य आहेत ह्मणून सांगितलें. व्यापाराच्या स्थितीची, मजूरीच्या दराची व भिकाराच्या विस्ताराची वगैरे माहिती, धान्याच्या मक्त्यानें किती नुकसान होत आहे हें दाखविण्याकरितां मागितली; व लीड्स येथील लोंकरीचा व्यापार, वुल्व्हरहाम्पटन येथील लोखंडाचा व्यापार, पाटरीजचा मृद्भाड्यांचा व्यापार, डंडीचा जवसाचा व्यापार व मांचेस्टर आणि ग्लास्गो येथील कापसाचा व्यापार इत्यादिकांवर या कायद्यानें काय परिणाम झाला आहे त्याची माहिती मिळविण्यास मनुष्य पाठविले.

व्याख्यात्यांनीं आपलें पर्यटण सुरू केलें. या वेळेसही कित्येक ठिकाणीं दगडांचा व काठ्यांचा मार खावा लागला. याच वर्षी लंडन येथें बाजार भरवून कटाकरितां दहा हजार पौंड मिळविले. यांत निव्वळ पैसे उकळण्याचाच बेत नव्हता तर सर्व व्यापारस्वातंत्र्यवाल्यांनीं एकत्र जमावें व लोकांस आपली चळवळ किती सिद्धीस गेली हें दाखवावें, हा मूळ उद्देश होता. यावेळीं वर्तमानपत्रें विशेष शिव्या देत नव्हतीं. या वर्षी आपली हकीकत कळविण्याकरितां, प्रत्यहीं आपल्या विषयाचें नवीन तऱ्हेनें प्रतिपादन करण्याकरितां, स्वशत्रूंचीं मतें खंडन करून त्यांनीं ज्या गोष्टी गृहीत केल्या असतील त्या नमूद करण्याकरितां आणि काब्डेन, ब्राइट व फाक्स यांचीं भाषणें प्रसिद्ध करण्याकरितां एक वर्तमानपत्र काढलें. त्यांत एकाच विषयाचें निरनिराळ्या दिशेनें प्रति-

पादून केलें असल्यामुळें व गरीब लोकांचीं करुणपूर्ण गाणीं, धान्याच्या कायद्याविरुद्ध स्तोत्रें इत्यादि चमत्कारिक गोष्टींचा संग्रह, आणि गरीब लोकांचीं दुःखें दाखविणारीं गमतीदार चित्रें काढलेलीं असल्यामुळें तें वर्तमानपत्र मनोरंजक होऊन फारच लोकप्रिय झालें.

पार्लमेंट भरण्याची वेळ येत चालली. प्रधानपक्षांतील एकानें राजीनामा दिला त्याचें कारण मुख्य प्रधान धान्याच्या कायद्यामध्यें फेरफार करणार हें होतें. हें ऐकून सर्व लोक काय होतें तें पाहण्यासाठीं -कोणी आनंदानें व कोणी भयानें-अगदीं उतावीळ झाले. या वेळेसच टोरी पक्षाच्या चिंधड्या उडावयाच्या; पण मुख्य प्रधानाच्या शहाणपणानें तें संकट टळलें. ५६ शिलिंगांनीं गहूं असलें ह्मणजे ८ शिलिंग जकात देवावी व जितकी धान्याची किंमत चढेल तितकी जकात कमी, व कमी होईल तितकीच जकात जास्ती अशा तऱ्हेचा मसुदा काब्डेनच्या दृष्टीस पडला. कटाच्या सभासदांनीं पीलकडे बोलण्यास प्रतिनिधि पाठविला, पण कार्यबाहुल्यामुळे त्यांच्याशीं बोलण्यास पंतप्रधानास सवड झाली नाहीं. *टाइम्स पत्रानें कटाच्या उद्धटपणाबद्दल त्यांची मन मानेल तशी निंदा केली. प्रधानाच्या मसुद्यानें उत्तरेकडे समाधान बिलकुल झालें नाहीं. कटाची ही ओरड बंद करण्याकरितां पील ह्मणाला कीं "सध्यां जी दुःखावस्था आहे त्यास अनेक कारणें आहेत. कारखान्यामध्यें कर्जाऊ काढलेल्या भांडवलाची झालेली गर्दी, हाताचा माग जाऊन त्याबद्दल वाफेच्या मागाचें अवलंबन, अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांमध्यें नाण्याचे संबंधानें आलेली अडचण व त्यामुळें तिकडच्या व्यापाराची मंदी, चीनच्या व्यापाराची बंदी, युरोपांत लढाईची ओरड व त्यामुळें व्यापारांत झालेली चलबिचल हीं सर्व देशांतील दुःखाचीं कारणें आहेत. धान्यावरील जकात बंद केल्यानें हीं कारणें नाहींशीं होत नाहींत व ह्मणून तो सद्यःकालीन दुःखविमोचनाचा उपायही नव्हे. आतां धान्याच्या कायद्यामध्यें सुधारणा करणें शक्य आहे व त्याप्रमाणें ह्या मसुद्यामध्यें सुधारणा केली आहे; या कायद्यानें इनामदार व शेतकरी यांचा कोणाचाही तोटा होणार नाहीं." यावर काब्डेन-"जो वाटच पाहत होता"यानें येवढेंच सांगितलें कीं "सध्यांचा मसुदा आगींत पोळलेल्या गरीब लोकांची थट्टा करण्या-

* विलायतेंतील प्रमुख वर्तमानपत्र.

करितां पुढें आहे; व त्याची जितकी निंदा करवेल तितकी करण्यास मी मागें पुढें कधींही पाहणार नाहीं." धान्याच्या किमतीच्या मानानें कराचा आकार बसविणारी पद्धति पुनःकायम झाली हें पाहून सर्व कारखानदारांचें पित्त खवळलें. उघड्या जागेवरील सभास्थानें संतप्त झालेल्या लोकांच्या झुंडींस पुरेनाशीं झालीं. वारापाणी न जुमानतां त्यांनीं प्रधानमंडळीविरुद्ध ठराव केले. मुख्य प्रधानाचें बाव्हलें करून त्यास फांशीं दिलें. निर्दय आणि अधाशी कुलीन लोकांच्या लाभाकरितां गरिबांच्या हक्कांचा होम करणारा, लाखों लोकांस दरिद्री ठेवून एका वर्गाची संपत्ति, चैन, व शोभा वाढविणारा जो पील त्याच्या प्रतिमेवर खटला करून, चौकशी करून, देशद्रोही ठरवून तास आग्निदग्ध केलें!!

प्रधानास १२३ मतें जास्त मिळालीं. तथापि व्हिलीयर्स याणें जकात अजीबात बंद करावी अशी सूचना आणली त्यावर ५ रात्री वादविवाद झाला. त्यांत कॉब्डेन शेवटच्या रात्रीं बोलला. त्यानें मुख्य प्रधानाच्या समजुतीचें खंडन करण्याचा प्रयत्न केला. बोलतांना "आमचे उत्तरेकडील कारखानदार टोरी मंडळीपेक्षां पुष्कळ जास्त माहीतगार आहेत व १८१५ मध्यें दोन्ही पक्षांस मान्य असा धान्याचा कायदा झाला, तेव्हां विद्या नसणाऱ्या आमच्या लोकांनीं पटदिशीं सांगितलें कीं धान्याची किंमत कृत्रिमत्वानें वाढविली कीं मजूरी कमी झालीच." कॉब्डेन बसल्याबरोबर एक सभासद उठून मनास येईल तें कॉब्डेनच्या व कारखानदारांच्या विरुद्ध बरळला, पण त्याला सारख्या टाळ्या मिळत होत्या. देशांतील मुख्य वर्तमानपत्रकर्त्यानें लिहिलें कीं ग्रेटब्रिटनमधील सर्व कारखानदारांचीं घरें नाहींशीं झालीं तर इंग्लंडच्या मोठेपणांत व शक्तींत एक रजभर कमी न पडतां तें आहे तितकेंच श्रीमंत राहील!! पण कॉब्डेन या कोल्हेकुईस मुदलीच भ्याला नाहीं. त्यानें येवढेंच सांगितलें कीं "आपण जें भाषण ऐकिलें व ज्यास इतका सन्मान मिळाला त्याच्यायोगानें या हाउसची अब्रू मात्र कमी होईल." इतकी त्याच्याविरुद्ध मंडळी होती तरी ही जकात ४ वर्षांतच नाहींशी होईल असा ध्वनी दोन्ही पक्षांत निघूं लागला होता!!

आपल्या आशेविरुद्ध झालेला निकाल पाहून कटांतील मंडळींचे हातपाय गळूं लागले परंतु कॉब्डेन डगमगला नाहीं. अर्ज करण्याचें सोडून देऊन त्यानें आतां शहरें पछाडण्याचा व जेथें खूप विरोध येईल तेथ

जाण्याचा निश्चय केला; व पुढील निवडणुकींत आपले लोक प्रतिनिधि-सभेंत जास्ती आणण्याची खटपट चालविली. शहरांचे विभाग, 'सुरक्षित, सुरक्षितादाखल, संशययुक्त, व अजिक्य' असे करून 'संशययुक्तावर' हल्ला करण्याचा ठराव केला. पण हळूं हळूं सर्वत्र शांतता होऊन स्थिर मनानें विचार झाल्यावर शेतकी इलाख्यांत संक्षोभन सुरू करावें असें त्यानें मनांत आणिलें. कारण टोरीपक्षांतील पुष्कळ तरुणलोक मनांत लिबरल आहेत असें त्यास आढळून येत होतें. शिवाय शांततोत्पादक मंडळींत आपण व्यक्तिशः जाऊन मिळावें असा त्यानें बेत केला. व्यापारस्वातंत्र्य होऊन प्रत्येक देशाची एकलकोंडें राहण्याची जी तऱ्हा आहे ती नाहींशी झाल्याशिवाय युद्धाचा अभाव होणार नाहीं, व वसाहतीची चालू पद्धत—जिच्यामुळें गेल्या १५० वर्षे लढाया झाल्या—सुधारणार नाहीं, हें तो जाणत होता म्हणून व्यापारस्वातंत्र्यानें प्रत्येक देशास दुसऱ्यावर अवलंबावें लागून सरकारच्या हातून लढाईचीं सूत्रें निघून जातील व लोकस्वातंत्र्यास पूर्णत्व येईल असें त्याचें मत होतें. धान्यकायद्यासंबंधी मतांबद्दल धर्मोपदेशकांवर व राजकीय निवडणुकींतील लचाडीबद्दल राजकीय पक्षावर हल्ला करण्यास त्यानें ब्राइट यास लिहिलें. उपासकांचीं देवालयें जास्त बांधण्याबद्दल त्याकडे जेव्हां वर्गणीची याद आली तेव्हां त्यानें साफ सांगितलें कीं "लोकांचें अन्न स्वस्त झाल्याशिवाय व त्यांची दुपारची भ्रांत कमी झाल्याशिवाय त्यांच्या नीतिशिक्षणाची व्यवस्था करणें मूर्खत्वाचें काम आहे, शिवाय त्यांस अन्न मिळवून देण्याकरितां मला जितकी यथाशक्ति मदत करवली तितकी केली आहे. अन्नाची अवश्यकता पहिली आहे, नीति, धर्म अगर विद्या ह्या गौण गोष्टी आहेत. तेव्हां पहिली गोष्ट सिद्ध झाल्याशिवाय दुसऱ्या गोष्टीस एक तनसडीसुद्धां माझ्याकडून मिळणार नाहीं."

धान्यकायद्याचे तीन अंकी नाटकांतील पीलचा पहिला मसुदा हा प्रथमांक होता. त्या वेळीं देशाची खराबी होत चालली होती, वसूल कमी होऊन खर्चाचे व उत्पन्नाचे तोंडमिळवणीस २५ लाख पौंडांची तूट आली होती. लोकसंख्या वाढत गेल्यामुळें लोकांस धंद्याची मारामारी पडूं लागली होती. या सर्व दुःखशमनास व्यापारस्वातंत्र्य हा मॅंचेस्टर-पंथाचा उपाय होता. मुख्य प्रधानास तो उपाय प्रधान वाटला नाहीं-

तथापि त्यानें अंदाजपत्रक तयार केलें तें बहुतेक अंशीं व्यापारस्वातंत्र्याच्या धर्तीवरच केलें होतें. फक्त त्यांत धान्यावरील जकात सोडली नव्हती ती कांहीं अंशीं आपल्या अल्पमती सैनिकांच्या आग्रहास्तव व कांहीं केवळ स्वतांच्या संशयाकुल मनाच्या भित्रेपणास्तव. दुसऱ्या देशावर अन्नाकरितां आपण अवलंबून राहणें हें त्यास शहाणपणाचें वाटलें नाहीं. तथापि त्यानें मुख्य व महत्वाची सुधारणा ही केली कीं व्यापारांतील बऱ्याच जिनसांवरील जकाती सोडून देऊन प्रत्यक्ष कर घेण्याची सुरुवात केली व पहिल्या प्रथम जो तोटा होणार होता तो भरून काढण्याबद्दल उत्पन्नावर कर बसविला. कच्च्या मालावर नुस्ती नांवाची जकात ठेविली, व अर्धवट तयार झालेल्या मालावरील जकातीमध्यें बराच फेरफार केला. तथापि साखरेवरील जकात बिलकूल कमी केली नाहीं व धान्यावरील अर्धी जकात कमी केली, याबद्दल सर्व देशांत संक्षोभन करण्याचा कटाचे मंडळीचा विचार ठरला. हें अंदाजपत्रक पाहून सर्व कारखानदारांचा धान्य व साखर यांवरील कर न सुटतां आपल्या नफ्यावर मात्र कर बसला हें पाहून संताप झाला. काब्डेन यासही वाईट वाटलें. त्यास प्रथमदर्शनीं या अंदाजपत्रकाचें महत्व कळलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. परंतु उत्पन्नावरील करानें पुष्कळ लोक व्हिग पक्षास जाऊन मिळतील, व व्हिग पक्ष तर अप्रमाणिक आहे हें ठाऊक असल्यामुळें त्यास विशेष भीति मात्र प्राप्त झाली. देशांतील दुःख तर दिवसानुदिवस जास्ती वाढत चाललें त्यामुळें हाऊसमधील दोन्ही पक्षांकडील प्रमुख लोक व्यापारस्वातंत्र्याकडे वळूं लागले, व असा अदमास दिसूं लागला कीं प्रधान मंडळीस' लवकरच व्यापारस्वातंत्र्याचा कायदा करावा लागेल.] या अयनांत जून पहिलीस देशाच्या दुःखद स्थितीबद्दल वाद विवाद सुरू झाला. काब्डेन याचें पहिलें जंगी भाषण जूनच्या आठव्या तारखेस झालें. पीलनें आपली बूज रक्षण करण्याकरितां केलेल्या भाषणावर हें काब्डेनचें उत्तर होतें. हें फारच सणसणीत असल्यामुळें काब्डेनची जोरदार भाषणशैली व्यक्त झाली. त्यामध्यें एकही वाक्य वायफळ नव्हतें. पीलच्या प्रत्येक मुद्याचें शिस्तवारीनें व विस्तरतः खंडन त्यामध्यें होतें. तें भाषण ऐकून सर्व सभासदांस अतिशय आनंद झाला. देशांतील संकटांची पुनः एकदां काहणी त्यानें सांगितली; व शेवटीं स-

णाला "होकायंत्र व सुकाणूं यांशिवाय आह्मीं आपलें जहाज खवळलेल्या समुद्रांत ढकललें आहे. अर्थशास्त्राची जे लोक टवाळी करितात त्याच लोकांनीं अनंत देशांतून आपले चैनीचे पदार्थ आणावे व गरीब लोकांची भाकर व साखर आपल्या दुष्ट कायद्यांनीं महाग करून टाकावी हें आश्चर्यदायक अर्थशास्त्र नव्हे काय ! आमच्या कारखान्यांतील लोक भराभर देशत्याग करूं लागले. त्याचा प्रत्यक्ष परिणाम आमचे कारखाने बसत चालले हा आहे. ह्या जुलुमी कायद्यास प्रत्यंतर सांपडणें फार कठीण आहे व याचा परिणामही भयंकर होईल असा पक्का अनुमास आहे," तो आणखी ह्मणाला "मी पक्षीयत्वानें भांडणारा मनुष्य नाहीं. ज्या बाजूस मी बसलों आहें तिकडील नायकाच्या विरुद्ध बहुतेक वेळां मत देण्याची मला पाळी येते. या कायद्याचा विध्वंस जो कोणी करील त्यास मी मदत करीन व हा कायदा नाहींसा केल्याशिवाय मी कधींही स्वस्थ बसणार नाहीं. हें देशाचें काम आहे. केवळ मॅंचेस्टरचें नाहीं हें ध्यानांत ठेवा. हे जुलुमी कायदे ठेवणारा दुसरा प्रधान यापुढें मिळणार नाहीं, व तो खटपट करूं लागलाच तर त्या प्रयत्नांत तो मरेल" असें काब्डेन भर हाउसमध्यें बोलून गेला. शेवटीं प्रधानास सांगावें लागलें कीं "हे सर्व उपाय तात्पुरिक आहेत. ह्यांनीं जर देशास फायदा झाला नाहीं तर पाठीमागील माझीं मतें सोडून देऊन देशास सुख होईल असे कायदे आणण्यास मी कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं."

---

## भाग आठवा.

### कटाची कडी तयारी.

ह्याबेळेस काब्डेनचीं घरगुती कामें अगदीं डबघाईस आलीं. काम बघणारा कोणी हुषार मनुष्य नसल्यामुळें त्याचा धंदा बसत चालला. काब्डेनच्या सार्वजनिक उलाढालींची गोष्ट सांगणारास त्याच्या घरगुती हलाखीचा प्रसंग विसरतां कामा नये. घरीं 'नकारघंटा' वाजत असल्यावर मनुष्याची परहितबुद्धि जेथल्या तेथेंच जिरून जाते हा साधारण नियम आहे. परंतु कंदुकसदृशोद्दामि आणि उत्साहपूर्ण असा काब्डेनचा स्वभाव असल्यामुळें घरची फिकीर न करितां तो लोककृत्यांत पु

ढेंच सरसावूं लागला व त्यानें आपला जीवप्राण राष्ट्रीयकृत्यांवर ठेविला. यावेळीं त्यानें मँचेस्टर येथें भाषण केलें त्यांत " हें सर्व संक्षोभन मध्यम वर्गाचे लोकांकडून होत आहे. लोकांमध्यें चळवळ उत्पन्न करणारीं आमचीं सर्व साधनें शांतिमूलक आहेत. टोरीपक्षानें आह्मांस लालूच दाखविली पण आह्मीं तिकडे गेलों नाहीं. व्हिग पक्षापासून आम्हीं निराळे राहिलों. सारांश धान्यसंबंधानें सारा कर तात्काळ रद्द करण्यास जे आह्मांस मदत करतील ते आमचे मित्र व बाकीचे सर्व शत्रू अशा नात्यानें आह्मीं वागत आहोंत", असें सांगितलें. यावेळीं ते दर आठवड्यास शंभर पौण्ड खर्च करीत होते. कान्डेननें सांगितलें कीं लवकर कार्य उरकावयाचें असल्यास दर आठवड्यास १००० पौण्ड खर्चिले पाहिजेत. आजपर्यंत एक लाख पौण्ड खर्च झाले, पण धान्यकायदा जशाच्या तसाच होता !! तथापि निराश न होतां त्यांनीं पुनः ५०,००० पौण्डाची रकम वर्गणीनें जमा केली. कापसाच्या व्यापारांत जरी मंदाई होती तथापि धान्याचा कायदा रद्द झाल्यास आपल्यास माल विकण्यास पुष्कळ बाजार सांपडतील या आशेवर व्यापारी लोकांनीं भराभर पैसे दिले.

या वर्षीं त्यांनीं प्रत्येक नोंदलेल्या मतदारावर हल्ला करण्याचा निश्चय केला. त्यांचें मुख्य हत्यार ह्मणजे शेतकीसंबंधानें व व्यापारासंबंधानें धान्यकायद्याचा कसा जुलूम होतो आहे हें दाखविणारीं प्रसिद्धिपत्रकें होत. मांचेस्टरनेंच आजपर्यंत बहुतेक खर्चाचा बोजा उचलला होता तो काढून सर्व देशांतून वर्गणीची यादी फिरवावी असा त्यांनीं निश्चय केला. नीतीच्या व शांततेच्या हत्यारांनीं तेही मानवी लढाई खेळले. २,७०,००००० लोकांस ह्या प्रश्नाचें शिक्षण देण्याचें काम लहान नाहीं, पण तें सिद्धीस नेण्याचें महत्कृत्य त्यांनीं केलें. गांवोंगांव व्याख्याते पाठविले, चहाची सपीति केली, ट्रेंटनदीच्या पलीकडचा मुलुख काबीज करण्याचें काम कान्डेन, ब्राईट, व आशवर्थ यांकडे आलें, व वर्षअखेरीस पहिले दोघे ओर्दाच्य स्काटलंडावर स्वारी करण्यास गेले. तिकडे त्यांचा विजयच होत गेला. ग्लासगो, एडिन्बर्ग, डंडी, पर्थ, स्टर्लिंग इत्यादि शहरें त्यांच्या हस्तगत झालीं. प्रत्येक ठिकाणीं सभा भरवून लोकांचीं मनें आकर्षून घेतलीं, वाटेंत अतिशय श्रमानें आजारी पडले, तथापि त्यांनीं कर्तव्य सोडलें नाहीं. सर्व शहरांतून त्यांस *स्वातंत्र्यार्प-

---

* स्थानिक हक्क देणाऱ्या.

णपत्रिका मिळाल्या व सर्वांत मोठी गोष्ट ही कीं मोठमोठे इनामदारांस आपल्या भाषणसामर्थ्यानें वळवून घेऊन सर्व स्काटलंड आपल्या स्वाधीन करून घेतला.

परंतु इंग्लंडांत त्यांचा अजून चांगलासा रिघाव होईना. तेथें त्यांस 'असुरी, निर्वाणीचे व सन्मानास अयोग्य' अशीं विशेषणें मिळत असतां 'अर्वाचीन कालांतील अतिशय घाणेरडा व भयप्रद असा हा कट आहे', असें एका त्रैमासिक पुस्तकामध्यें त्यांवर वाग्बाण येऊं लागले. टाइम्स पत्रांत तर काब्डेन व ब्राइट हे " खिदळणारे, पैसेखाऊ, राष्ट्रांत आपल्या धिंगाण्यानें चोहोंकडे आग लावून सोपी प्रसिद्धि मिळविण्याची खटपट करीत आहेत, व दुसऱ्याचे मुद्दे चोरून घेऊन आपण शहाणे असें दाखवीत आहेत," अशीं मानपत्रें येऊं लागलीं ! ! तिसरीक- डून असें ह्मणत कीं 'यांच्या हट्टानें यांचें काम ठार बुडत आहे;' आणि हट्ट काय तर इमानानें आपण स्वतःच अंगावर घेतलेल्या कर्त- व्याचा पुरा शेवट लावण्याची त्यांची इच्छा ! ! कांहीं ठिकाणीं मजूरदा- रांनीं कारखान्यांची नासधूस केली त्याचा आरोपही यांच्याच कपाळीं आला. त्यांच्यावर फिर्यादी होण्याचा रंग दिसूं लागला. प्रधान मंडळाच्या मनांत ही राजद्रोहप्रसारक मंडळी नाहींशी करण्याचें आहे असें लोक उघड रीतीनें बोलूं लागले. या 'बीभत्स कटाच्या नायकास' (काब्डेनास) कसा तरी एकदां चिरडून टाकावा असें शासनकर्त्या वर्गास वाटूं लागलें. ! ! कां आहे कीं नाहीं या जगांत उत्कृष्ट न्याय ! आपला धंदा सोडून देऊन लोकहित करणाऱ्या एकनिष्ट बहाद्दुरास हें बक्षि स ! ! पण ही मंडळी असली विघ्नपरंपरा खिशांत ठेवणारी; विघ्नें जसजशीं जास्त येतील तसतसा यांचा मनोत्सव जास्तच व्हावयाचा ! ! 'प्रा- रब्धमुत्तमजना न परित्यजन्ति,' म्हणजे उत्तम लोक आरंभलेलें कार्य शेवटास नेल्यावांचून कधींही राहत नाहींत, ह्या सत्यवाक्याची सार्थ- कता काब्डेनानें केली.

१८४३चें पहिलें अयन सुरू होण्याचें पूर्वींच १२ दिवस मुख्य प्रधा- नाचा खासगी चिटणीस मारेकऱ्याचे हातून मेला. पोलिसपुढें दिलेल्या जबानीवरून तो मारेकरी पील यास मारण्याची खटपट करीत होता असें प्रसिद्ध झालें. पण तो वेडा होता असें शेवटीं ठरलें. पील जातीचा अ- त्यंत हयवान असल्यामुळें त्याच्या कोमळ मनावर ह्या अपकृ-

त्याचा फारच विलक्षण परिणाम झाला होता. प्रतिनिधिसभेंत राज्ञासंदेशावर वादविवाद सुरू झाला. ५ रात्रींभर ध्यानांत ठेवण्याजोगीं भाषणें झालीं. काब्डन शेवटल्या रात्री बोलला. त्यांत त्यानें लार्ड स्टानले, व मि० ग्लॅडस्टन यांच्या आक्षेपांचें खंडन कुशलपूर्ण युक्तीनीं केलें; आणि भाषण संपवितांना पंतप्रधानाकडे वळून म्हणाला " आमचें मत गृहण केल्याखेरीज देशांतील अस्वस्थता मोडण्यास दुसरा मार्ग नाहीं. तुह्मी इतर लोकांचें मत घेण्यास तयार नाहीं याकरितां या कायद्यापासून होणाऱ्या नुकसानीबद्दल तुमचा पक्ष व तुह्मी जबाबदार आहां. वाढत जाणाऱ्या लोकसंख्येस काम देण्याची तुमची इच्छा आहे खरी, पण तुह्मीं कारखानदारांचा सल्ला याकामीं कधींही घेतला नाहीं. आतां देशांत जी दैन्यावस्था तुमच्या मूर्खपणानें अगर अज्ञानानें उत्पन्न झाली आहे त्याचे खापर तुमच्या डोक्यावर फुटणार.वेळेवर उपदेश केला असतां तुह्मी ऐकिलें नाहीं, याकरितां प्रत्येक सत्य व स्वातंत्र्यप्रिय सभासदानें तुह्मांसच फक्त जबाबदार धरलें पाहिजे. मी पुनः एकवार सांगतों कीं काम मिळण्याची अत्यंत पंचाईत पडूं लागली आणि जीवित्वास अवश्य अशा पदार्थांची टंचाई असली ह्मणजे देशांत दंगे, मारामाऱ्या व खून होतात. आणि हीच स्थिति आतां आली आहे; तुमच्या हातांत राज्यसूत्रें आहेत. आपल्यास वाटेल तसें आपण करा." हें भाषण संपतांच पील साहेबाचें मन त्यास आवरेना. ताडकर उठून त्यानें सांगितलें कीं 'जातीनें जबाबदार याचा कांहीं अर्थ असला तरी असल्या भीतिप्रदर्शक भाषणास भिऊन मला योग्य मार्ग वाटतो तो सिद्ध करण्यास.'--इतक्यांत हाउसमध्यें एकच घोंटाळा होऊन बाकीचें वाक्य ऐकूं आलें नाहीं. शांतता झाल्यावर काब्डननें उठून सांगितलें कीं 'ज्या कामावर मुख्य प्रधान आहेत त्या कामाच्या नात्यानें मी त्यांस जबाबदार धरतों.' पुढें पीलनें अर्धवट क्षमा मागितल्यासारखें उत्तर दिलें. पण पहिला रागाचा झटका 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायानें खट्याळ प्रतिपक्ष्यास गप्प करण्यास पुरे होता. पीलनें आपली गैरसमजूत झाली असें मोठ्या मारामुटीनें कबूल केलें. हें आटपतें न आटपतें इतक्यांत रोबक हा काब्डनवर तुटून पडला. या गोष्टीवरून आपल्यास असा एक दुःखकारक साधारण सिद्धांत ठरवितां येतो कीं सार्वजनिक कृत्यांत पडण्यापूर्वी प्रत्येकानें अनुदार, क्षमाविरहित व मत्सरपूर्ण वागणूक इतरां-

कडून मिळाली असतां ती गिळून जाण्यास आपलें मन तयार केलें पाहिजे. ज्याचें देशांत वजन विपुल व जो बडेलोकांस असुखकर अशा खड्या सुरावर लोकमताची तान नेण्याचा प्रयत्न करीत असतो, त्याच्यावर हाउसची गैरमर्जी असावयाचीच व ह्या न्यायानें काब्डेन हा तेथें कोणासही आवडत नसे व त्याची कधी नागी फजिती केव्हां होईल त्याची मंडळी वाटच पहात असत, हें साहजिकच होय. त्यानें टाकलेली जबाबदारी पीलनें घेतली व 'मी व्यापारस्वातंत्र्य हळूं हळूं सुरू करणार' असें चार चौघांत सांगूंही लागला. पीलशीं वाग्द्वंद्व केल्यामुळें काब्डेन, याची प्रसिद्धि मात्र विशेष झाली. या सरस्वतीयुद्धामध्यें काब्डेन सपशेल खालीं पडून त्याच्या राजकीय आयुष्याचा सत्यानाश झाला असें ह्मणणाऱ्या कटाच्या शत्रूंचीं तोंडें गांवोगांव भरणाऱ्या काब्डेनास अनुकूल अशा सभांनीं गप्प करून टाकिलीं. पण काब्डेनास आपल्या स्वतांचाच बडेजाव फार चालला आहे हें पाहून वाईट वाटलें. "माझें हातखंडा काम ह्मणजे पडद्यापाठीमागें सपाटून श्रम करणें व सभेंत तारतम्यानें वागणें हें होय. मला हे भपकेदार सार्वजनिक देखावे बिलकुल आवडत नाहींत." असो, हाउसमधील वरील प्रवेश आटपल्यावर ड्रूरीलेननामक प्रसिद्ध नाटकगृहांत मार्चपासून मे महिन्यापर्यंत कटाच्या लोकांनीं सात सभा भरवून लंडन शहरावर हल्ला केला व तें बहुतेक आपल्या स्वाधीन करून घेतलें; व 'धान्यकायद्यावरच जर निवडणूक होण्याची वेळ आली तर मध्यम वर्गांतील लोक टोरीपक्षास मिळणार नाहींत अशी खातरी करून घेतली शेतकरी लोकांचा वर्ग हळूं हळूं यांच्याकडे वळूं लागला. टांटन येथें शेतकऱ्यांनीं राक्षसी सभा भरवून इनामदाराचें वजन अगदीं कमी करून टाकिलें. "लँकाशायरमधील लोकांपेक्षा बुद्धि, नीतिमत्ता, राजकीयज्ञान, व सार्वजनिककामांत हौस, या सर्वांत शेतकरी लोक श्रेष्ट आहेत व आह्मांस जय येणार तो यांच्याच साह्यानें येणार" अशी काब्डेनची खातरजमा होऊन '*ईस्टर' सणानंतर प्रतिशनिवारीं कौन्टीमध्यें सभा भरविण्याचा त्यानें संकल्प केला. या वर्षी आयर्लंडमध्यें स्वतंत्र पार्लमेंटाबद्दल संक्षोभन, स्काटलंडमध्यें प्रस्थापित धर्माविरुद्ध चळवळ, व इंग्लंडमध्यें धान्याच्या कायद्याविरुद्ध भयंकर गडबड, अशा तीन गोष्टी एका कालींच चालल्या होत्या त्यांपैकीं पहिलीचें 'ऑफस' होऊन बाकीच्या दोन्ही संक्षोभनांस यश आलें.

* अप्रिल महिन्यांतील खिस्ताच्या पुनर्जन्मसंबंधी सण.

कारागिरांवर, दुकानदारांवर, कारखानदारांवर व व्यापाऱ्यांवर धान्याच्या कायद्यानें काय काय संकटें येतात त्यांचें पूर्ण निदर्शन कटानें केलें. लागवड करणाऱ्या कुळांवर व मजूरदारांवर त्यांच्यापेक्षांही वाईट दुःखपरंपरा येते असें दासविण्याचा कटाचा निश्चय ठरला. ह्या संकल्पाप्रमाणें त्यांनीं सभा भरविल्या त्या पूर्ण सिद्धीस गेल्या. समाजाच्या अत्यंत मंदभागामध्यें चपलाई उत्पन्न करून ( त्यांचे मनोविकार जागृत करून नव्हे तर त्यांच्याशीं युक्तियुक्तीनें कठोर वादविवाद करून ) त्यांची उठावणी करावयाची हें काम, राजकीयधैर्य अतिशय असून विचारशक्तीवर अत्यंत विश्वास असला पाहिजे तेव्हां सिद्धीप्रत पावते. इतर लोकांची या कामांत हवेलंडी उडून जाऊन त्यांनीं देशांत भयंकर यादवी मात्र उत्पन्न केली असती. दंगा झाला नाहीं याचें मुख्य कारण असें आहे कीं कटाच्या लोकांनीं भांडभाडून लोकांचीं मनें बरींच तयार करून ठेवलीं होतीं, त्यामुळें दोन्ही बाजूंकडून पूर्वपक्ष उत्तरपक्ष शांत व सरळपणानें होत असत. शेतकऱ्यांच्या गांवांत क्वचित एखादे ठिकाणीं दंगा होई व तो करण्यास तयार असणारे कोण ? तर जमिनीचे आडते, सराफ वगैरे लोक असत. आपल्या प्रांतांत होणाऱ्या सभेस जाण्याला इनामदारांच्या दपटशहाला भीत असत ते शेतकरी लोक ४०।५० मैल जाऊन दुसऱ्या प्रांतांत व्याख्यात्यांचीं भाषणें ऐकत असत. काब्डेन इतक्या स्वच्छतेनें व सफाईनें बोले कीं ऐकणारांची अगदीं खातरीच होऊन जाई. हर्टफर्ड, आइल्सबरी, बेडफर्ड, लिंकन, टांटन, आक्सब्रिज वगैरे ठिकाणीं सभा भरल्या त्यांत $\frac{9}{10}$ शेतकरी असत. प्रथमतः ते साशंकित मनानें येत; पण काब्डेनची रसाळ वाणी एकदां सुरू होऊन उदाहरणांचे व सिद्धांतांचे रोमणारे युक्तिबद्ध तडाखे सुरू झाले ह्मणजे हळू हळू त्यांचीं तोंडें प्रफुल्लित होऊन सरेशवटीं व्याख्यानकार सांगतो हेंच खरें अशी खातरी होऊन ते परत जात. वादांत आह्मी हटणार नाहीं असे मी मी ह्मणविणारे इनामदार काब्डेन व्याख्यानाच्या भरांत आला ह्मणजे चीची करीत मागें हटत. चारचार पांचपांच तास वाक्कलह चाले. पण भरपावसांत उभें राहणें भाग झालें तरी एकाही प्रतिवाद्यास उठून जावेंसें वाटत नसे. याप्रमाणें दक्षिण इंग्लंडांत चोहींकडे आपल्या पक्षाच्या सत्यत्वाचीं अजिंक्यपत्रें काब्डेन मिळवूं लागला. तेव्हां त्याच्याविषयीं पूज्यबुद्धि प्रसृत होऊं लागली व प्रतिपक्षी आपलीं तोंडें छपवून बसूं लागले.

काब्डेन, ब्राईट हे अयन संपण्यापूर्वींच, हर्टफर्ड, ल्यूस, काब्डन, ब्रिस्टल, सालिसबरी, कांटरबरी, रिडिंग इत्यादि ठिकाणीं सभा भरवून आपला व्यापारस्वातंत्र्याचा झेंडा जेथें जातील तेथें रोवूं लागले. कार्लचेस्टर येथें काब्डेननें जो जय मिळविला तो केवळ अवर्णनीय आहे. येथून लिबरल पक्षाचा सभासद पाठविण्याचें पातक कधींही घडलें नव्हतें! सभा भरणार ह्मणून कडेकोट तयारी चालली होती. सर्व कौंटीभर धर्माचार्यांचा नगारा दुमदुमत होता. पीलच्या प्रतापशाली अनुचरांपैकीं सर जान टिरेल हा एक असून सभेस हजर राहण्याचें वचन अगर धमकावणीच त्यानें दिली होती! मनोविकार अनावर होत चालले. विशेष पोलीस ठेवावे लागले. भांडखोर व भित्रे लोक बोलूं लागले कीं संक्षोभक लोक सुध्दा शरीरानें परत जात नाहींत. मोठ्या एका मैदानांत मंडप उभारला. हजारों लोकांचे थवेच्या थवे लोटूं लागले. वाग्युद्ध सुरू झालें. काब्डेन एकाकी परंतु ६ तासपर्यंत सारखा झुंजत होता. शेवटीं काब्डेनास पूर्ण जय मिळाला व जान टिरलनें जी तेथून धूम केली तें पुनः त्यानें तोंड म्हणून दाखविलें नाहीं. चेम्सफर्ड येथें असाच जय मिळविला. या प्रमाणें अव्याहत कर्मनिष्ठा, विवादचातुर्य, हाउसमध्यें झालेली अवास्तव निंदा इत्यादि कारणांनीं काब्डेनची सुप्रसिद्धि विलक्षण झाली. पण आपल्या साध्या स्वभावानें त्यानें सर्वांची माया जोडून आपला जय ह्मणजे त्यांचा जय असें वाटविलें. जिकडे तिकडे काब्डेनच्या नांवाचा जयघोष होऊं लागला. या चळवळीचा मुख्य नायक काब्डेन अशा अर्थाचें मानपत्र मांचेस्टर येथें त्यास मिळालें. संक्षोभनाच्या शत्रूंनींही त्यासच पकडून त्याच्याविषयीं खोट्यानाट्या बातम्या पसरल्या. या वेळेस काब्डेनचा सर्व वेळ सभेंतच जात होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कौंटीच्या सभा होत असतांनाच 'थ्रेडनीडल स्ट्रीट' मधील व्यापारोत्तेजक सभेमध्यें आठवड्यास एक मेळा भरे तेथें व्यापाऱ्यांस व पेढीवाल्यांस उपदेश होई. डुर्रीलेनमध्यें व पुढें कोव्हेंटगार्डनमध्यें प्रचंड सभा भरत असत. शिवाय महत्वाच्या प्रसंगीं तो हाउसमध्यें असे तें निराळेंच! त्या सभांत झालेल्या भाषणांची लंडनस्थ लोकांस इतकी आवड प्राप्त झाली होती कीं दुसरे दिवशीं सकाळीं ही हकीकत घेतलेल्या वर्तमानपत्रांचा दुप्पट खप होई! सारांश गेल्या फेब्रुआरींत ज्याचा राजकीय सत्यानास झाला अशी कल्पना

होती तोच काब्डेन मुख्य प्रधानाच्या मनावर आपण मिळविलेल्या जबरदस्त वजनाचा भार घालूं लागला होता. पार्लमेंटमध्यें या वेळेस निरनिराळ्या सामाजिक विषयांवर चर्चा होत होती पण कसा तरी त्याचा व्यापारस्वातंत्र्याकडे ओघ येऊन काब्डेनास ह्या विषयावर बोलण्याची फुरसत मिळे. एका वेळेस त्याचें एक भाषण इतकें सुरेख झालें कीं जरी या विषयावर जें बोलण्यासारखें आहे तें बोलून व लिहून टाकलें आहे अशी समजूत होती तरी त्या भाषणाच्या लाखों प्रती खपून त्याचा लोकमतावर मोठा विलक्षण परिणाम झाला. साखरेच्या जकातीवर त्यानें हल्ला केला तेव्हां तर जकात संरक्षकांचें चित्त खवळून ते स्पष्ट बोलूं लागले कीं " आमच्या तर्फेनें खसकावून भांडणारा कोणी नाहीं. मांचेस्टर येथें खोऱ्यानें पैसे ओढणाऱ्या नीच मनुष्यानें दिलेल्या तडाख्याखालीं नार्मनवीरांच्या वंशाचे प्रतिनिधी, ( आमचे इनामदार ), यांनीं दबून जावें यापरती लज्जास्पद व ओंगळवाणी दुसरी एखादी गोष्ट असेल काय ? " ' ह्या खोऱ्यानें ओढणाऱ्या ' व्यापाऱ्याची घरगुती संबंधानें कशी राळ उडाली होती व खर्च कमी करणें त्यास कसें भाग पडलें होतें हें जर सत्यत्वानें प्रतिपक्षी सांगते तर काय बहार होती ! पण सत्य आणि वैरभाव यांच्या मधून विस्तवही जात नाहीं हें सुप्रसिद्धच आहे. असो.

पहिलें अयन संपलें. आपल्या खासगी कामाकडे विशेष लक्ष न देतां सेप्टेंबरमध्यें लोकमत जागृत करण्यास काब्डेन पुन्हा स्वार झाला. ब्राईटच्या साहाय्यानें त्यानें आक्सफर्ड, लांकास्टर हीं ठाणीं घेतलीं. आज मांचेस्टरांत तर उद्यां लिंकनपुरांत, या आठवड्यांत सालिसबरीमध्यें तर पुढच्या आठवड्यांत हार्डिंगटनशायरमध्यें अशी त्यांची त्रिस्थळीं यात्रा चालली होती. सभे शिवाय दिवस गेला ह्मणजे त्यांस मृतप्राय होई. नार्थंबर्लंड, कंबरलंड, हॉडिंगटन प्रांतावर दोन दोन स्वाऱ्या केल्या. शेतकरी लोकांचीं मनें वळवून त्यांच्याकडूनच वेगळा अर्ज जाईल अशी सयोजना केली. स्काटलंडमध्यें तर दर दिवसास तीन ठिकाणीं तीन सभा भरविण्याचा प्रसंग येई. हे ज्या ज्या गांवांतून जात तेथें अगोदरच सर्व तयारी असून त्यांस असलेल्या वेळांत लोकांस व्याख्यान देणें भाग पडे. पर्थ, अबर्डीन, मांट्रोज, डंडी, हीं शहरें काब्डेननें घेतलीं. पश्चिम स्काटलंड ब्राइटकडे होतें. कडाक्याची थंडी पडली असताही

त्यांची व्याख्यानमाला सारखी सुरू होती. सकाळीं एका ठिकाणीं व्याख्यान द्यावें. जेवणाची वेळ होण्यापूर्वी ३५ मैल जावें, तेथें एक भाषण झोडावें, पुन्हां ४० मैल संध्याकाळच्या आंत जावें व तेथें आपल्या भाषणाचा प्रसाद लोकांस द्यावा असा क्रम चालला होता. शिवाय निरनिराळ्या ठिकाणीं पत्रें लिहावयाचीं तीं निराळींच !! स्काटलंडांतून निघून संडरलंड, शेफिल्ड, यार्क करून हल येथें दोन सभा भरवून लोकांचीं मनें आपल्या भाषणस्वारस्यानें मोहून टाकिलीं, व कटाच्या कामाप्रीत्यर्थ पुष्कळशी वर्गणी गोळा करून मांचेस्टर शहरीं काब्डेन परत आला.

१८४३ सालीं ह्या संक्षोभनाप्रीत्यर्थ ५०० माणसें बरोबर पुस्तकें वांटित होतीं, इंग्लंड व स्काटलंड येथील मतदारांस ५० लाख प्रती वाटण्यांत आल्या; ९० लाख प्रती इतर लोकांस पाठवून दिल्या. एकंदर वांटलेल्या सर्व कागदांचें वजन केलें तर १०० टन (१२५ खंडी) भरेल !! १४० शहरांस व्याख्यातें गेले. शेतकी प्रांतांत २५ सभा भरविल्या. १८४४ सालीं ह्याहीपेक्षां ज्यास्ती झपाट्याच्या स्वारीची तयारी केली. लंडन शहरांत जकातसंरक्षक पार चीत होऊन एक स्वातंत्र्यभक्त निवडला गेला. अदले वर्षी ५०,००० पौंड खर्च केले होते तर या सालीं एक लाख जमविण्याचा संकल्प झाला. पैकीं वर्ष अखेर ९०,००० पौंडाची रक्कम उत्पन्न झाली. एकट्या मांचेस्टरानेंच १४००० पौंड दिले. पहिले वर्तमानपत्राच्या जागीं 'कट' या नांवाचें पत्र काढलें, त्याच्या २०,००० प्रती खपूं लागल्या.

पण व्यापाराची भरती आल्यामुळें 'धान्यकायदा' मागें पडला. व्हीलियर्सच्या वार्षिक सूचनेचे वेळीं कटाच्या सभासदांविरुद्ध त्यांच्या शत्रूंनीं मनमुराद तोंडसुख घेतलें. प्रतिपक्षाचे नायक हजर सुद्धां नव्हते ! ब्राइटचें भाषण कोणी ऐकेना. शेवटीं ती सूचना सपशेल पडली. अयनाच्या प्रारंभींच कुळांवर व मजूरदारांवर संरक्षक जकातीचा काय वाईट परिणाम होतो त्याची चौकशी करण्याकरितां एक नियुक्त मंडळी असावी अशी काब्डेननें सूचना आणली व त्या वेळीं नैतिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीनें श्रमकारांच्या स्थितीचें परिक्षण करून सांगितलें कीं "असली पोटानें खंगलेली प्रजा असल्यावर आमच्या देशांत उत्पन्न झालेला माल हे लोक कसा

विकत घेणार? माल बाहेर पाठवावा तर जकातीची अडचण आहेच!" त्याचें मुद्देशीर व रामबाण भाषण ऐकूनही त्याच्या विरुद्ध ९१ मतें जास्त पडलीं तेव्हां मात्र काहीं वेळ त्याच्या उत्सुकतेस ढिलाई आली. धरलेली दिशा सोडून देऊन मजुरदारांस मतदारांच्या वर्गांत नोंदण्याची त्यानें खटपट सुरू केली.

त्यानें मतदारांचे नोंदणीचा प्रश्न हातांत घेतला. ज्या कारागिरांस ४०।५० पौंड शिल्लक ठेवितां येत असत त्यांस आपल्या राहण्याच्या ठिकाणा जवळ लहानसें शेत विकत घेण्याचा व त्या योगानें मतदाराचा हक्क संपादण्याचा तो उपदेश करूं लागला. अर्थातच हा उपदेश त्यांच्या हिताचाच होता. "प्रत्येक मनुष्यास आपली काहीं तरी कायमची मालमिळकत आहे असें वाटण्यास जागा असली ह्मणजे त्याचें मन प्रफुल्लित असतें व असला मतदार कारागीर असल्यामुळें निव्वळ शेतकऱ्यांचे दुराग्रहही त्यांस लागत नाहींत." हा उपदेश सर्व कारागिरांस पसंत वाटून त्यांच्यांतून फक्त तीन कौंटींतच ५००० मतदार नवीन झाले. व हीच सूचना अमलांत घेऊन जर इंग्लडांतले लोक वागले तर ३०।४० हजार नवीन मतदार उत्पन्न होतील असा सुमार दिसूं लागला. पूर्वीच्या राज्यपद्धतीच्या साह्यानेंच मत देण्याचा हा हक्क इतक्या लोकांस मिळाला. ह्या खटपटींत व्यापार स्वातंत्र्याच्या पक्षाकरितां जास्ती मतें मिळावीं येवढाच हेतु नव्हता तर राजकीय पद्धतीचा गुरुत्वमध्य स्थिर व्हावा, हा दूरदर्शी हेतु होता. "इनामदारादि अल्प संख्याक लोकांच्या हातांतून सत्ता घेऊन ती शुद्ध शास्त्रीय रीतीनें उद्योगी व बुद्धिवान अशा मध्यवर्गाच्या हातांत जितकी लवकर देववेल तितकें देशास बरें" असें त्याचें नेहमीचें ह्मणणें असे.

कटास सातवें वर्ष लागलें. १८३९ सांत वर्गणीची जमा ५००० पौंड होती ती १८४४ सांत ८०।९० हजार पौंडापर्यंत वाढली. दर आठवड्यास त्यावेळीं त्यांचा १००० पौंड खर्च होत होता. तथापि जय येण्याचीं चिन्हें कांहींच दिसेनात, व्यापारास मंदाई आली होती ती नाहींशी झाली. पील-या जकातीच्या नवीन कायद्यानें व्यापारास चांगली तेजी आली, दोन्हीं पिकें उत्कृष्ट निघालीं. गव्हाचा भाव ४५ शिलिंगच होता, वसूल चांगला आला. गरिबी कमी झाली. सारांश काब्डेन जें पहिल्यापासून सांगत होता कीं खाण्यापिण्याचे पदार्थांची किंमत कमी

झाली म्हणजे रोजमुरा चांगला मिळून व्यापार सपाट्यानें चालतो, त्याची सत्यता ठरली. धान्याची चंगाळी असली म्हणजे लोकांस मुख लागून राष्ट्रीय उद्योगास स्फुरण येतें तोच कायद्यानें पुरवठा बंद केला म्हणजे उलट स्थिति होते हें लोकांच्या नजरेस चांगलें आलें. "दोन वर्षांत चांगल्या पिकांनीं जें काम केलें तें 'धान्य कायदा बंद केल्यास नेहमींच होत जाईल." परंतु सुबत्ता असल्यामुळें कटाचें संक्षोभन मागें पडलें. अजून सभा भरतच होत्या. मोठ्या थाटाचा बाजारही भरला. पण एकंदरींत युद्धामध्यें जरा नरमाई आली. तेव्हां काब्डेननें पेंच बदलण्याचा निश्चय केला व हाउसमध्येंच काय होईल ती झटपट प्रतिनिधींवर करण्याचा इरादा धरिला हें पाहून तेथील शत्रु हळूहळू पाय मागें काढूं लागले. चोहींकडे भरभराटी होती हें खरें पण कबुलायतीनें लागवड करणारांचे फार हाल झाले. त्यांस भांडवलामधून सारा भरण्याची पाळी आली. कांहींचीं दिवाळीं निघालीं. व दक्षिण इंग्लंडांतले शेतकऱ्यांची हलाखीनें मोठी तारांबळ उडाली. निरनिराळ्या सूचनांच्या रूपानें ही स्थिति पार्लमेंटमध्यें आली, त्यांत शेतकऱ्यांच्या दुःखांविषयीं शोध करण्याकरितां एक मंडळी नेमावी अशी काब्डेननें सूचना आणिली. ती कबूल झाली नाहीं तथापि असल्या वादपरंपरेनें विचारांचें स्पष्टीकरण होऊन खरी स्थिति लोकांच्या नजरेपुढें आली. व काब्डेन व कट पहिल्यापासून म्हणत आहेत तें सत्य आहे अशी मुख्य प्रधानासह पुष्कळ लोकांची खातरी होत चालली. या अयनांत काब्डेनचें एक उत्कृष्ट भाषण झालें, तें इतकें कीं मुख्य प्रधानानें टीका करण्याकरितां हातांत घेतलेला कागद फाडून टाकून सिडने हर्बर्टास उत्तर द्यावयास सांगितलें व आपण स्वस्थ बसला. काब्डेन यास व्यापार स्वातंत्र्य म्हणजे काय व तें पूर्णत्वानें सिद्धीस नेण्यास आनुषंगिक अशीं कोणतीं साधनें पाहिजेत हें निःशेषत्वानें समजलें होतें म्हणून त्याचा कार्यसाधू व सत्यबद्ध विषयक्रम, सोज्वळ विचारव्यवस्था व वज्रभेदी भाषणशैली इत्यादि गोष्टींनीं पीलच्या म्हणकुशल मनावर असा जब्बर दाब बसविला कीं शेवटीं शेवटीं काब्डेननें बळकट मोहनी घालून त्या संधीर नागास वश केलें.!! व्यापारस्वातंत्र्यही नुसती वेळ मारून नेणारी युक्ति नसून तत्वावर बांधलेली पद्धत आहे व देशांत विपुलता असली म्हणजे किंमती वाढतात, त्या कायमच्या वाढत असताम, हें

त्यानें उदाहरणें व प्रमाणें घेऊन सिद्ध करून दाखविलें. इतकें झालें तरी पुराणप्रिय प्रधानमंडळींचें देशांत व हाउसमध्यें प्रथमचें वजन बरेंच कायमच होतें व कटाचे लोकांच्या भाषणाचा लोकांस कंटाळा येत चालला होता. तथापि काब्डेनची पूर्ण खातरी झाली होती कीं ' प्रधान मंडळ मनांतून आपल्याकडचें आहे व एखादा दुर्धर प्रसंग आल्याबरोबर ते ' धान्याचा कायदा ' नाहींसा करून टाकण्यास मागें पुढें पाहणार नाहींत. मेनुथ येथील रोमनक्याथलिक विद्यालयास जास्ती देणगी द्यावी याबद्दलची सरकारची सूचना पसंत पडली. काब्डेननें प्रधानाच्या बाजूकडे आपलें मत दिलें. 'ब्राइटचें मत विरुद्ध पडलें त्यास अनेक सयुक्तिक कारणें होतीं. ह्या अयनामध्यें काम इतकें अनावर होतें कीं सभासदास १४।१५ तास एकसारखें हाउसमध्यें बसावें लागे. असल्या लगबगींत काब्डेन हा कोव्हेंट बाग मध्यें व्याख्यानें देऊन आपला प्रश्न जागृत ठेवी. ही लौकिक कृत्याची खटपट झाली पण ह्यासमयीं त्याच्या मनावर एक कृष्ण मेघाचें ओझें पडलें होतें. भावाकडून वखारीच्या दुर्धर स्थितीचीं पत्रें आल्यामुळें त्याचें चित्त अस्वस्थ होऊन काय करावें हें त्यास सुचेना. दोन तीन मित्रमंडळीस जमवून त्यांस सल्ला विचारला. त्यांनीं सार्वजनिक कृत्यांतून निघून आपला गृहधंदा पाहाण्यास जाल तरच धडगत आहे ह्मणून सांगितलें. " मी लौकिक कृत्यांत असलों ह्मणजे मला स्वतःच्या काळजीचें कांहीं वाटत नाहीं. काम करून उशीवर डोकें ठेविलें कीं मी घोरूं लागतों." हा त्याचा स्वतःचा प्रकार होता ! कांहीं महिनेपर्यंत त्यानें कड धरली, पण सुदैवाच्या वाऱ्याची एक मुद्दां झुळुक त्याच्याकडे वाहीना, तेव्हां मोठ्या दुःखानें मन घट्ट करून त्यानें सार्वजनिक कामाचा राजीनामा देण्याचा निश्चय केला व चार वर्षें मांडीशीं मांडी ठोकून लढणाऱ्या आपल्या मित्रास ( ब्राइटास ) आपल्या बेताचें पत्र पाठविलें. ब्राइटच्या हातांत पत्र पडलें तेव्हां सपाटून पाऊस पडत होता. अहोरात्र पर्जन्यधारा थांबली नाहीं. त्याच पाव-

'सर्व वीस वर्षांत काब्डेन व ब्राइट या दोघांचें दोनदां मात्र विरुद्ध मत पडलें. एक या वेळीं व दुसरें १८५१ त प्रदर्शनाचे खर्चाचे प्रश्नाचे निकालाचे वेळीं. दोघेही विचार करणारे खंबीर असतां दोनदाच त्यांच्या मतांत विरोध यावा हा चमत्कार नव्हे काय ?

त्यानें 'धान्याचा कायदा धुवून नेला.' पत्र वाचून जाळून टाकावें अशी विनंती होती ह्मणून तें 'सुंदर' पत्र त्या वेळींच नाहींसें झालें, सबब तें मिळणें अशक्य आहे. त्यांलां दिलेला ब्राइटचे उत्तराचा सारांश आहे.

२० सप्तंबर १८४५.

"आपलें पत्र वाचून मला अत्यंत दुःख झालें. त्या पत्रानें माझ्यावरच भयंकर प्रसंग येणार, किंवा लोकांचें मोठें नुकसान होणार असें मला वाटलें. मला कांहीं सुचत नाहीं. आपला झालेला इरादा कायमचा झाला तर जें कार्य आपण उभयतांनीं हातीं घेतलें आहे तें बहुतेक ठार बुडालेंच ह्मणून मी समजतों. मींच आलों असतों पण माझ्या बहिणीही मजबरोबर आहेत त्यांस काय सांगुन निघावें हें मला समजत नाहीं ह्मणून मी राहिलों आहें. मेहरबानी करून घाई करूं नका. घाईनें तुमचें व लोकांचें अत्यंत नुकसान होईल. आपण राजीनामा दिला कीं कट मोडलाच ह्मणून समजावें. मुख्य सूत्रें आपल्या हातांत आहेत. आपली जागा घेण्याची माझी योग्यता नाहीं, हें मी पूर्ण जाणून आहें. आपल्या होरपळलेल्या मनास जास्ती दुःख देण्याकरितां मी असें लिहीत नाहीं, फक्त वस्तुस्थिति लिहीत आहें. कसेंही करून कांहीं दिवस थांबा. जय बहुतक मिळालाच आहे तरी जयाचें फळ हातीं येणें तें सेनापती जाग्यावर असल्याखेरीज साधत नाहीं.

आपला खरा मित्र

जान ब्राइट"

असें लिहिलें तरी ब्राइटास दम निघेना. १।२ दिवसांतच तो दक्षिणेकडे आला. वाटेनें येतांना त्याचे बेत चालले होते. मांचेस्टरास आल्याबरोबर एकदोन मित्रांच्या साह्यानें ओढवलेला अनर्थ टाळण्यापुरती रक्कम मिळवून कॉब्डेनचा कारभार सुसंगत केला. व कॉब्डेन पुन्हां सार्वजनिक कृत्यांत येऊन स्वपक्षाचे कार्यसिद्धीच्या मार्गास लागला.

# भाग नववा.

## १८४५.

१८४५ सालाची गोष्ट इंग्लंडीय पक्षांच्या इतिहासांत ध्यानांत ठेवण्याजोगी एक उपकथाच आहे. या सालीं एका सुप्रसिद्ध इंग्रजी प्रधानाच्या आयुष्यांत मोठा फेरबदल झाला. व आमच्या चरित्रनायकाच्या कथानकांत हें साल मध्यगामी होऊन बसलें.

पावसानें दुष्काल आणला. कठिण समय येऊन पोहोंचला. आयर्लेंडांत धान्य नेण्यास अठरा शिलिंग जकात पडत असे. तेथें मुख्य उत्पन्न म्हणजे बटाट्यांचें आणि त्यांत दुष्काळ, मग काय विचारतां? पीलनें "आतां बंदरांचीं कपाटें उघडीं करून धान्य जकाती शिवाय येऊं द्यावें" अशी प्रधान मंडळापुढें सूचना आणिली त्यांत त्यानें स्पष्टपणें सांगितलें कीं एकदां बंदरावरचीं द्वारें उघडीं केलीं ह्मणजे तीं पुनः लावणें अतिशय जड जाईल. प्रधानमंडळामध्यें एक विचार होईना. धान्य मिळण्याच्या पंचाईतीनें देशांत दुःखपरंपरा वाढत चालली. इतक्यांत टपून बसलेल्या युद्धकुशल **लार्ड जान रसेलनें** लंडनच्या मतदारांस पत्र लिहिलें. त्यांत लिहिलें कीं "प्रधानमंडळ आपलें कर्तव्य करीत नाहीं. ही फार वाईट गोष्ट आहे. कोणीही दिरंग लावल्यास पुढें भयंकर अनर्थ ओढवेल, यांत शंका नाहीं. मला वाटतें कीं जी जकात व्यापारास नाशप्रद झाली, शेतकीस विषमय झाली, देशांतील ऐक्यभावास विघातक झाली, लोकांमध्यें दारिद्र्य, रोग, मृत्यु आणि दुर्गुण उत्पन्न करण्यास कारण झाली, तिचा फडशा पाडण्यास सर्वांनीं एकमत करून हा हेतु सिद्धीस नेला तरच घडगत आहे." सारांश **लार्ड जान रसेल** **काब्डेनच्या** बाजूस आला. कटाचा जय होण्याची संधी जवळ आली. पीलही इकडे येण्याची संधी पाहूं लागतो तों रसेलचें पत्र प्रसिद्ध झालें. आपणच रद्दीचा मसुदा आणला तर "आपण लोंचटपणा करून आपलें पद रक्षण्यास झटतों" अशी अपकीर्ति सोसूनही प्रधानमंडळांत ऐक्य करण्याचा प्रयत्न करूं लागला. पण स्टानले वगैरे मंडळी हट्ट सोडीना. तेव्हां आपल्या हातून हें काम होत नाहीं असें पाहून पीलनें राजीनामा

दिला. प्रधानमंडळाचे विचार होत होते तेव्हां मांचेस्टर व बर्मिंगहम येथें कटानें दोन भयंकर राक्षसी सभा भरविल्या, त्यांत काब्डेननें सांगितलें कीं "स्टानले व वेलिंगटन हे दोघे लोकांच्या अन्नाआड येत आहेत. परंतु ड्युकास मला हें सांगितलें पाहिजे कीं रणांगणावर शत्रूंशीं लढतांना जरी त्यांचा कधींही पराजय झाला नाहीं तरी प्रत्यक्ष इंग्रज लोकांशीं झुंज लागलें असतां आमच्या ड्युकसाहेबांस हार खाऊन मागें जावें लागेल." या वेळीं व्यापारस्वातंत्र्यवाल्यांशिवाय व्हिग पक्ष दुर्बल होता. पक्षांतील नायकाच्या परस्पर भांडणांनीं टोरी पक्षाच्या चिंधड्या होऊन गेल्या होत्या. सारांश कटाची मंडळी कायती एकजुटानें वागणारी व ह्मणून समर्थही होती. त्यांनीं अनेक ठिकाणीं सभा भरवून लोकांचीं मनें खवळून टाकिलीं. घरीं जाण्याचें कबूल केलें होतें तें वचन मोडून काब्डेननें पांच चार दिवसांत १५ गांवें चोपून घेतलीं; ह्मणजे तेथें जाऊन लोकांचें मन वळविलें. प्रधानमंडळी आपणांस अजूनही फसवितील ह्मणून तो डोळ्यांत तेल घालून केवळ तक्षकासारखा जागत बसला.

पीलनें राजीनामा दिला तो मंजूर करून राणीनें जान रसेल यास बोलावून नेऊन प्रधानमंडल तयार करण्यास सांगितलें; तेव्हां त्यानें 'आमच्या प्रधानमंडलांत याल काय?' असें काब्डेन यास पत्र लिहून 'व्यापाऱ्यांच्या सभेचे दुय्यम अध्यक्षाची जागा देतों' ह्मणून लिहिलें. काब्डेन यास आपण स्वतंत्र राहूनच व्यापारस्वातंत्र्यास जास्त मदत करूं असें वाटून त्यानें ती जागा नाकारिली, पण जान रसेल यास नवें प्रधानमंडल जमवितां येईना. शिवाय त्याच्या हातून या प्रश्नाचा निकाल लागतो कीं नाहीं याचा संशयच आहे. पीलनें पुनः राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. पण 'व्यापारस्वातंत्र्य' प्रश्नाचा योग्य निकाल लावण्याच्या खटपटींत ज्या टोरी पक्षाचा त्यावर पूर्ण भरंवसा होता तो पक्ष शतशः विदीर्ण झाला. असो; कटाच्या मंडळीनें पीलास आधार द्यावयाचा निश्चय केला. संक्षोभन जारीनें सुरू ठेवण्याकरितां २५,००० पौंड वर्गणी जमा करण्याचा संकल्प झाला, तेव्हां बसल्या बैठकीसच ६०,००० पौंडांचे आंकडे पडले. पील व काब्डेन यांमध्यें उडालेल्या छकडीचा वृत्तांत मागें दिलाच आहे; तेव्हां पीलचें प्रधान-

मंडळ पडल्याबरोबर झालेला आनंद, गर्वभरानें त्यानें एका सभेंत बोलून दाखविला. काब्डेनानें मागेंही एकदां पत्र लिहितांना "पीलशीं खासगी नात्यानें मी एक चकार शब्द सुद्धां बोलणार नाहीं" असें लिहिलें होतें. पण काब्डेनचा स्वभाव जात्या दीर्घद्वेषी नव्हता. एका प्रसंगीं डिसरायलीनें, मुख्य प्रधानानें काब्डेन यास शिव्या दिल्या होत्या त्याजबद्दल, प्रधानाची निंदा केली, ती ऐकल्याबरोबर "माझ्या गैर समजुतीमुळें रागांत मी कांहीं भलतेंच बोलून गेलों त्याची माफी त्या वेळीं पुरी मागितली नाहीं अशी समजूत असल्यास पुनः मोकळ्या मनानें क्षमा मागण्यास तयार आहें" असें पील बोलल्यानंतर काब्डेननें उठून 'आतां मी तृप्त झालों' असें सांगून आपणही पीलविषयीं एकदां कठोर शब्द बोलून गेला होता त्याची माफी मागितली व याप्रमाणें दोघांही सन्मान्य नररत्नांमधील वैरभावाचा निरास झाला.

सार्वजनिक कामाच्या दगदगीनें व स्वतःच्या काळजीनें काब्डेन हैराण होऊन तो १८४६ च्या सगळ्या अयनभर आजारीच होता. परंतु सध्यां त्याला हाउसमध्यें हजर असण्याची विशेषशी गरज नव्हती. पीलनें आपला मसुदा आणला त्यांत सगळी **जकात रद्द करावी असें होतें**. पण हा कायदा पूर्णत्वानें तीन वर्षांनीं अमलांत यावयाचा, व तोंपर्यंत कांहीं जकात ठेवावयाची व १८४९ सांत सर्व जकात माफ व्हावयाची असें होतें. रद्दीच्या कायद्याचे प्रतिपक्षी देशमत पाहावें असें बोलूं लागले तेव्हां काब्डेननें सांगितलें कीं "देशाचें मत पाहण्यांत दिवसगत लावून उपयोगीं नाहीं. मला लोकमताची पुष्कळ माहिती आहे, आणि मी छातीस हात लावून सांगतों कीं तुह्मांस ५० माणसें सुद्धां 'आह्मी जकातसंरक्षक आहोंत' असें सांगणारीं मिळावयाचीं नाहींत." प्रथम वाचनास ९७ मतें जास्ती मिळालीं. तथापि गैरसावध होणें कामाचें नव्हतें. अजून संरक्षकपक्ष बळकट होता. जास्ती मतें मिळालीं तीं वजनदार नव्हतीं. सर्व जकात रद्द करण्यास शंभरसुद्धां लोक अनुकूल नव्हते. लार्डसभेंत शेंकडा १० देखील लोक सांपडणें मुष्कील होतें. व्हिगपक्षही पीलास कामावरून काढावें अशा तयारीस लागला होता. इतक्यांत तिसरेंच अरिष्ट उद्भवलें. दुष्काळानें आयर्लंडांतील लोक गैरकायदा वागूं लागले, ह्मणून जीवित व मालमत्तेच्या संरक्षणार्थ

'स्वातंत्र्यबंदीचा मसुदा' आणावा लागला व त्याचा विचार होऊं लागला. निरनिराळीं कारस्थानें होऊं लागलीं व रद्दीच्या कायद्यास भयंकर उशीर होऊं लागला. व्हिगपक्षाचा कांहीमात्रसुद्धां भरंवसा नव्हता म्हणून काब्डेन व त्याचा पक्ष त्यापासून अलग राहिले. रद्दीचा मसुदा मंडळीकडे* ९ फेब्रुवारीस गेला. १२ रात्रीं विवाद झाला. १०३ भाषणें झालीं. सरशेवटीं प्रधानांचा जय होऊन ९७ मतें जास्त मिळालीं. २७ मार्चला द्वितीय वाचन झालें, आणि १६ मेस तृतीय वाचन झालें. त्यांत रद्दीच्या तर्फे ९८ मतें जास्त पडलीं, हें पाहून मेकाले, मॉर्पेथ हे काब्डेनकडे जाऊन त्यापाशीं या विलक्षण जयाबद्दल आपला आनंद त्यांनीं प्रदर्शित केला. ५५६ सभासद हजर होते. लार्डांनीं विशेष प्रतिबंध केला नाहीं. ३ वेळां वाचन झालें. तिसऱ्या वेळीं मतविभाजन न होतां एकदांचा 'धान्याचा कायदा' रद्द झाला व व्यापारस्वातंत्र्याचा कायदा राणीच्या सहीनें मंजूर झाला.

या वेळीं त्याची प्रकृति अतिशय बिघडली होती. वैद्यानें त्यास राजकीय संक्षोभनाचें काम सोडून दुसरीकडे शांत हवेंत जावयास सांगितलें. घरच्या कामाची व हलाखीची काळजी होतीच. या सर्व कारणांस्तव कारस्थानप्रकरणें सोडून देऊन आपल्या घरचा कारभार पहावयाचा असा त्यानें निश्चय केला व प्रथमतः शरीर प्रकृती सुधारण्याचा बेत ठरविला. आपण आगंतुक कारणांनीं राजकारणांत पडून पांच वर्षेपर्यंत घरच्या कारभाराकडे ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं याचें त्याचें त्यालाच खाऊं लागलें होतें. शिवाय राजकीय कामांतील लपंडाव व कपटप्राचुर्य पाहून त्यास त्या कामाचा तिटकाराही आला होता. जें कृत्य आपण हातीं घेतलें तें ईशकृपेनें लवकर शेवटास जाणार असें पाहून त्यानें त्या दिवसापर्यंत कष्टाचें जूं सोडलें नाहीं, एवढेंच! पुढें मात्र राजकीय खटपटींत शिरण्याचें अवसान त्यास राहिलें नाहीं. लोकांनींही कृतज्ञ होऊन पैशासंबंधानें त्यास मदत करावी असा बेत केला. "मी श्रीमंत असतों अगर खाऊन पिऊन सुखी असतों तर असला पैशासंबंधीं विषय मला तिरस्करणीय झाला असता. परंतु माझें वय, माझ्या प्रकृतीस झालेली

* प्रथम वाचनानंतर सर्व सभासदांची कमिटी अगर मंडळी नेमतात. त्या वेळीं वाटेल तितका वेळ बोलण्याची परवानगी सभासदांस असते.

दगदग आणि ईश्वरानें ज्यांस माझ्या स्वाधीन केलें त्यांचे कल्याणाची माझ्यावरील जबाबदारी या सर्व गोष्टी माझ्या मनांत येतात तेव्हां लोकांनीं खखुषीनें दिलेलें वेतन आढ्यतेनें नाकारण्याच्या स्थितींत मी आहें असें मलो वाटत नाहीं. माझी इच्छा नव्हे, तर माझें दारिद्र्य या मसलतीस रुकार देत आहे. परंतु हा बेत मीं पार्लमेंट सोडल्यावर व्हावा. माझी प्रकृती सुधारल्यावर मी तेथें जाईन, पण कोणत्याही पक्षास मिळणार नाहीं अगर सरकारी काम पत्करणार नाहीं; कारण तें माझ्या खासगी आवडीच्या व मनोधर्माच्या उलट आहे. मला जरी पार्लमेंटांत जाण्याचा सध्यां कंटाळा आला आहे तरी तो प्रकृति व काळजी यांचाच परिणाम आहे. लोकांचा उपयोग माझ्या हातून होण्यासारखा असल्यास मी अवश्य तेथें जाईन." काब्डेन आतां प्रसिद्धपुरुष झाला ह्मणून त्याकडे चाकरी शोधणारांचे, कर्वीचे, पुस्तकवाल्यांचे, आश्रयाकरितां भारेच्या भारे अर्ज येऊं लागले. असो; कटाचें काम संपलें तरी तो मोडला नाहीं; कारण सर्व जकात तीन वर्षांनीं बंद व्हावयाची होती, व कट ह्मणजे लार्ड लोक व जकातसंरक्षक यांस एक बाऊच झाला होता; ह्मणून तो कांहीं दिवस ठेवण्याचें योजिलें होतें. रद्दीच्या कायद्यासंबंधें लार्डांच्या वर्तणुकीबद्दल पुष्कळ तऱ्हेच्या बातम्या उठल्या तेव्हां काब्डेनास चैन पडेना. आयर्लंडाचा 'जुलुमी मसुदा' वरचेवर पुढें येत असल्यामुळें प्रधानांची उचलबांगडी होण्याची वेळ आली आहे असें पाहून लार्ड लोक रद्दीचा मसुदा फिरवितात कीं काय ही भीति होती. सरतेशेवटीं जून २६ला त्यानें आपल्या बायकोस पुढील पत्र लिहिलें :—

" माझे प्रियतम कट.

ब्यादु मातच उडाली. गंम्मत झाली! रद्दीचा कायदा मंजूर झाला. व्यापारस्वातंत्र्य मिळालें. माझें काम संपलें. सकाळीं सहांच्या गाडीनें निघून मांचेस्टर कौंसिलच्या सभेंत ३ वाजतां येईन, आणि घरीं बहुतेक उशिरा चहा घ्यावयास येईन."

चमत्कारिक दैवयोगानें ज्या रात्रीं लार्डसभेंत रद्दीचा कायदा मंजूर झाला त्याच रात्रीं आयर्लंडच्या 'जुलुमी मसुद्यावर' पीलचा पराजय झाला. शेवटचें भाषण काब्डेनचें होतें. " मुख्यप्रधानावर विश्वास नाहीं अशा अर्थाचें माझें आतांचें मत हें नव्हे. या मसुद्यावर जय झाला तरी

पील फार दिवस प्रधानपद भोगील असें मला वाटत नाहीं. परंतु मी आपल्यास येवढेंच सांगतों कीं राजीनामा दिल्यावर कोणत्याही प्रधानाविषयीं राहिली नाहीं अशी, इंग्रजी बादशाहींतील सर्व लोकांच्या मनांत पीलविषयीं पूज्यबुद्धि व कृतज्ञता अखंड राहील यांत संशय नाहीं." प्रधानांच्या विरुद्ध ७३ मतें पडलीं. तीन दिवसांनीं 'राजीनामा देतों' अशा अर्थाचें झालेलें पीलचें भाषण फारच चांगलें आहे. तें स्वदेशाभिमान व योग्य स्वाभिमान यांनीं ओतप्रोत भरलेलें आहे. "या रद्दीच्या कायद्यासंबंधानें कोणत्याही पुरुषास वाजवी मिळालेला सन्मान चोरून घेण्याची इच्छा नाहीं. प्रतिपक्षस्थानीं बसलेले प्रतिनायक, किंवा मी, किंवा माझ्या सभोंवती बसलेले गृहस्थ या कोणासही या सत्कृत्याबद्दल सत्य रीतीनें शाबासकी देणें योग्य होणार नाहीं. पण, महाराज, या कायद्याच्या विजयाशीं साहचर्यानें राहणारें एकच नांव आहे. तें लंडनच्या प्रतिनिधीचें ( रसेलचें ) नाहीं अगर माझेंही नाहीं. शुद्धांतःकरणानें व लाभविरहित हेतूंनीं ज्या सद्गृहस्थानें न थकणारा उत्साह धरून अलंकारविरहित अशा सहजस्फुर्तीच्या वक्तृत्वशक्तीनें ह्या लोकहितकारी प्रश्नाचें समर्थन करण्याकरितां जानपदांच्या विचारशक्तीचीं आर्जवें केलीं त्या महत्पुरुषाचें नांव रिचर्ड काब्डेन होय, आणि तेंच नांव या विजयाशीं नेहमीं संलग्न असलें पाहिजे. या विजयास आदिकारण हाच गृहस्थ होय." हें भाषण करीत असतां टाळ्यांचा सारखा गजर चालला होता आणि हाऊसमधून पील बाहेर जातांना उभयपक्षांच्या लोकांनीं आभारप्रदर्शक शब्दांचा वर्षाव केला. आपण केलेल्या कायद्यानें सर्व लोक आनंदी झाले, हें पाहून पीलास धन्यता वाटली.

---

# भाग दहावा

---

## पुढील खटपट.

पीलनें राजीनामा देण्यापूर्वी तीन दिवस ह्मणजे ता० २६ जूनला काब्डेननें मुख्य प्रधानास एक पत्र लिहिलें. पीलनें राज्यधुरीणत्व सोडल्यास व्यापारस्वातंत्र्यास धक्का बसेल व इतर राष्ट्रांतही अतिशय

अवघड मसुदा अमलांत आणणारा मुख्यप्रधान आपल्या विजयाच्या दिवशींच खालीं पडला हें पाहून इंग्रजलोक व्यापारस्वातंत्र्यासंबंधें आतुर नाहींत अशी समजूत होईल, अशी त्यास भीति वाटून त्यानें हें पत्र लिहिलें. त्याचा हा पुढील सारांश आहे :—

" पक्षविपक्षाची स्थिति आपल्यास कळविण्याचा माझा इरादा आहे. आपली सर्व राष्ट्रांत आज केवढी बडेजाव आहे हे आपल्यास माहीत आहे काय ? सर्व राष्ट्र जर तुमची मदत करण्यास तयार आहे तर या बारभाईच्या* पक्षास आपण कां नम्र होतां ? सर्व लोक आपले आहेत. सर्व मध्यवर्ग कृतज्ञतापूर्वक आपलें साहाय्य करील. सर्वांचें लक्ष आपलेकडे आहे. या कालांतील तात्त्विक कल्पना समजून घेऊन त्या अमलांत आणणाऱ्या पुरुषाचे आपण अवतार आहांत. नवें पार्लमेंट कां बोलवीत नाहीं ? धान्याचा कायदा मंजूर झाला तेव्हां आतां निराळें पाक्षिक भांडण काढून त्यावर लोकमत घेण्याचें कारण नाहीं असें ह्मणाल तर उभयपक्षांतील मुख्य नायकांखेरीज सर्व अनुयायी लोक उदासीन आहेत. टोरीअनुयायी व व्हिग यांत फरक राहिला नाहीं. अजून सर्व पदार्थांच्या जकातीचा निकाल व्हावयाचा आहे. तर 'पूर्ण व्यापारस्वातंत्र्य' हा 'युद्धशब्द' तुह्मी घेऊन बाहेर पडल्यास लाखों लोक तुमच्या मागें धांवत येतील. आपल्यास हाऊसमध्यें व बाहेर वर्तमानपत्रांत हजारों शिव्या आल्या आहेत तर हाच प्रसंग समजून तुह्मीं नवें पार्लमेंट बोलावा. मीं आपल्या निशाणाखालीं लढण्यास तयार होऊन आपला विजय होईल अशी रात्रंदिवस खटपट करण्याचा पत्कर घेतों व सर्व मध्यवर्ग आपलासा करून टाकितों. मध्यवर्गाविषयीं आपण तिळमात्र भीति बाळगूं नका. सध्यांचा व्यवहारोपयोगी सुधारणा करण्याचा काल आहे. हें काम सिद्धीस नेण्यासारखें सामर्थ्य आपल्यावांचून इतरांस नाहीं. इतर सुधारणेच्या कल्पनांस अजून जीवंतपणा आला नाहीं. प्रकृतिसंबंधानें हरकत नसेल तर लोककल्याणाकरितां नवें पार्लमेंट बोलावण्याची खटपट आपण कराल अशी आशा आहे. देशाचें हित व्हावें या हेतूनें मी हें पत्र लिहिलें आहे, येत्या शुक्रवारानंतर बहुतेक मी पार्लमेंटांत येणार नाहीं; तेव्हां आपली प्रत्यक्ष भे-

* अनेक पक्षांचीं मनुष्यें काहीं कारणानें एकत्र होऊन झालेला पक्ष.

ट होण्यास अवधी नाहीं. हें पत्र इतरांच्या हातीं जाणार नाहीं असें वचन मागून घेऊन मी आपली रजा घेतों."

लंडन सोडून काब्डेन बाहेर जाणार हें वाचून झालेलें खरें दुःख पीलनें उत्तरांत प्रगट केलें व त्याच्या हेतुशुद्धतेविषयीं, त्याच्या बुद्धिशक्तीविषयीं, व वक्तृत्वाविषयीं स्वमत काय होतें तें कळवून आपल्या राजीनाम्याचीं सर्व कारणें विस्तारानें काब्डेनास कळविलीं. त्या पत्रानें काब्डेनचें समाधान झालें, व 'तुमच्या मजविषयींच्या चांगल्या मताला मी फारच किंमत देतों' असा पीलचा लेख वाचून तर त्यास अतिशय आनंद झाला.

आतां ४० शिलिंगांची जमीन करणारे मध्य वर्गांतील उद्योगी लोकांस मतदार करून त्यांच्या हातांत राज्यसत्ता जावी याविषयीं खटपट करण्याचें काब्डेनच्या मनानें घेतलें. त्याचा मजूरदारांवर बिलकुल भरंवसा नसे. राजकीय सत्ता मध्यवर्गस्थ उद्योगी लोकांच्या स्वाधीन झाली असतां ते नेहमीं शांततापूर्ण व मितव्ययी राज्यकारभार करतील अशी त्याची खातरी होती, व 'धान्यकायदा' रद्द करणारा पील व त्याचे मुख्य अनुयायी या नवीन पक्षाचे नायक झाले तर मात्र हितकारी कारभार चालेल असें त्याच्या मनानें घेतलें. ही त्याची कल्पना व विचार बरोबर होते; पण जन्मभर टोरी पक्षाचा नायक होऊन आतां एकदम पीलनें मध्य वर्गांतील कारखानदारांचा नायक होणें अगर जान ब्राइट, व पील यांणीं एकत्र होणें हें मानवी शक्तीच्या बाहेर होतें. ही इष्ट गोष्ट पील इहलोक सोडून गेल्यावर झाली. असो; पीलच्या गळ्यांत राज्यधुरा असती तर जी सत्ता त्यानें शहाणपणाचे व हितकारी कायदे करण्यांत खर्च केली असती त्या सत्तेचा लार्ड पाल्मर्स्टन यानें राष्ट्रीय दुर्गुण व भांडखोरपणा वाढविण्याकडे उपयोग केला. पण या पुढील कालांत झालेल्या गोष्टी आहेत. कालोदरांत पुढील गोष्टी गुप्त असतात ह्मणून वर्तमान काळीं त्यांचें सुखदुःख होत नाहीं, ही ईश्वराची मोठी मेहरबानीच आहे नाहीं बरें!!

"आपल्यास राणीनें बोलावूं पाठवून राज्यभार पाहण्यास सांगितलें आहे, व व्यापारस्वातंत्र्येच्छू मंडळी प्रधानमंडळांत घ्यावी असा माझा इरादा आहे; परंतु गेल्या नोव्हेंबरमध्यें तुह्मीं अधिकारपद नाकारलें, आ-

तों तर तुह्मी बाहेर फिरावयास जाणार असें कळलें, व आणखी कांहीं कारणांस्तव तुह्मांस मदत करण्यास बोलावलें नाहीं याची माफी असावी. प्रकृति सुधारून तुह्मी लवकरच परत याल व देशहिताच्या कामीं पडाल अशी मी आशा करितों. " अशा अर्थाचें पत्र जान रसेलनें काब्डेनास पाठविलें.

कोणत्याही कायद्याची पायमल्ली न करितां, कोणतीही संस्था न हालविता, व कोणत्याही वर्गास अगर वर्णास दुखापत न करितां, उच्चस्थितीस नेणारें एक मोठें सामाजिक तत्व प्रचारांत आणणाऱ्या अष्टवार्षिक कटाचें काम संपलें सबब तो मोडण्याची पाळी आली, तेव्हां कित्येकांस अतिशय वाईट वाटून कांहीं वेळ कोणाच्यानेंच कांहीं बोलवेना. शेवटीं अध्यक्षानें ' ही सभा बरखास्त ' असें मोठ्या दुःखानें सांगितलें.

अशा प्रकारचा कट करून रात्रंदिवस मेहनत केली असतां कोणतेंही सद्गुणी कार्य सिद्धीस नेतां येईल असा लोकभ्रम होणें साहजिक आहे. पण हा भ्रमच होय. प्रस्तुत कटाचा विजय झाला यास अनेक कारणें होतीं. संपत्तिमानांच्या एका वर्गास ( कारखानदारांस ) रद्दी पासून फायदा होता, व त्या वर्गाचें जें हित तेंच अगणित गिऱ्हाइकांचें हित होतें. संरक्षक मताचा ऱ्हास मागेंच होऊं लागला होता, पण वाढत जाणाऱ्या उद्योगपंथी लोकांच्या हिताहिताशीं जर त्या संरक्षक मताचें असह्य वैर नसतें तर संरक्षक मत पुष्कळ दिवस टिकलें असतें. सारांश हा सिद्धांत खरा आहे कीं ज्या मोठमोठ्या क्रांत्या होतात त्या **लाभालाभांचें पुनर्विभाजन** व शक्तिसंघाची स्वयंवाहकता या दोन कारणांनीं होतात. नवीन तत्वाच्या शोधानें हें कार्य होत नाहीं. प्रस्तुत कटानें त्याची वेळ जवळ आणिली व भयंकर गुन्हे होऊं दिले नाहींत. कटाच्या वजनामुळें पीलनें कायदा आणला, व्हिग लोकांनीं आपली नियमित जकात सोडून दिली, व लार्ड लोकांनीं अडथळा आणला नाहीं. कटाची शक्ति विशेष होती याचें कारण त्यांतील व्याख्याते लोक हितकर जनमत बोलत होते. कट मोडावयाच्या आधीं काब्डेन यास खखुषीनें लोकांनीं ७५,००० पौंड वर्गणी करून दिले. केवळ लोकहिताकरितां ज्यानें आपल्या स्वसंपत्तिवर्धनसंभवाचा होम केला त्यास, त्याच्याच मेहनतीमुळें संपत्ति प्राप्त झालेल्या श्रीमंत लोकांमध्यें, गरीबींत राहूं देणें हें मनुष्याच्या कृतज्ञ स्वभावास अत्यंत दुःखकारक व अपमानकारक झालें असतें, हें उघड आहे.

लोकांनीं भराभर वर्गणी दिली. त्यानें मोठ्या कष्टानें ते पैसे घेतले, व बाहेर जाण्याची तयारी केली. तो युरोपांत फिरण्यास निघणार असें ऐकिल्याबरोबर माद्रीद, व्हियेना, बर्लिन, पारिस, सेंटपिटर्स-बर्ग येथील राजांकडून "आमच्या भेटीस आल्यास आम्हांस सन्मान दिल्यासारखें होईल" अशा अर्थाच्या गौरवपूर्वक निमंत्रणचिठ्ठ्या आ-ल्या. जेथें जेथें तो गेला तेथें तेथें त्याचा अत्यंत सन्मान झाला. त्याच्या आगमनार्थ मेजवान्या झाल्या. त्याचें वर्तनकौशल्य व तारतम्य पाहून सर्वांस आनंद झाला. जेथें गेला तेथें व्यापारस्वातंत्र्य व मनुष्य-सुधारणा या विषयांवर संधी सांपडेल तेथें त्यानें बोलून घेतलें. इटलीमध्यें तर फारच त्याची बडेजाव झाली. ह्या उदार सत्पुरु-षाच्या सन्मानार्थ लोकांनीं कवनें केलीं, गाणीं म्हटलीं, त्यास कृषिक-र्मोत्तेजक मंडळीनें रुप्याचा चांद व सनदपत्रिका पाठवून दिली. स्पेन, इटली, जर्मनी वगैरे करून तो रशियास गेला व ल्युबेक, हामबर्गवरून तो इंग्लंडास परत आला. सर्व युरोपभर फिरला असल्यामुळें त्याच्या मनांत युरोपाची पूर्ण स्थिति भरलेली होती. आर्थिक प्रवाहांचे ओघ, व्यापारविषयाची माहिती, व मुख्य मुख्य पुरुषांचे राजकार्यांतील तं-त्याचे प्रश्न हें सर्व त्यास माहीत असल्यानें "परराज्याचा प्रधान" होण्यास हाच पुरुष योग्य होता.

तो गेल्यावर पार्लमार्गे सर्व साधारण निवडणूक झाली, त्यांत ब्राईट-च्या साहाय्यानें तो वेस्ट रायडिंगचा प्रतिनिधि निवडला गेला, व ब्राईट हा मांचेस्टरचा प्रतिनिधि झाला. त्यानें आपला कारखाना गुंडाळून मिळाले-ल्या वर्गणींत कर्ज वारलें आणि राहिलेल्या भागांत स्वतःच्या उपयो-गार्थ डनफर्ड येथें लहानशी जमीन विकत घेतली. तो लंडन येथें कांहीं दिवस बंगला घेऊन राहत असे व कधीं आपल्या मित्राच्या घरीं राहत असे. त्याचा भाऊही त्याजवळच मरेतोंपर्यंत राहिला. डनफर्ड येथील जुनें घर पाडून नवें आपल्यास सोईकर असें त्यानें घर बांधलें. एकदां आइल्सबरी येथें इनामदार व कुळें यांच्या संबंधानें बोलत असतां उदाहरणार्थ त्यानें आपल्या जमिनीची गोष्ट सांगितली. मनुष्याचा नीच-पणा मोठा कठोर आहे. चटदिशीं एकानें विचारलें "बच्चाराम! आपण ही मालमत्ता मिळवायला कोठें तरवार मारायला गेलां होता?" काब्-डेननें इमानी तत्परतेनें सांगितलें "ती माझ्या देशबंधूंनीं मला अर्पण

केली आहे. असा कोणताही वीर नाहीं कीं ज्यानें बादशाही पार्लमें- टाच्या मतसमुच्चयानें मिळवलेली मिळकत जास्ती सन्मानदायक आहे." हें वाक्य ऐकल्याबरोबर टाळ्यांचा सपाटून गजर झाला. असो; तो आपल्या लहानशा घरांत मोठ्या आनंदानें राहत असे. तेथील कुळांची स्थिति, त्यांस आठ शिलिंगच मिळणारें वेतन, गांवांत शाळा नाहीं, पोष्टाची सोय नाहीं, धर्माधिकारी परगांवीं राहणारा, वगैरे व्यवस्था पाहून त्यास वाईट वाटलें. पण १८४६ पूर्वी काय तऱ्हा होती त्याचा शोध केला तेव्हां त्यावेळेची स्थिति फारच दुःखकर होती असें त्याच्या लक्षांत आलें, व आपल्या खटपटीनें लोकांस जास्त सुखलाभाची सोय झाली हें पाहून त्यास आनंद झाला.

लार्ड पाल्मर्स्टन परराज्याचा कारभारी झाल्याबरोबर इतर देशांत ब्रिटिश सरकारचा हात जिकडे तिकडे दिसूं लागला. जास्ती फौज वाढविण्याकरितां पैशाची मागणी ह्मणजे कराचें ओझें आलें. हें सर्व काब्डेनच्या तत्वांविरुद्ध होतें. असलेली फौज कमी होणें हें त्यास कधींच शक्य वाटलें नाहीं. "सर्व जगाचा कारभार आपल्या हातानें चालवावा हा हावरेपणा इंग्रज लोकांतून नाहींसा झाल्याशिवाय कोणताही प्रधान फौज कमी करण्याची सूचना आणणार नाहीं" असें तो ह्मणे. प्रवासांत असतां ब्राइट यास पत्र लिहिलें त्यांत तो ह्मणतो "दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करण्याकरितां आपण किती अनावश्यक कळकळ व त्याबद्दल किती भीति बाळगतों, दुसऱ्या देशासंबंधीं आपल्यास किती कमी माहिती असते! हाच आमचा कार्योत्साह आह्मी घरगुती कामास ह्मणजे देशाच्या उपयोगीं लावला तर किती फायदा होईल?" १८४८ मध्यें युरोपभर जी राज्यक्रांतीची वावटळ सुटली होती तिनें इंग्लंडास कांहींएक इजा केली नाहीं, त्याचें मुख्य कारण धान्याच्या जकातीची रद्दी होय. इतर ठिकाणीं मजुरदारांच्या मनांत सरकार जुलुमी, अन्यायी व प्रजेच्या कल्याणाविषयीं उदासीन आहे असें येत असे, तसें इंग्लंडांत येण्याचा संभव नव्हता; कारण रद्दीचा कायदा कधींच मंजूर होऊन गेला होता. धान्याच्या जहाजांवरील व साखरेवरील जकात लवकरच बंद झाली. लार्ड लोकांनीं आपल्या नुकसानीची कांहीं भरपाई व्हावी ह्मणून खटपट केली पण सर्व व्यर्थ झाली. आयर्लंडाच्या दुष्काळानें व तेथील बंडानें सर्व मुत्सद्यांचें लक्ष तिकडे वळलें; काब्डेन आतां राष्ट्रीय

पियेकडे लक्ष देऊं लागला. त्याच्याविरुद्ध सध्या लोकमत होतें; तरी त्याची खातरी होती कीं स्थानिकस्वराज्यास विद्या हा आदिपाया होय. फ्रान्सांत लोकराज्य झालें तेव्हां आपली भांडखोर मंडळी त्या राष्ट्रांशीं तंटा उपस्थित करतील ही भीति त्यास उत्पन्न झाली. फ्रान्सांत लोकसत्ताक राज्याशिवाय दुसरी कोणतीही पद्धत चिरस्थायी होणार नाहीं, अशी त्याची पक्की खातरी झाली होती. ह्यावेळेस त्यानें आरमारें वाढविण्यास हरकत केली व परकी लोकांस येथें राहूं द्या म्हटलें ह्मणून तांबड्या आंगरख्यांचा ह्मणजे लढाऊ लोकांचा त्याच्यावर घुस्सा होऊन चाकहलांत ते सर्व त्याच्यावर तुटून पडले. व्हिग लोकांच्या व मुख्यतः जान रसेलच्या अळंटळंपणाबद्दल त्यास फार राग आला. ते नेहमीं इनामदारांच्या पक्षाचे असून लोकांचे हक्कांची पायमल्ली करावी व आयर्लंडांतील लोकांस सुख देऊं नये अशा मताचे असत. आयरिश लोकही त्याच्या मनांतून उतरले; कारण स्वतःच्या परिश्रमानें त्यांस कांहींच करतां येईना. त्यांची नैतिक व सामाजिक स्थिति पाहून त्यानें सांगितलें कीं "तुह्मी राज्यपद्धति बदला अगर आयर्लंडास पार्लमेंट द्या, त्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं. लोकांची गृहस्थिति बदलल्याविना सुधारणा अगर स्थानिक स्वराज्य यांचा पाया खोल जाणार नाहीं. त्यांच्या ओरडीमध्यें अर्थपूर्ण असें कांहींच नाहीं. आमच्या येथील इनामदारी अभिमान—आणि तो तर राजकीय व सामाजिक व्यवहारांत प्रबळ आहे—नाहींसा झाल्याशिवाय इंग्लंड व आयर्लंड या दोघांचीही स्थिति सुधारणें कठिण आहे. सध्यांचा इनामदार व कुळें यांमधील संबंध देशकालवर्तमानास अनुसरून नाहीं. इनामदारांचे यःकश्चित् हक्कांचा विचार करूं लागल्याबरोबर त्यांचे सर्व लोक लांडग्यासारखे चवताळून येऊन आपल्या विरुद्ध पक्षास हाणून पाडतात. यामुळें मध्य वर्गाची सुधारणा होणें कठिण आहे. वडील मुलानें स्थावर मिळकतीचें मालक व्हावें हा जसा देवदत्त अकरावा हुकूमच आहे! आयर्लंडास मुख्य गोष्ट पाहिजे ती ही कीं जमिनीचें पुनर्विभाजन करून तिची मेहनत चांगली होण्यास स्वतः हजर राहिलेंच पाहिजे इतकी जमीन एकेकाकडे असावी. या एका कायद्यानें कांहीं विशेष होणार नाहीं, ह्मणूनच कोणताही राजनीतीचा गुरु आयर्लंडास न्याय द्यावयास तयार नाहीं; माझ्याकडेच सर्व सत्ता आली तर मी आयर्लंड आयरिश लोकांत वां-

टून टाकीन." संरक्षक मंडळी जमिनीचें नुकसान होऊन इनामदार खालावत चालले अशी ओरड करीत होते. त्यास काब्डेननें एकच जबाब दिला. "उत्पन्नावर साक्षात् कर वाढवा अगर खर्चाचें माप कमी करा; आणि खर्च कमी करावयाचा तर पहिल्यांदा फौजफांट्यास कातरी लावा." पण यावेळीं त्याचें ऐकण्यास बिलकुल कोणी तयार नव्हतें. "हे ऋषि आतां नित्यशांति राखण्याचें काम *रूसो, †राब-सपियर यांचे पाठीमागें चालविणार!!" अशी त्याची थट्टा होऊं लागली. तथापि रद्दीच्या कायद्यांत याचा जय झाला होता म्हणून त्यास खिजिवला तर आपलें मतच प्रस्थापित करील या भितीनें सर्व लोक त्यास वचकत असत. 'खर्चाची सुधारणा करणारी मंडळी' अशी सभा स्थापन झाली, त्यांत याचा संबंध होता व चोहींकडे तसल्या सभा होऊं लागल्या म्हणून या सभेस कटाप्रमाणेंच सिद्धि येईल असें लोकांस वाटूं लागलें. खर्च कमी करण्याचा व पार्लमेंटची सुधारणा करण्याचा असे दोन विषय घेऊन त्यांवर लोकांची सभा स्थापन करावी व त्यांत सामाजिक प्रश्नांचा समावेश करून विषयपत्रकांतील सूचना लोकहिताच्या व व्यवहारयोग्य असाव्या असा बेत ठरला. १८४९ त मांचेस्टर येथें जंगी सभा भरली. काब्डेन 'मितव्यय अगर काटकसरीनें खर्च' या विषयावर बोलला व ब्राइटनें 'पार्लमेंटीय' सुधारणा ह्या विषयाचें प्रतिपादन केलें. पुनः हे दोघे महावीर उत्तरेकडे निघाले व जिकडे तिकडे सन्मानपूर्वक स्वागतपत्रें घेत चालले. ३००० मंडळी यांच्या निशाणाखालीं जमली. पण कोठें खरा जम बसेना. सैन्यनायकांतच मतांतर उत्पन्न झालें. काब्डेनास वाटे लंडन येथें मुख्य सभा असावी, व ब्राइटचा आग्रह ल्यांकास्टर किंवा यार्क येथें असावी असा होता. निव्वळ राज्यपद्धतीच्या चक्रांची सुधारणा करणारा काब्डेन नव्हता. 'धान्याचा कायदा' रद्द झाल्याबरोबर तो बोलूं लागला कीं ४० शिलींगांचा कर जेथें आहे अशी जमीन ज्याजवळ नाहीं, त्या मनुष्यास मताचा अधिकार

* फ्रान्स देशांतील तत्ववेत्ता. १७८९ च्या भयंकर राजक्रांतीच्या वेळीं याच्या मतांचें अत्यंत प्राबल्य होतें.

† थोरल्या राज्यक्रांतींतील एक मुत्सदी.

वियेकडे लक्ष देऊं लागला. त्याच्याविरुद्ध सध्यां लोकमत होतें; तरी त्याची खातरी होती कीं स्थानिकस्वराज्यास विद्या हा आदिपाया होय. फ्रान्सांत लोकराज्य झालें तेव्हां आपली भांडखोर मंडळी त्या राष्ट्राशीं तंटा उपस्थित करतील ही भीति त्यास उत्पन्न झाली. फ्रान्सांत लोकसत्ताक राज्याशिवाय दुसरी कोणतीही पद्धत चिरस्थायी होणार नाहीं, अशी त्याची पक्की खातरी झाली होती. त्यावेळेस त्यानें आरमारें वाढविण्यास हरकत केली व परकी लोकांस येथें राहूं द्या म्हटलें ह्मणून तांबड्या आंगरख्यांचा ह्मणजे लढाऊ लोकांचा त्याच्यावर घुस्सा होऊन चाकहल्लांत ते सर्व त्याच्यावर तुटून पडले. व्हिग लोकांच्या व मुख्यत्वें जान रसेलच्या अळंटळंपणाबद्दल त्यास फार राग आला. ते नेहमीं इनामदारांच्या पक्षाचे असून लोकांचे हक्काची पायमल्ली करावी व आयर्लंडांतील लोकांस सुख देऊं नये अशा मताचे असत. आयरिश लोकही त्याच्या मनांतून उतरले; कारण स्वतःच्या परिश्रमानें त्यास कांहींच करतां येईना. त्यांची नैतिक व सामाजिक स्थिति पाहून त्यानें सांगितलें कीं "तुह्मी राज्यपद्धति बदला अगर आयर्लंडास पार्लमेंट द्या, त्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं. लोकांची गृहस्थिति बदलल्याविना सुधारणा अगर स्थानिक स्वराज्य यांचा पाया खोल जाणार नाहीं. त्यांच्या ओरडीमध्यें अर्थपूर्ण असें कांहींच नाहीं. आमच्या येथील इनामदारी अभिमान—आणि तो तर राजकीय व सामाजिक व्यवहारांत प्रबळ आहे—नाहींसा झाल्याशिवाय इंग्लंड व आयर्लंड या दोघांचीही स्थिति सुधारणें कठिण आहे. सध्यांचा इनामदार व कुळें यांमधील संबंध देशकालवर्तमानास अनुसरून नाहीं. इनामदारांचे यःकश्चित् हक्कांचा विचार करूं लागल्याबरोबर त्यांचे सर्व लोक लांडग्यासारखे चवताळून येऊन आपल्या विरुद्ध पक्षास हाणून पाडतात. यामुळें मध्य वर्गाची सुधारणा होणें कठिण आहे. वडील मुलानें स्थावर मिळकतीचें मालक व्हावें हा जसा देवदत्त अकरावा हुकूमच आहे! आयर्लंडास मुख्य गोष्ट पाहिजे ती ही कीं जमिनींचें पुनर्विभाजन करून तिची मेहनत चांगली होण्यास स्वतः हजर राहिलेंच पाहिजे इतकी जमीन एकेकाकडे असावी. या एका कायद्यानें कांहीं विशेष होणार नाहीं, ह्मणूनच कोणताही राजनीतीचा गुरु आयर्लंडास न्याय द्यावयास तयार नाहीं; माझ्याकडेच सर्व सत्ता आली तर मी आयर्लंड आयरिश लोकांत वां-

टून टाकीन." संरक्षक मंडळी जमिनीचें नुकसान होऊन इनामदार खालावत चालले अशी ओरड करीत होते. त्यास काब्डेननें एकच जबाब दिला. "उत्पन्नावर साक्षात् कर वाढवा अगर खर्चाचें मान कमी करा; आणि खर्च कमी करावयाचा तर पहिल्यांदा फौजफांट्यास कातरी लावा." पण यावेळीं त्याचें ऐकण्यास बिलकुल कोणी तयार नव्हतें. "हे ऋषि आतां नित्यशांति राखण्याचें काम *रूसो, †राव-सापियर यांचे पाठीमागें चालविणार!!" अशी त्याची थट्टा होऊं लागली. तथापि रद्दीच्या कायद्यांत याचा जय झाला होता म्हणून त्यास खिजिवला तर आपलें मतच प्रस्थापित करील या भितीनें सर्व लोक त्यास वचकत असत. 'खर्चाची सुधारणा करणारी मंडळी' अशी सभा स्थापन झाली, त्यांत याचा संबंध होता व चोहींकडे तसल्या सभा होऊं लागल्या म्हणून या सभेस कटाप्रमाणेंच सिद्धि येईल असें लोकांस वाटूं लागलें. खर्च कमी करण्याचा व पार्लमेंटची सुधारणा करण्याचा असे दोन विषय घेऊन त्यांवर लोकांची सभा स्थापन करावी व त्यांत सामाजिक प्रश्नांचा समावेश करून विषयपत्रकांतील सूचना लोकहिताच्या व व्यवहारयोग्य असाव्या असा बेत ठरला. १८४९ त मांचेस्टर येथें जंगी सभा भरली. काब्डेन 'मितव्यय अगर काटकसरीनें खर्च' या विषयावर बोलला व ब्राइटनें 'पार्लमेंटीय' सुधारणा ह्या विषयाचें प्रतिपादन केलें. पुनः हे दोघे महावीर उत्तरेकडे निघाले व जिकडे तिकडे सन्मानपूर्वक स्वागतपत्रें घेत चालले. ३००० मंडळी यांच्या निशाणाखालीं जमली. पण कोठें खरा जम बसेना. सैन्यनायकांतच मतांतर उत्पन्न झालें. काब्डेनास वाटे लंडन येथें मुख्य सभा असावी, व ब्राइटचा आग्रह ल्यांकास्टर किंवा यार्क येथें असावी असा होता. निव्वळ राज्यपद्धतीच्या चक्रांची सुधारणा करणारा काब्डेन नव्हता. 'धान्याचा कायदा' रद्द झाल्याबरोबर तो बोलूं लागला कीं ४० शिलींगांचा कर जेथें आहे अशी जमीन ज्याजवळ नाहीं, त्या मनुष्यास मताचा अधिकार

---

* फ्रान्स देशांतील तत्ववेत्ता. १७८९ च्या भयंकर राजक्रांतीच्या वेळीं याच्या मतांचें अत्यंत प्राबल्य होतें.

† थोरल्या राज्यक्रांतींतील एक मुत्सद्दी.

नसावा. ब्राइट यास वाटे सर्व लोकांस मताधिकार दिल्याविना देशाचें मत कायदे करणाऱ्या मंडळींत प्रतिबिंबित होणार नाहीं. काब्डेन ह्मणे, लोक आपल्याबरोबर न्यावयाचे असल्यास त्यांच्यापुढें एकच विषय पाहिजे. काब्डेनचा विषय 'नितव्ययाचा' व ब्राइटचा 'पार्लमेंट सुधारण्याचा.' दोघांस वाटे आपआपल्या विषयांनेच मात्र प्रगमन होणें शक्य आहे. काब्डेनचें मत कीं पिशवीच्या भाषेत बोललें तर लोकांस विषयज्ञान होऊन ते लागलेच वळतील; असा बराच मतभेद होता. तथापि काब्डेन पार्लमेंटीय सुधारणेस आड येणारा नव्हता. "प्रथम मीं नोंदणीपुस्तकाकडे जाऊन तें सुधारीन, व खर्च कमी करूं इच्छिणाऱ्या लोकांस विचारीन, बाबानों! १८३५ मध्यें खर्च कमी केला तसा आतांही करितां येईल; पण नेहमीं संक्षोभन ठेवलें नाहीं अगर पार्लमेंट सुधारलें नाहीं तर खर्च वाढल्याशिवाय राहणार नाहीं ह्मणून पार्लमेंट सुधारण्यास तुम्ही तयार आहां कीं नाहीं? सारांश आपण द्विधा न होतां एकाग्रतेनें काम केल्यास जय येणार नाहीं असें नाहीं." असें ब्राइटास त्यानें २३ डिसेंबर १८४८ मध्यें लिहिलें.

१८४९ चा १ ला फेब्रुवारी आला. त्या दिवशीं रद्दीचा कायदा पूर्णत्वानें अमलांत येणार होता. आदले दिवशीं भाषणें होऊन आनंदानें लोकांनीं रात्रीचे बारा वाजे पावेतों नृत्यगीत केलें. बारा वाजल्याबरोबर टाळ्यांचा गजर झाला व सर्वांनीं सणासारखा तो दिवस मानिला. असो; हा कायदा अमलांत आल्यावर आरमार कमी करणें, मितव्यय सुरू करणें; कराची पुनः वांटणी करणें आणि राष्ट्राराष्ट्रांनीं पंचायत नेमून कज्जाचा निकाल करणें हे विषय काब्डेनच्या मनांत घोळूं लागले. राष्ट्रीय खर्चाचा विषय त्यानें घेतला. देशाचें अंदाजपत्रक तयार केलें. 'जें करशील तें आपलें सगळें चित्त लावून कर' ह्या न्यायानें तो काम करणारा असल्यामुळें त्याची वारंवार प्रकृति बिघडे. तरी त्यानें कामाचा सपाटा चालविला होताच "लढाईनें विनाकारण रक्तपात होतो व मानवक्रूरता जास्त वाढते सबब फौजच ठेवूं नये व थोडें तरी जगांतील सैन्य कमी झालें तर मीं आपल्यास मोठा दैववान समजून सुखानें प्राणत्याग करीन." असें त्याचें ह्मणणें असे. "तंट्याची वेळ आल्यास इंग्लंडनें प्रथम पंच नेमून तंटा तोडावा असा

अर्थाचें पत्र विरुद्धपक्षास नेहमीं लिहून पाठवित जावें" अशी सूचना त्यानें आणली, व बोलला कीं "लढाई झाल्यावर तंट्याचें मूळ मिट-विण्याकरितां जसे वकील नेमितों तसेच प्रथम पंच नेमून लढाई होणार नाहीं असें करावें ह्मणजे झालें. यापासून जास्ती वाईट तर कांहींच होणार नाहीं."

"जमिनीचा कांहीं भाग मनुष्याकडे असल्याशिवाय मनुष्याची नीति व राज्यनैपुण्य वाढणार नाहींत" हें त्याचें ठाम मत कधीं ढळलें नाहीं. मोठमोठे इनामदार त्याच्या डोळ्यांत नेहमीं सलत असत व ते राज्या-धिकारी आहेत तों पावेतों राज्यपद्धत कधींही सुटणार नाहीं असें तो आपल्या मित्रांस नेहमीं सांगे. आपल्या देशबंधूची सत्यनिष्ठा, कर्मोत्साह, स्वावलंबन व सर्व भयांपासून व अडचणींतून पार नेणारी स्वशासनक्षमता हे सर्व सद्गुण मद्यपानानें नाहींसे होत आहेत हें पाहून त्यांस अत्यंत वाईट वाटे. "पाणी पिणारें जर आमचें राष्ट्र झालें तर आमचे लोक कार्यकुशल कां होऊं नयेत हें मला समजत नाहीं; कारण इंग्लिश लोकांमध्यें सत्य आणि परोकार हे गुण मुख्यत्वानें वास करीत आहेत. माझी प्रकृति नाजुक असतांनाही मी बळकट मनु-ष्याचें काम करूं शकतों याचें आदिकारण मितपान हें होय. आमच्या घरांत मद्यांश थेंबभर सुद्धां सांपडणार नाहीं." त्याचा 'मद्यपाना' वर राग असे.

यावेळीं लार्ड पामर्स्टन सुमंत होता ह्मणून त्यानें युरोपांतील सर्व कलहांत इंग्लंडास ओढण्याचे बेत केले. कित्येक राष्ट्रांस राजनीतीचीं व्याख्यानें लिहून पाठविलीं, कित्येकांस जोरदार खलीतें लिहिले, कि-त्येकांची कान उघाडणी केली! सारांश इंग्लंड देश सर्वांत प्रमुख आहे असें दाखविल्याशिवाय त्यास एक दिवसभरही चैन पडत नसे. दीनो-द्धारणाचा (गरीब राष्ट्रांस मदत करण्याचा) त्याचा हेतु पाहून लोकही त्यास वश होत. ही प्रधानाची भांडकुदळ ढवळाढवळ पाहून काब्डेननें प्रधानाविरुद्ध तीन चार व्याख्यानें दिलीं, व लोकांनींही तीं मन लावून ऐकिलीं. पण यावेळेस त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हंगारीच्या लो-कांनीं स्वतंत्रताप्राप्तीबद्दल लढाई केली, त्यांत रशिआच्या साहाय्यानें आस्ट्रियानें त्यांचा पराजय करून तो प्रांत काबीज केला. यावेळेस इंग्लंडांतील व्यापारी आस्ट्रिआस व रशिआस कर्ज देत असत त्या व्याजीविरुद्ध काब्डेननें स्वारी केली. "अशा प्रकारानें पैसे व्याजी

लावणें अतिशय धोक्याचें आहे. शिवाय लढाईमध्यें नाहींसें होणारें सामान, दारूगोळा यांकडे पैसे लावणें हें अर्थशास्त्रास अनुसरून नाहीं. कोणत्या कामाकडे खर्च होतो याचा विचार आपल्यास केलाच पाहिजे. नाहीं तर आपलेच पैसे घेऊन इतर लोक आपल्यावरच स्वारीची खट-पट करावयाचें! लढाईस पैसा कर्जाऊ देणें ह्मणजे राष्ट्रीय संपत्तीची धुळधाण, भांडवलाचा नाश, कराचा बोजा इत्यादि गोष्टी आपल्यावर ओढून घेणें होय; आणि हें कशाकरितां तर जी लढाई आपल्यास आव-डत नाहीं ती होऊं देण्याकरितां? अशानें लढाईचे अनर्थ कधीं तरी टळतील काय? बरें तुह्मीं लढाईस मदत करणार ती काय ह्मणून? दे-शाभिमान,स्वसंरक्षण, क्रोधशांति, निदान कीर्तिलाभ यांतील एखादा तरी सद्धेतु साध्य होतो काय? मग कां मनुष्यनाशाकरितां पैसे देतां?" या भाषणांत काब्डेनचें धैर्य, तारतम्य व उन्नतस्वभाव हीं व्यक्त होतात. पण त्यावेळच्या कलमबहाद्दुरांनीं त्यावर हल्ला केला तो वि-लक्षण होता. व्यापाऱ्यांचे डोळे येवढाले झाले. पैशांत व्यापारस्वतंत्रता कां नसावी असें त्याचें मित्रमंडळ त्यास विचारूं लागलें. नवीन नीति-तत्व सुरूं करणारे सुधारकांचा मार्ग मोटा बिकट आहे. असल्या ह-ल्ल्यांनीं काब्डेन डगमगला नाहीं. कारण भांडवलाचा विनियोग करा होतो हें पाहणें अर्थशास्त्राचें काम आहे अशी त्याची खातरी होती. "राजकीय अधिकार थोड्या लोकांपासून जसजसे बहुत लोकांकडे जातात तसतशी लढाई ही किती भयंकर वस्तु होते ह्याचें ज्ञान लोकांस दिलें पाहिजे. तिच्या योगानें मनुष्यनाश होतो येवढेंच नाहीं-कितीही मेलीं तरी माणसें सवंगच आहेत-तर ज्यांच्या योगानें आपलें अस्तित्व कायम राहतें अशीं साधनें लढाईच्या योगानें नाहींशीं होतात, हा सिद्धांत सदासत्यच आहे." असो; या असल्या राजकीय कारणांस्तव काब्डेन लढाईचा विरोध करी.

पण हे विचार पाल्मर्स्टनला कसे आवडणार? त्याचें गाणें निराळेंच होतें. त्यानें ग्रीस देशाजवळ आरमार पाठवून त्या लोकांस हंगारी प्रांत रशिआच्या ताब्यांत जाऊं देऊं नका असा निरोप पाठविला. युरोपाची धमकावणी ऐकून रशिआ मार्गे हटत होता तेव्हां हें आरमार पाठविणें व्यर्थच झालें. शेवटीं या धुसपुशीचा परिणाम क्रिमिआची लढाई उत्पन्न करण्याकडे झाला! दुसरें, ग्रीक देशाशीं त्यानें तंटा उत्पन्न केला. ह्मणजे.

सिफिको नांवाचा एक ज्यू गृहस्थ इंग्लंडांत राहिल्यामुळें त्यास इंग्लिश मनुष्याचे हक्क प्राप्त झाले होते. हा व्यापाराच्या निमित्तानें ग्रीस देशांत रहावयास गेला होता. तेथें त्याचा तेथील सरकाराशीं तंटा होऊन त्यानें इंग्लंडकडे फिर्याद केली. वरतीं आरमार पाठविलें ह्मणून सांगितलें आहे, तेंच ग्रीस देशावर पाठवून पामर्स्टननें कांहीं ग्रीस व्यापाऱ्यांचीं जहाजें हडप ह्मणून ठेविलीं व पत्रव्यवहारामध्यें त्यानें इतकी घाणेरडी अव्यवस्था केली कीं रशिया व फ्रान्स हे दोघे खम ठोकून लढाईला उभे राहिले. हाऊसमध्यें विवाद झाला ते वेळीं पील, ग्लाडस्टन, डिझ्रायली, ग्राहम व काब्डेन प्रधानाविरुद्ध बोलले. पामर्स्टन सहा तास बोलला, त्यांत इंग्रजी प्रजेवर जुलूम झाला असतां इंग्रजी सरकारास त्या जुलुमाबद्दल परकी राजावर हल्ला करितां येईल कीं नाहीं हा मुद्दा होता. अर्थातच त्याचा जय होऊन ४६ मतें त्यास जास्ती मिळालीं. हें झाल्यावर दोन तीन दिवसांनीं पील घोड्यावरून पडून मेला. तें ऐकून काब्डेन यास फार वाईट वाटलें. आरमारें कमी करणें, खर्च कमी करणें, शांतिमूलक तत्वांचा प्रसार करणें, ह्या कामांत पीलकडून अतिशय मदत मिळेल अशी त्यास आशा होती, ती विचित्र दैवयोगानें विफळ झाली.

असो ; रोमनकॅथलिक लोकांविरुद्ध कायदा आणल्यामुळें प्रधानमंडळ पडण्याची संधी जवळ येत चालली. कोणत्याही धर्माचा पुरस्कार सरकारानें घेणें हें तत्व काब्डेनच्या मताविरुद्ध होतें, व ह्मणून 'धर्मसमता' नांवाची सभा उत्पन्न करावी असे तो बेत करूं लागला. याच वर्षी ह्मणजे १८५१ त पहिलें प्रदर्शन झालें. त्यांत काब्डेनची अतिशय मदत होती हें सांगावयास नकोच. या वर्षी फ्रान्स व इंग्लंड या दोन देशांत मतांतराचा निकाल करण्याकरितां पंच नेमावे अशी सूचना आली ती सर्वांनीं ग्रहण केली. काब्डेन लष्करी खर्चाविरुद्ध बोलत असे ह्मणून पुष्कळ सैन्याधिकाऱ्यांकडून त्यास धमकावणीचीं पत्रें येत. एकानें तर त्यास द्वंद्वयुद्ध खेळण्यास बोलावलें. ! ! सुधारकांस अशा प्रकारचा त्रास भोगावा लागतोच ! या वेळेस त्यानें ब्राइट यास पत्र लिहिलें त्यांत 'हल्लीं जमिनीचा मक्ता आहे तो काढून तिचें पुनः विभाजन करावें व वडील मुलास सर्व मालमत्ता मिळावी असा कायदा आहे तो बदलावा,' असें होतें. वसाहती, धर्मस्वा-

तंत्र्य व *देशस्थ भूपद्धति यांच्या विषयींचें लोकांचें अज्ञान व दुराग्रह पाहून त्यांस मतदार करण्यापेक्षां प्रथम शाहाणे करावे असा तो लोकोपकारी ब्राइट यास उपदेश करी. स्टर्जनामक गृहस्थानें 'असमप्रतिनिधीत्व'* या नांवाचें पुस्तक लिहिलें होतें तें वाचल्यावर त्यानें लिहिलें: 'पुनः मी आपले घोडे पुढें हकलून ४० शिलिंगानें स्वतंत्र जमीन मिळविणें ही पद्धत चांगली आहे असें तुमच्यापुढें कीर्तन करीत बसणार. हा उपाय केला नाहीं तर शस्त्रास्त्राशिवाय जमीनदारीपणा निघण्यास मार्ग नाहीं. मी सांगतों या पद्धतीनें एक दोन ठिकाणीं लार्डांचें महत्व नाहींसें झालें कीं जमीनदारांच्या लष्करांत हाहाःकार होईल व लोकांस जय येतो असा भरंवसा वाटूं लागेल." कोसूथनामक एक मुत्सद्दी इंग्लंडांत शांततामूलक तत्वांचा उपदेश करण्याकरितां आला होता, त्यास काब्डेननें चांगली मदत केली. टाईम्स वर्तमानपत्र त्यावर याबद्दल खवळलें, पण तो असल्या खवळण्याला दाद देणारा नव्हता.

---

# भाग अकरावा.

---

## १८५३ चें वेड. काब्डेनची लोकप्रियता.

पाल्मर्स्टनची धचडग्याची वर्तणूक राणीस पसंत न पडल्यामुळें त्यास कामावरून काढून टाकलें. व्हिग पक्षांत जोम नव्हता तेव्हां रसेलनें राजीनामा दिला. डरबी मुख्यप्रधान झाला. संरक्षणप्रिय प्रधान अधिकारी झाले तेव्हां व्यापारस्वातंत्र्याबद्दल काब्डेनास भीति वाटूं लागली होती ती साहजीकच होय. पण नवीन सैन्याची भरती करावयाची असा मसुदा निघाला तेव्हां तर त्याचें धैर्यच खचलें. "आमचीं जहाजें भलतीकडे पाठविण्याचा धंदा बंद पडला तर आमच्या संरक्षणास जास्त फौज नको" असें तो ह्मणाल्याबरोबर उपहाससूचक टाळ्या सगळ्या हाउसभर झाल्या. 'तुह्मांस वेड लागलें आहे' असें त्याचे

* जमीन कशी वांटली जावी याबद्दलची पद्धत.

* लोकसंख्येचे मानानें प्रतिनिधी निवडण्याचा हक्क नसणें व अल्पसंख्याक लोकांचें मत मुळींच न येणें.

एका मित्रानें त्यास सांगितलें!! या दुःखांत सुख येवढेंच होतें की इतर प्रश्नांमुळें व्यापारस्वातंत्र्यास बिलकुल धक्का लागला नाहीं. तथापि सावधगिरीनें त्यानें सर्व तयारी करून ठेविली होती. साधारण निवडणूक झाली त्यांत पक्षांच्या बलाबलामध्यें विशेषसा फरक झाला नाहीं, व टोरी पक्षच सत्ताधीश झाला. राणीच्या बोलण्यांत व्यापारस्वातंत्र्यानें ज्या लोकांचें नुकसान झालें आहे त्या लोकांस मदत करावी असा एक मुद्दा होता, हें ऐकल्याबरोबर प्रधानमंडळावर सर्वत्र हल्ला सुरू झाला. राजकारणाच्या या शहाण्या, न्यायी व हितकर पद्धतीचा सध्यांचें प्रधानमंडळ अपूर्व द्वेष करीत होतें. तेव्हां त्यांकडून या पद्धतीबद्दलचें स्पष्ट मत घ्यावें, अशी खटपट सुरू झाली. पण हें पामर्स्टन यास आवडेना; कारण राज्यसूत्रें हातीं घेण्याची त्याची तयारी झाली नव्हती ह्मणून त्यानें तडजोडीची सूचना आणून प्रधानमंडळाचा तूर्त बचाव करण्याची युक्ति काढली. काब्डेननें पामर्स्टनवर उघड हल्ला केला पण उपयोग झाला नाहीं. शेवटीं डिसरायलीचा अंदाजाचा खरडा आला. सर्व मंडळी टक लावून वाटच पहात होती; कारण अनुभव नसतांना प्रथमच प्रतिनिधींचा नायक झालेला हा चतुर आणि वाक्कुशल डिसरायली, खरडा कसा काय आणतो याकडे सर्वांचे डोळे लागले होते. शेवटीं खरडा हाऊसपुढें आला; त्यांत व्यापारस्वातंत्र्याबद्दल एक अवाक्षरही नाहीं असें पाहून काब्डेनास आनंद झाला. नंतर त्या खरड्यावर चोहींकडून जो दारूगोळा सुरू झाला तो कांहीं पुसूं नये. डिझीचा* टिकाव लागेना. त्यास कोणी हात देईना. व्हिग, पीलानुयायी व मितव्ययी लिबरल्स यांनीं आपआपलीं सैन्यें एकत्र करून त्या लाघवी गारोड्यास प्रधान पदाखालीं ढकलून दिलें, आणि व्हिग, व पीलानुयायी एकत्र होऊन त्यांनीं राज्यकारभार हातांत घेतला.

१८५३ साल उजाडलें. ड्यूक आफ वेलिंग्टन* मेला ही बातमी पसरून तीन दिवस झाले नाहींत तोंच फ्रान्समध्यें बादशाही सुरू झाली. इंग्लंडमध्यें चळवळ सुरू झाली. लार्ड पामर्स्टनच्या ध्यानीं,

---

* हें डिझरायलीचें टोपण नांव.

* इंग्लंडांतील प्रसिद्ध योद्धा. १०३ लढायांत हा हजर असून त्याचा कधींही पराजय झाला नाहीं; यामुळें इंग्लंडमध्यें याचें अतिशय वजन होतें.

मनीं, स्वप्नीं फ्रान्स इंग्लंडावर स्वारी करणार असें येऊं लागलें. ड्यूक मेला, आतां आमचें संरक्षण कोण करील असा हाहाःकार उठून लोक हवालदील झाले. देशांत व्यापारस्वातंत्र्यानें संपत्तीचे ढीग आणून टाकले होते ह्मणून जास्ती फौज ठेवण्यास लागणारा कर देण्यास कोणीच नाखूप राहिलें नाहीं. लष्करी अम्मलदारांनीं तर वर्तमानपत्रांतून फ्रान्स देशांतील लढाईच्या तयारीच्या बातम्यांनीं काहूर करून सोडलें. काब्डेन व त्याचें मित्रमंडळ या वावटळीच्या तडाक्यांत सांपडलें नाहीं हें त्यांस मोठें भूपण होय. सर्व देश लढाईपर झाला आहे असें पाहून त्यानें एक छोटेखानी पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली. यी वेळेस त्यानें एक पत्र लिहिलें त्यांत तो ह्मणतोः—"सूर्याखालीं असणाऱ्या राष्ट्रांत आपण इंग्लिश लोकच मोठे भांडखोर असे आहोंत. ७०० वर्षांचा इतिहास पाहिल्यास आपण चारही खंडांत लढाया केल्या आहेत हें दिसून येईल. ड्यूकनें इंडियांत जो रक्तपात केला आहे त्याबद्दल देव इंग्लंडाचा सूड कधीं तरी घेईल यांत शंका नाहीं. १७९३ पासून आजपर्यंत ५००,०००,००० पौंड लढाईंत फस्त झाले, आणि फायदा काय तर आमच्या शिरावर कर्जाचा बोजा व इनामदारांस पदव्यांची व संपत्तीची लाट ! ! "

त्यानें जें पुस्तक लिहिलें त्यांत १७९३–१८५३ पर्यंत इंग्लंडानें लढाया कोणत्या केल्या, त्यांचीं मुख्य कारणें, फक्त लोकसत्तात्मक फ्रान्साच्या द्वेपापासून, कशीं उत्पन्न झालीं होतीं, हें त्यानें स्पष्टपणानें दाखविलें. काब्डेननें आपल्या पुस्तकांत पुढील विधान सिद्ध केलें:—"१७८९च्या फ्रान्सांतील भयंकर राज्यक्रांतीबद्दल तेथील लोकांस वाईट न वाटतां उलट त्या क्रांतीनें आपल्या सुधारणेचें चक्र झपाट्यानें चालूं लागून संपत्ति व सुख यांचा ओघ वैपुल्यानें वाहूं लागला, असें त्यांचें मत आहे. त्यांचा बादशाहा स्वायत्त ( स्वतंत्र, स्वतःलाच कायतो जबाबदार) व सर्वशक्तिमान् आहे तरी त्यास ३ गोष्टी कधीं करितां येणार नाहींत. १ कोणत्याही विशिष्ट धर्मास आश्रय देणें; २ वडील मुलासच सर्व मालमत्ता कायद्यानें देणें; आणि ३ महत्वाच्या स्थावर मिळकतीवर कर न घेतां फक्त स्वार्जित मिळकतीवर कर घेणें, ह्या तीन गोष्टी करण्यास तो असमर्थ आहे. आपल्या इंग्लंडदेशांत त्या तिन्ही गोष्टी प्रचलित आहेत. तेव्हां फ्रान्सावर दया करण्याची अगर त्यास तुच्छ मान-

ण्याची आपल्यास गरज नाहीं. फ्रेंचलोक समताप्रिय आहेत; आपण स्वातंत्र्यप्रिय आहोंत. सारांश सांगावयाचें तात्पर्य इतकेंच कीं फ्रेंच लोकांची बाजू घेऊन आपल्यास लढाई करण्याचें बिलकुल कारण नाहीं." सरतेशेवटीं त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें "आपली सामाजिक स्थिति व विशेषतः समाजमनोऱ्याचा पाया जे कष्टकरी लोक त्यांची गृहस्थिति सुधारल्याविना आपली राज्यपद्धति कधीं चिरस्थायी होणार नाहीं; करितां आपली सामाजिक स्थिति सुधारावी," अशी त्यानें बळकट इच्छा प्रगट केली. या पुस्तकांत कॉब्डेनची न्यायशीलता, देशभक्ति व मानवीमहत्वाची (मनुष्य सत्वशील होऊन सदा सुखी होईल याची) आशा, हीं व्यक्त होतात. लढाऊ लोकांचें रणांगणांतील शूरत्व व कार्यतत्परता यांच्याशीं बरोबरी करणारें सामाजिक शूरत्व व स्वकार्यनिष्ठा इतर प्रसंगींही दृग्गोचर होतात, हें तत्व सिद्ध करण्याकरितां आयर्लंडांत दुष्काळ पडला होता त्यावेळीं कांहीं लोकांनीं दाखविलेल्या धैर्याचें व एकनिष्ठतेचें उदाहरण घेतलें आहे तें इतक्या सन्मनोधर्मानें भरलें आहे कीं तो सारा निबंध इंग्रजी गद्यग्रंथांत मोठा चटकदार असा प्रसिद्ध असून औद्धत्य, सौष्ठव आणि पदलालित्य इत्यादि विषयीं किस्साच होऊन बसला आहे. ह्या पुस्तकाचें लोकांनीं सन्मानपुरःसर स्वागत केलें. त्याच्या ह्मणण्याचें सत्यत्व त्यावेळीं जरी प्रत्ययास येण्यासारखें नव्हतें तरी लोकांनीं ह्या प्रश्नाचा (युद्धशीलत्व चांगलें कीं वाईट याचा) निकाल होणें आहे असें मानणें ह्मणजे कॉब्डेनच्या मताची पहिली पायरी चढणेंच होय असें होतें.

ह्या वर्षी फडणिसानें (ग्लॅडस्टननें) मोठ्या धैर्यानें तयार केलेलें, व सुंदरसरस्वतीसाह्यानें बाहेर आणलेलें, अंदाजपत्रक पाहून सर्व देशभर आनंदाश्चर्य पसरलें. वंशपरंपरेनें कुलीन झालेल्या इनामदारांमध्यें न राहतां औद्योगिक व्यापारी मंडळांत राजकीय सत्तेचा मध्य बिंदु चालला आहे हें अर्वाचीन तत्व मोकाशांस समजेना. वेळेचें पूर्ण ज्ञान ठेवून ग्लॅडस्टन पीलच्या मार्गाचा अवलंब करीत होता व मध्यवर्गाच्या हातांत सत्ता जाईल अशी खटपट करीत होता. कॉब्डेननें खर्च कमी करावा व मुख्यतः लष्करी खर्च कमी करावा असें अंदाजपत्रकावर टीका करितांना ह्मटलें पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. बाकीच्या सड्यांविषयीं त्यानें आपलें अनुकूल मत प्रकट केलें.

फ्रेंच लोकांच्या स्वारीची अवाई नाहींशी झाली त्याचें कारण पूर्व युरोपांत कांहीं गडबड चालली होती तिकडे लोकांचें लक्ष लागलें. पुढें लवकरच तुमुल युद्ध माजणार हें कोणाच्याही ध्यानींमनीं नव्हतें. या वेळीं काब्डेन ससेक्समध्यें सुखानें उन्हाळा घालवीत होता. तथापि सार्वजनिकपद्धतीच्या विचारांत त्याचें मन गढून गेलेलें होतेंच. 'ब्रह्म-देशांतील लढाईच्या मूळ कारणांची मीमांसा' त्यानें लिहिली. तो ग्रंथ फारच गोड आणि बालबोध असा झाला आहे. त्यांत इंग्रजसरकारचा उद्धटपणा, अप्रशस्त जुलूम व अनर्थकारक मुर्खपणा ह्या सर्वांचा विचार केला आहे व शिवाय असें भाकीत केलें आहे कीं "अशा तऱ्हेच्या दुष्कृ-त्यांनीं एखादे वेळेस हिंदुस्थानच्या जमाखर्चपत्रकाचा हवजा होऊन सरकारचें दिवाळें निघेल." तशी स्थिति लवकरच येऊन हें भाकीत खरें झालें.

शांततोत्तेजक मंडळीचा हा सभासद होता. इंग्लिश लोकांची उद्धट, अ-रेरावी, इतरांस अपकारी, अशी वागणूक असल्यामुळें ह्या शांततोत्तेजक-संक्षोभनास विशेष जय येईल अशी त्यास आशा नव्हती; तथापि खटपट करून लोकमत आपल्याकडे आणण्याचा त्याचा कृतसंकल्प झाला.

---

# भाग बारावा.

---

## क्रिमिआची लढाई. मुलाचा मृत्यु. चीनाची लढाई.

१८५४ मध्यें क्रिमिअन लढाई सुरू झाली. १८५६च्या अगोदरच प्रधानमंडळापैकीं पीलानुयायी व **जान रसेल** यांनीं राजीनामे दिले. या १५ महिन्यांत मुत्सद्यांची हेळसांड, कारभारामध्यें बावळेपणा आणि व्यक्तिविशिष्ट धरसोड, ह्या ज्या गोष्टी दिसून आल्या तसला मासला इतरत्र क्वचितच सांपडेल! **काब्डेन** यास, आपण **टोरीपक्षाच्या** विरुद्ध १८५३ मध्यें मत दिलें त्याचा परिणाम वाईट झाला, हें पाहून फार दुःख झालें. चोहींकडे प्रधानाविरुद्ध सभा होऊन **काब्डेन** ह्मणतो तें खरें असे त्यांत ठराव झाले. **ल्यांकाशायर** मधील 'यःकश्चित्' कारखानदारांस आपल्यास परराज्यनीति सांगण्याचें धारिष्ट कसें आलें तें **पालमर्स्टनास**

समजेना, सुमंतगिरीच्या सात्यांत गुप्तता ठेवूं नये हें तत्व त्यास बिलकुल पसंत पडेना. एकदां ब्राइट त्याच्या विरुद्ध हाउसमध्यें बोलला, तेव्हां उत्तर देतांना "सन्मान्य व धर्मपरायण आचार्यश्रेष्ठ" असें विशेषण ब्राइटच्या नांवास जोडल्याबरोबर काब्डेननें उठून सांगितलें कीं "मुख्यप्रधान अयोग्य शब्द बोलून मुद्दा सोडीत आहेत." पुन्हा एकदां काब्डेनची व पाल्मर्स्टनची झक्काझक्की उडाली. काब्डेन बोलतांना ह्मणाला, "कांहीं प्रसंगीं मी लढेनही, निदान दवाखान्यांत जखमी मनुष्यांची सेवा तरी करीन." टवाळपोरांच्या कलागतीमध्यें जशीं कांहीं पोरें घालून पाडून बोलूं लागतात त्याप्रमाणें पाल्मर्स्टन चटकर उठून ह्मणाला: "आपण ज्या पक्षामध्यें आहां त्या सर्व लोकांनीं दुसऱ्याच एका दवाखान्यांत (वेड्यांच्या!) जावें अशी इंग्लंडांतील सर्व लोकांची इच्छा आहे."!! पाल्मर्स्टन बोलला हें खरें आहे अशी देशांत बहुजनसमाजाची समजूत होती, व लोकांस या मांचेस्टरपंथाच्या 'युद्धाभाव', 'शांतता' इत्यादि विषयांचा कंटाळा आला होता. सारांश या वेळीं मांचेस्टरपंथाचे मोठे हाल आले होते. सर्व लोकांस बिनलढाईचा पक्ष आवडेनासा झाला होता. केवळ दरबारी लोक, राज्यव्यवहारचतुर पंडित, वर्तमानपत्रें चालविणारे समर्थ लेखकाग्रणी, मोठमोठीं कामें केलेले वाघ, हेच त्यांच्या विरुद्ध होते असें नाहीं तर ज्यांच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास, असे औद्योगिक पंथांतील मध्यवर्गीय लोक हेही त्यांच्याशीं वांकून राहूं लागले. लोकमताच्या प्रचंड लहरीविरुद्ध बोलणें व कृति करणें हें सामान्य नव्हे; ह्मणून या वेळीं काब्डेन व ब्राइट हे दोघे रामलक्ष्मणाप्रमाणें आपल्या पर्वतप्राय नैतिक धैर्याच्या साह्यानें, व राज्यव्यवहारकौशल्याच्या अपरंपार मदतीनें एक रतिमात्रही सत्यस्थानापासून न ढळतां अपशब्दांचे मार सोशीत आपल्या पक्षाच्या कामीं एकनिष्ठ राहिले. वेदांतजन्य औदासीन्य किंवा अन्यायप्रचुर स्वलाममोह या दोन्ही गोष्टी नसल्यामुळें आपल्या विरुद्ध झालेला हा लोकमताचा अभेद्य दुर्गतट पाहून सद्युक्तीनें काम करणाऱ्या व व्यवहारयोग्य राजनीति वदणाऱ्या आमच्या दोन्ही महावीरांस अत्यंत वाईट वाटलें. ज्या दैवताजवळ त्यांनीं आजपर्यंत कुलीन लोकांच्या जातीविरुद्ध, मक्तेवाल्यांच्या आपलपोटेपणाविरुद्ध, दिनचर्यालेखकांच्या हलकटपणाविरुद्ध, पार्लमेंटच्या लबाडीविरुद्ध, जोरदार गाऱ्हाणें गाईलें

होतें तेंच लोकमतरूपी दैवत आज त्यांना प्रतिकूल झालें! त्यांच्या प्रतिमा लोकांनीं जाळल्या, त्यांस देशद्रोही ह्मणून ह्मटलें, भरसभेंत त्यांची 'छिःथु' केली. हें सर्व, त्यांनीं उपकार केलेल्या लोकांकडून झालें ही फारच योग्य गोष्ट झाली नाहीं बरें? या वेळेस ब्राइटनें आतां आपल्या मतांची पाळी केव्हां येणार ह्मणून विचारलें होतें त्यास काब्डेननें उत्तर लिहिलें तें असेंः—"जेव्हां तारतम्य व इमान पुढें सरसावतील तेव्हां; पण तीं लवकरच पुढें येतील असें मला वाटत नाहीं. मी कांहीं शांततेचें राज्य पहावयास जगत नाहीं, कारण आजच मला ५० वर्षें होऊन गेलीं व आमच्या कुलांत फार दिवस कोणी जगत नाहीं. पण तुह्मांस तें सत्ययुग पहावयास मिळो येवढीच इच्छा आहे." असो, हे धैर्याचल यत्किंचितही न डगमगतां रशिआशीं लढाई करणें योग्य नाहीं, तीपासून अनंत अपराध उत्पन्न होणार असें, प्रसंग आला ह्मणजे बोलत असत. पण त्यांचें कोणी ऐकेना ह्मणून त्यांनीं थोडे दिवस सार्वजनिक सभेचा त्यागच केला. पुढें कांहीं दिवसांनीं, राजपक्षाविरुद्ध लोक बोलूं लागले तेव्हां काब्डेननें स्पष्ट सांगितलें कीं "हा सर्व दोष राष्ट्राचा आहे व राष्ट्राच्या दोषाचें खापर मी विशेष व्यक्तींच्या डोक्यांवर फोडूं इच्छित नाहीं." असो, पुढें बरेच दिवसांनीं पुनः आपलें मन ते लोकांपुढें प्रतिपादन करूं लागले. प्रथमतः त्यांची राळ उडालीच व 'क्रिमिआ लढाई' विषयावर तर त्यांचा पुरा फजिता झाला. पण दृढनिश्चयानें व महा धैर्यानें त्यांनीं स्वीकारलेल्या मार्गाचा त्याग न केल्यामुळें लोकांत त्यांच्या मताचा हळू हळू प्रसार (तरी यास बराच काळ लागला) होत गेला, व शेवटीं त्या मताचा इतका पगडा बसला कीं यापुढें युरोपांत ज्या अनेक *लढाया झाल्या त्यांत इंग्लंडानें स्वतः शिरण्याची कधींही इच्छा प्रदर्शित केली नाहीं. प्रथमतः काब्डेननें हाउसमधील प्रतिनिधींचें मन वळविलें, व याच वेळीं दोन भाषणें इतकीं उत्कृष्ट केलीं कीं सर्वांनीं त्यास शाबासकी दिली व ग्लॅडस्टनपेक्षां सुद्धां काब्डेन चांगलें बोलला अशी शिफारस केली. लोकमताचा ओघ दिशा फिरवूं लागला. अन्नवस्त्र महाग होऊं लागलें तेव्हां तह करण्याविषयींची इच्छा मोकळेपणानें

* १ फ्रान्स व आस्ट्रिआ यांच्यामधील, २ अमेरिकेंतील, ३ डेनिश लोकांची, ४ फ्रान्स व जर्मनी यांच्यामधील, ५ रशिआ व टर्की यांजमधील.

हिंडूं लागली. याच वेळेस काब्डेननें " पुढें काय ! आणि पुढें-!" या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें त्यांत रशिआचे बलाबलाचा विचार करून इंग्लिश लोकांस 'आह्मी रशिआमध्येंच त्याचा पराभव करूं' ही जी ऐट होती तिचें दूरीकरण करण्याचा प्रयत्न केला.

लढाई एकदांची १८५६ मध्यें आटपली. तह करण्यास जे वकील जमले होते त्यांनीं काब्डेनचीं दोन तत्वें कबूल केलीं. पहिलें, मतांतराचें निराकरण प्रथमतः पंचमार्फत करावें व दुसरें, शांततेच्या वेळीं जशी, व्यापारी जहाजांस वाटेल तिकडे जाण्यास मोकळीक असते तशीच लढाई चालू असतांनाही असावी अशी योजना करण्याचे उपाय शोधून काढावे. हें काब्डेनच्या दृढानुसरणाचेंच फळ नव्हे काय ?

या वर्षी त्याच्यावर दुर्दैवाचा एक दुर्धर घाला पडला. असला प्रसंग आल्यावर पुढें कांहीं दिवसांनीं मनुष्यें हुषार होऊन आपलें कामकाज करूं लागतात; पण त्यांच्या मनाची पूर्वीची आनंदी स्थिति असते ती पुनः येत नाहीं. काब्डेनचा एकुलता एक हुषार व होतकरू मुलगा एकाएकीं वारला. तो चांगला, सशक्त व निरोगी असे. पण तापाचे निमित्त होऊन तो आपल्या मातापितरांस दुःखसागरांत लोटून चालता झाला. विनञ्हिम येथील शाळेंत तो विद्याभ्यासाकरितां राहिला होता; तेव्हां त्याच्या मरणाची वार्ता काब्डेन यास पत्रद्वारें समजली ! मग त्याच्या मनाची स्थिति काय विचारावी ? त्याच्या बायकोनें तर शोकानें आकाशपाताळ एकच केलें. आजारी पडून अंथरुणाशीं खिळलेल्या मनुष्याचे मरणानें इतकें वाईट वाटत नाहीं; कारण त्याच्या मरणाची वार्ता ऐकण्याची मनानें कांहीं तरी तयारी केलेली असते. पण आठच दिवसांपूर्वी ज्याचें 'मी सुसरूप आहें, कांहीं काळजी करूं नये' असें पत्र आलें होतें व ज्याच्यावर सर्व कुटुंबाची पुढील भिस्त होती, तो एकुलताएक मुलगा, कांहीं सूचना न देतां, परलोकीं गेला असें ऐकून मातेचें हृदय कसें शतधा विदीर्ण होतें याची कल्पना इतरांकडून होणें अशक्य आहे. काब्डेनच्या मोकळ्या व साध्या मनास मोठा धक्का बसून त्यानें हे शब्द उच्चारलेः—"ईश्वरा ! आयुष्य हें काय विचित्र गूढ आहे ? असा तरुण, असा हुषार, माझा मुलगा, ज्याच्या भोंवतीं आमचे आशातंतू व इच्छावल्ली आज पंधरा वर्षें सारख्या दृढतर होत जात होत्या, त्यानें एका क्षणांत वठून जाऊन लहानशा झुडपाप्रमाणें नाहींसें

होऊन जावेना!" हे पहिले शब्द त्याच्या तोंडांतून गेले इतकेंच. पुढें या अज्ञेय कूटावर विचार करीत बसणारा त्याचा आत्मा नव्हता. 'ईश्वराची मर्जी' असें ह्मणून त्यानें स्वतःस धीर दिला. पण त्याच्या बायकोची फार दिवसपर्यंत जी विपरीत स्थिति झाली तिच्या योगानें त्याची काळजी फारच वाढली. तिच्याविषयींचें ममत्व व तिला सुख देण्याची कळकळ यांचा त्याजजवळील सांठा केवळ अक्षय्यच ह्मणून टिकला. "मी तिला विसंबून एक क्षणभर देखील बाहेर जात नाहीं. काय करावें? अफू वगैरे दिल्याशिवाय तिला झोंप येत नाहीं. तिला सध्यां लहान मुलासारखी वागवावी लागते. मी राजकीय खटपटींत होतों तेव्हां, तिच्या सुखाच्या व गृहशांतेच्या आड मी केव्हांही आलों तरी, तिनें एक चकारशब्द सुद्धां त्या वेळेस काढला नाहीं, हें ध्यानांत ठेवून मी आतां निश्चय केला आहे कीं तिचें दुःख शमन करण्याच्या कामीं आपला सगळा वेळ व लक्ष द्यावयाचें. मुलावर फारच ममत्व होतें म्हणून तिचें धर्मानें अगर विचारानें बिलकुल शांतवन होत नाहीं. ईश्वर याबद्दल तिला क्षमा करो." कोणतेंही दुःख एकटेंच येत नाहीं. घरांत, बाहेर त्याच्यामागें संकटपरंपरा लागली. त्याच्या सर्व काळवडी मेल्या. बागेतल्या फुलांचा आभाळानें नाश केला. चांगलें गवत वाढलें होतें त्याचा पावसानें फडशा पाडला. इतक्यांत आपला परम स्नेही ब्राइट आजारी पडल्याचें त्यानें ऐकिलें. मग काय? पुढील कार्याची सर्व जबाबदारी ज्याच्या शिरावर होती तोच आजारी पडला तेव्हां मात्र त्याचें धाबें गडबडलें. असो; ब्राइट बरा असल्याची आनंदाची खबर त्यास लवकरच मिळाली. त्याच्या स्नेह्यांनीं व शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं त्याचा चांगला समाचार घेतला. मिसेस काब्डेन हळूं हळूं बरी होत चालली. आपल्या मुलीकडे बघून ती आपलें दुःख विसरूं लागली. *ब्रोघामनें त्यास सांगितलें कीं "दुःखाचा विसर पडतो कामानें, काळानें नव्हे; तेव्हां काम करावयास लागा." त्याचें मन हुषार होऊन पुनः तो राजकीय प्रकरणांत मन घालूं लागला. जमीनविक्रीचे जे घोटाळ्याचे कायदे होते ते मोडून सोप्या रीतीनें जमिनीचा व्यवहार कसा होईल हा विषय त्यानें हातीं घेतला.

१८५७ त चीनची लढाई निघाली. नेहमींप्रमाणेंच वकिलाची चूक

* एक प्रसिद्ध वक्ता व कायदेपंडित.

असून त्यानें रागानें चीनसरकारास वेड्यासारख्या अटी सांगितल्या त्यामुळें ही लढाई जुंपली. वाचकांस काब्डेन कोणत्या मताचा होता हें सांगावयास पाहिजे काय? चीनचा वकील त्याचा मित्र होता तरी त्यानें दुष्कर्म केलें सबब त्यास कामावरून काढून एकदम परत बोलवावें व तेथील प्रसंगाची चौकशी करण्याकरितां मंडळी नेमावी अशी त्यानें सूचना केली. निरनिराळ्या कारणांनीं त्यास अनेक पक्ष येऊन मिळाले व प्रधानमंडळींचा १६ जास्त मतांनीं पराभव झाला; तेव्हां पामर्स्टननें नवें पार्लमेंट बोलावण्याची राणीची आज्ञा घेऊन देशांत आपल्यासारखें मत करण्याच्या हेतूनें तो स्वारीस निघाला. काब्डेनास या स्वारीचीं दुश्चिन्हें प्रथमपासूनच दिसूं लागलीं होतीं. त्याच्या विद्येसंबंधीं व लढाईसंबंधीं मतांनीं त्याच्या व ब्राइटच्या विरुद्ध लोकमत झालें होतें. वेस्ट रायडिंग गांव सोडून देऊन हडर्सफील्ड येथें प्रतिनिधि होण्याच्या इराद्यानें तो गेला. त्यानें आपल्या गैरजहर मित्राकरितां (ब्राइटकरितां) फार खटपट केली; परंतु दोहोंतही त्यास यश आलें नाहीं. निवडणुकीचा परिणाम असा झाला कीं मांचेस्टरपंथी एकही वजनदार गृहस्थ नव्या पार्लमेंटांत आला नाहीं!! ब्राइटबद्दल अतिशय वाईट वाटून व इंग्लिश लोकांच्या कृतघ्नतेबद्दल संताप येऊन त्यानें ब्राइटास ही बातमी कळविली. ब्राइटनें उत्तर पाठविलें त्याचा थोडक्यांत सारांश येवढाच आहे कीं:— "आपला राजकीय पंथ लोकमताच्या फार पुढें आहे व आमची राज्यनीति वरिष्ठ प्रतीची आहे त्यामुळें वीस वर्षें अश्रांत परिश्रम करूनही लोकांनीं आमचा त्याग केला हें युक्तच आहे. तथापि थोडक्याच दिवसांत आपलीं मतें खरीं आहेत व राजनीतीचा सवदा करणारे लोक निवळ ढोंगी आहेत, असा प्रत्यय लोकांस येईल." पुढें लवकरच बर्मिंगहम येथें जागा रिकामी झाली तेथें ब्राइटचा जय होऊन तो पार्लमेंटमध्यें गेला. काब्डेन यास पार्लमेंटांत नेण्याची दोन तीन वेळ उचल झाली होती, पण घरगुती अडचणीमुळें त्यानें ह्या मागण्या नाकारल्या. शिवाय पार्लमेंटमध्यें जाण्याचा त्याच्या मनाचा कल बिलकुल नव्हता. मागें तो जो गेला होता तो, व्यापारस्वातंत्र्याचें महत्कृत्य तेथें गेल्यावांचून होणारच नाहीं असें वाटलें ह्मणून, मोठ्या जुलुमानें तेथील कैद स्वीकारण्यास तयार होऊन गेला होता.

याच वर्षीं त्याचा वडील भाऊ फ्रेड्रीक वारला त्यामुळें त्याच्या दुखांत

विशेषच भर पडली. या दोघांमधील प्रेम अगदीं निष्कपट होतें. त्या मुळें आपला एक आधार गेला असें त्यास वाटून तो बरेंच दिवस उदासीन झाला होता.

आयुर्दाय पुस्तकाचीं अर्धीं पानें उलटलीं ह्मणजे दुःखपरंपरेस प्रारंभ होत असतो. आपले इष्टमित्र, आतसोयरे, या वेळेस आपल्यास सोडून जावयास लागतात, व आपण मध्यावस्थेंतून निघून गेलों असतों ह्मणून नवीन स्नेह संपादन होत नाहीं. याकरितां पन्नाशी उलटल्यानंतर पुढें एखाद्या पिढीभर जगणें परम दुःखकारक होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

# भाग तेरावा.

## ५७चें बंड. व व्यापारिक तह.

निवडणुकीची गडबड आटपते आहे नाहीं तोंच अंगावर रोमांच उभे करणाऱ्या हिंदुस्थानांतील बंडाची बातमी येऊन थडकली. हिंदुस्थानांत चालूं केलेली राज्यपद्धति काब्डेनास कधीं आवडली नव्हती. तेथील अंमल लष्करी व जुलुमाचा, राज्य मिळविलें तें कपटानें व जबरदस्तीनें, उत्पन्नाच्या संबंधानें नेहमीं भीति, या व दुसऱ्या अनेक कारणांनीं त्याचें मत असें झालें होतें कीं या राज्यपद्धतीपासून हिंदू अगर त्यांचे परकी यजमान या दोघांसही फायदा होणें नाहीं. "१०० वर्षें आमच्याशीं संबंध असूनही जे पशुतुल्य क्रूरकर्में करावयास सोडीत नाहींत त्यांच्यावर आह्मीं कां राज्य करावें? व्यापाराकरितां मक्त्याची सनद घेऊन आह्मीं तेथें गेलों. मक्त्याची मुदत संपली. आतां आह्मीं तेथें कां आहों याचें कारण मला समजत नाहीं. सर्व देश ख्रिस्तानुयायी करूं इच्छिणाऱ्या धर्माधिकाऱ्यांस 'कसें काय' ह्मणून विचारण्यास ही संधी खाशी आहे. हिंदुस्थानांत सुधारणा करूं इच्छिणारे लोकांशीं माझें बनणार नाहीं. कारण येथून हिंदुस्थानावर योग्य अम्मल करणें भगीरथ श्रमाचें काम आहे. पाताळलोकांतून जाणाऱ्या पाव्हण्यांनीं कितीही चांगल्या रीतीनें राज्य केलें

तरी तें त्या लोकांस गोड वाटणार नाहीं." हीं त्याचीं येथील राज्यपद्धतीविषयीं व येथील लोकांविषयींचीं मतें होतीं. 'होतां होईल तितकें करून हिंदुस्थानचें राज्य सोडून द्या' असा त्याचा घोष चालला होता. कालमानानें त्याच्या मतांपैकीं कांहीं खोटीं ठरत चाललीं आहेत हें खरें, तथापि लोकहितकारी व मितव्ययी राज्यपद्धत असावी अशाविषयीं त्याचा कटाक्ष केवढा होता हें दिसून येईल. एकसाव करून तात्पुर्तिक मिळालेल्या कीर्तीचा अगर पोकळ डामडौलाचा त्यास कंटाळा होता हें 'हिंदुस्थानचें राज्य सोडून द्या' ह्या वाक्यावरूनच व्यक्त होतें. असो, पार्लमेंटमध्यें पुनः जावें अशी त्यास इच्छा उत्पन्न होऊं लागली होती. पाल्मर्स्टनचा एका मसुद्यावर पराजय झाला ह्मणून त्यानें राजीनामा दिला व लार्ड डरबी हा मुख्य प्रधान झाला. राजनीति भ्रष्ट करणारा पालमर्स्टन राज्यकारभारांतून गेला ह्मणून त्यास बरें वाटलें.

यावेळेस त्याच्या घरगुती अडचणींनीं पुनः कहर केला. कांहीं मालमिळकत घेऊन बाकी राहिलेले पैसे त्यानें अमेरिकेंत 'भाग' विकत घेण्यांत खर्च केले होते. या सट्टयामध्यें आपल्यास फायदा होईल अशी त्याची समजूत होती. पण ज्यास ह्मणण्यासारखें दुसरें कांहीं उत्पन्न नाहीं व भागाबद्दल पुष्कळ पैसे देण्याचे थकले त्याच्या घरांत नकारघंटा वाजूं लागली यांत आश्चर्य नाहीं. ही त्याची दैन्यावस्था एका मित्रानें ऐकून त्यानें, २५००० पौन्ड काब्डेननें देणे होतें, तें फेडून टाकिलें व भागाच्या पावत्या त्याकडे पाठविल्या. मनुष्याच्या कृतज्ञताबुद्धीचा महिमा असा आहे. "अन्नवस्त्राच्या नीच काळजीमुळें ज्या थोर मनाच्या गृहस्थाचा सार्वजनिक उपयोग नाहींसा होण्याची वेळ आली होती त्यास कर्जमुक्त करून मी त्याच्या ऋणांतून मुक्त होण्याचा व त्यास मानवी प्रगमनाच्या कष्टप्रद कार्यास मोकळें करण्याचा प्रसंग मला आला याबद्दल मी आपल्यास धन्य मानतों."

याच भागांच्या भानगडीमुळें त्यास अमेरिकेला जावें लागलें. तेथील व्यवस्था पाहून त्यास समाधान वाटलें व आपला फायदा खास होतो असें त्याचे मनानें घेतलें. ब्राइटजवळ अमेरिकेची हकीकत सांगितली ती अशी:—" या देशांत श्रेष्ठतरता दिसून येते, त्याचें कारण हें आहे कीं सर्व लोकांस समाजरंगभूमीवर आपला उदय व्हावा अशी इच्छा

आहे. अमेरिकेंतील लोकांस जी एवढी अहंमन्यता आहे त्याचें कारण तरी हेंच. या सर्वांवरून संपत्तिविपुलता व तदनुषंगिक सुख ह्यांवर राज्यपद्धति सर्वांशीं अवलंबून असते असें अनुमान काढण्यास तिळमात्र तरी हरकत आहे काय ? " काब्डेनच्या वाक्याचा भावार्थ असा कीं खाण्यापिण्याची ददात नसली ह्मणजे साधारणतः लोक सदाचारी, धूर्त, व्यवस्थेशीर व राज्यकार्यांत निरपक्षतेनें मन घालणारे असतात.

काब्डेन अमेरिकेंत असतांना इकडे पार्लमेंटीय जगांत मोठा फेरफार झाला. लोकांस जास्ती हक्क देण्याच्या मसुद्यावर डरबी प्रधानमंडलाचा पराजय होऊन त्यांनीं नवें पार्लमेंट बोलावलें. सर्व साधारण निवडणुकींत काब्डेन यास राचडेलच्या लोकांनीं पसंत केलें. ब्राइटनें आपल्या मित्राबद्दल चांगली खटपट केली त्यामुळें तेथें त्याच्या विरुद्ध कोणी प्रतिस्पर्धी भांडण्यास आला नाहीं. पार्लमेंट भरल्यावर पूर्वप्रधानांचा पहिल्यादांच पराजय होऊन त्यांस राजीनामा द्यावा लागला. पाल्मर्स्टन मुख्य प्रधान झाला व त्यानें काब्डेनास, व्यापारव्यवस्थापकमंडळीचा अध्यक्ष नेमण्याचें आपल्या मनांत आहे अशा अर्थाचें पत्र तो जहाजांतून उतरणार त्या गांवीं पाठविलें. तो जहाजावरून उतरल्यावर त्याचा आदरसत्कार करण्यास बंदरावर त्याची मित्रमंडळी गेली होती. जहाजांतच त्यास पाल्मर्स्टनचें पत्र मिळालें. तें पाहून त्यास आश्चर्य वाटलें. त्यास तेथें पुष्कळच मानपत्रें मिळालीं व त्याच्या स्नेह्यांनीं आलेली जागा पत्करावी असा आग्रह केला. पण त्यानें पाल्मर्स्टन विरुद्ध गेल्या वर्षांत अनेक वेळा आपलें मत प्रगट केलें असल्यामुळें व सरकारी काम पत्करण्याचा त्यास स्वभावतःच कंटाळा असल्यामुळें त्यानें मनाचा धडा करून ती जागा नाकारली व आपलीं कारणें सुपूर्त सांगण्याकरितां स्वतः पाल्मर्स्टनकडे जाऊन ह्मणाला, " तुमची पराराज्यपद्धति लढाईची, ढवळाढवळ करणारी व भांडखोर आहे; तुमच्या स्वराज्यपद्धतीबद्दल मी आपलें विरुद्ध मत अनेक वेळां प्रसिद्ध केलें आहे व माझ्या समजुतींत बदल झाला असें कोणासही समजलें नाहीं तेव्हां, मी प्रधान झालों तर माझ्यावर विसंगतीचा दोष येणार नाहीं काय ? " पाल्मर्स्टननें त्याचें मन वळविण्याची खटपट केली, व ' तुमचें मत प्रबल व्हावें अशी इच्छा असल्यास प्रधानमंडळींत येण्यानेंच मात्र ती गोष्ट सिद्धीस जाणार आहे,' असें ह्मणाला, व सरते शेवटीं ' सर्व मित्रांच्या साहाय्याशिवाय हें प्रधानमंडळ

चालणें कठीण आहे तेव्हां तुह्मीं आंत आलेंच पाहिजे,' अशी विनंति केली तेव्हां 'मी तुमची पद्धति सरळ असल्यास तिला मदत देण्यास झटेन' असें काब्डेननें त्यास वचन दिलें व आपण 'तुमच्या हाताखालीं चाकरी करण्यास तयार नाहीं सबब माफी करावी,' अशी त्याची विनंति केली. घरीं आल्यावर त्याच्या मित्रमंडळींनीं त्यास काम घेण्याबद्दल आग्रह केला म्हणून त्यास फारच वाईट वाटलें. "माझी घरगुती स्थिति पाहिल्यास मीं आलेलें काम टाकूं नये असें आहे, पण तें माझ्या मनाविरुद्ध होईल व मी अपकीर्तीस मात्र पात्र होईन. मी केलें आहे तें बरोबर आहे असा लवकरच प्रत्यय येईल." देशांत व फ्रान्सांत काब्डेन प्रधानमंडळांत येणार ह्मणून आनंद झाला होता. ही जागा काब्डेन पत्करीत नाहीं ह्मणून लोकांचें मन विरस झालें. ब्राईट मात्र त्याचे बाजूचा होता व 'काब्डेन शहाणा व दूरदृष्टी आहे' असें त्यानें बोलूनही दाखविलें. प्रधानमंडळींत ग्लाडस्टन मात्र लढाईच्या विरुद्ध होता. कामें सुरू झाल्याबरोबर पाल्मर्स्टनच्या पद्धतीप्रमाणें ढवळाढवळ सुरू झाली. देशामध्यें त्याच्या बाजूचे लोक अतिशय होते तेव्हां काब्डेन व ग्लाडस्टन हे प्रधानमंडळांत एकत्र झाले असते तरी विशेष उपयोग झाला नसता. पुढें लवकरच ग्लाडस्टन यास प्रधानमंडळांतून राजीनामा द्यावा लागला. काब्डेननें केलें तें रास्त केलें असें आतां लोक म्हणतात. 'वारा येईल तशी पाठ द्यावयाची' हा गुण त्याच्या अंगांत बिलकुल नव्हता. एकदां स्नेह केल्यानंतर हजारों अडचणी आल्या तरी तो आपल्या मित्राची पाठ सोडीत नसे. पण प्रथमतः स्नेह करण्यांत तो फार विचारपूस करी. पाल्मर्स्टनचें आपलें जमणार नाहीं हें त्यास पूर्णपणें अवगत होतें ह्मणून त्यानें स्वीकारलेला मार्गच योग्य आहे असें ह्मणणें आपणास भाग पडतें.

१८५९ च्या अयनांत पार्लमेंटमध्यें ब्राईट ह्मणाला कीं "फौज जमविण्यांत व्यर्थ पैसे खर्च करण्यापेक्षां फ्रान्सच्या बादशहाकडे जाऊन व्यापारस्वातंत्र्यपद्धत्यनुसार तेथील लोकांचा इंग्लंडाशीं निर्बंध व्यापार करण्याची खटपट केली असतां जास्ती फायदेशीर होणार नाहीं काय ?" हें भाषण *मायकेल शिव्हेलियर यानें वाचल्यावर त्याच्या

---

* फ्रान्सदेशांतील एक बडा अर्थशास्त्री.

मनांत इंग्लंड व फ्रान्स या दोघांमध्यें व्यापारिकसंधी करावा असें येऊन त्याप्रमाणें काब्डेनास त्यानें पत्र लिहिलें. पुढें शिव्हेलियर इंग्लंडांत कांहीं कारणास्तव आला तेव्हां त्यास कळलें कीं काब्डेन कांहीं घरगुती कारणाकरितां सर्व हिंवाळा पारिस शहरांतच घालविणार आहे. तेव्हां काब्डेनकडे जाऊन त्यानें त्यास बादशहाचें मन व्यापारस्वातंत्र्याकडे वळवावें अशी विनंति केली. प्रधान मंडळींत काब्डेनचा ग्लाडस्टनावर कायतो भरवसा होता; कारण नीति आणि राजकारण या दोन्हींमध्यें दोघांचीं मतें बहुतेक एकसारखींच होतीं तेव्हां *हवार्डन येथें काब्डेन गेला व त्यास आपले विचार सांगितले. शिवाय आणखी सांगितलें कीं "लवकरच आतां वार्षिकवतनासंबंधीं वीस लक्षांची रक्कम मोकळी होणार आहे तेव्हां तुह्मांस कोणता तरी कर सोडावा लागेलच. तर फ्रेंच पदार्थांवरील जकात माफ केल्यास तेथील लोकही संरक्षक पद्धति सोडण्याचा आग्रह धरतील व उभय देशांचें कार्य होईल." ह्यास पुष्कळ अडचणी येतील हें दोघांसही माहीत होतें. पण इंग्लंड निर्बंध व्यापार करण्यास तयार आहे असें बादशहास खात्रीपूर्वक वाटलें तर मात्र तो फ्रान्सांतील व्यापार स्वतंत्र करूं शकेल असें शिव्हेलियरचें सांगणें उभयतांस पसंत पडलें; आणि ग्लाडस्टननें आपल्या अंदाजाच्या वार्षिक खरड्यावर भाषण करतांना उभयतांमध्यें ठरलेला सर्व बेत प्रतिनिधींस उलगडून सांगितला. काब्डेन पारिसाला जाणार होताच तेव्हां 'ब्रिटिश सरकारतर्फें खासगत रीतीनें पहिल्या गोष्टी ठरविण्यास आलों आहें' असें सांगून त्यानें युक्तिबद्ध, आपल्या गोड, व मनमिळाऊ भाषेनें बादशहास आपल्या मताचा करावें असें ठरलें. पाल्मर्स्टन व जान रसेल यांना हें काम फारसें आवडलें नाहीं तरी त्यानीं त्याच्या मार्गांत यावेळीं कोणतेही अडथळे आणले नाहींत. काब्डेन आक्टोबरमध्यें पारिसास गेला. त्यानें इंग्रजी वकील लार्ड कौले याची गांठ घेतली. ह्या भेटींत बादशहा सरळमार्गी व वचन पाळणारा आहे असें त्यास कळलें. नंतर व्यापाराचा प्रधान रोहर याची गांठ घेऊन त्याचें मन वळविलें व बादशहाकडून आपल्यास आमंत्रण येईल अशी व्यवस्था करविली. बादशहाची भेट घेतली. तेथें ओघाओघानें व्यापारस्वातंत्र्याचा विषय काढला, आणि "ग्लाडस्टनच्या स्तुतिपात्र फडणीशी-

---

* ग्लाडस्टनची राहण्याची जागा.

झाली शिल्लक जास्त राहत चालली आहे ह्मणून फ्रान्सदेशस्थ पदार्थांवरील जकात कमी करतां येण्यासारखी आहे, व व्यापारिकसंधी करण्यास ग्लाडस्टन एका पायावर तयार आहे" हें सांगितलें. १८६१ पर्यंत फ्रान्स येथील जकाती बदलतां येणार नाहींत ह्मणून बादशहा ह्मणाला, तेव्हां 'सध्यां संधी करण्यास हरकत नाहीं, कलमें हळू हळू अमलांत आणतां येतील' असें काब्डेननें उत्तर दिलें व सांगितलें कीं 'जी गोष्ट तुमच्या देशास अतिशय जरूरीनें लागते त्या वस्तूवरील ह्मणजे लोखंडावरील जकात माफ करा; या माफीनें स्वदेशांतील धंदा बुडेल ही सामान्यसमजूत चुकीची आहे असा इंग्लंडांत प्रत्यय आला आहे.' फ्रान्स राजाचा डामडौल पाहून लोकसत्तात्मक राज्यें फार मितव्ययी असतात अशी त्याची खातरी झाली. बादशहानें त्यास आपल्या येथें दोन दिवस राहावयास बोलावलें; तो सन्मान त्यानें नम्रतापूर्वक नाकारिला. तेथील मुत्सद्यांशीं वादविवाद केला व त्यांस आपलेकडचे करून घेतले. मध्यें इंग्लंडास जाऊन आला तेव्हां ग्लाडस्टन, व पालमर्स्टनच्या गांठी घेतल्या. पहिल्या मुत्सद्यानें त्यास उत्कृष्ट मदत दिली. पालमर्स्टन 'दारूगोळा' बोलूं लागला तेव्हां फ्रान्स इंग्लंडशीं लढाईस येणार नाहीं अशी त्याची खात्री केली. फ्रान्सला परत जातांना काब्डेनची परसिग्नि (फ्रेंचांचा इंग्लंडांतील वकील) यानें भेट घेऊन भावी व्यापारसंधीमध्यें होईल तितकी मदत करीन ह्मणून कबूल केलें. फ्रान्समध्यें परत आला तों काब्डेन आजारी पडून बरेच दिवस बिछान्याला खिळून होता, तथापि मुत्सद्यांशीं वादविवाद सुरू होताच. मुत्सद्दी एकदांचे वळले तेव्हां त्यांनीं तहाचा मसुदा तयार केला. मध्येंच बादशहाचें मन फिरलें व असला तह करण्याचें आपल्यास कारण नाहीं असें ह्मणाला. मग इंग्लंडाहून परसिग्नि येऊन 'तुह्मी तह केला नाहीं तर लवकरच दोन देशांत युद्ध सुरू होईल असें तेथील लोकमतावरून दिसतें' असें त्यानें सांगितल्यावरून इंग्लिशलोकांचा आपल्या विषयींचा संशय दूर करावा हा हेतु साध्य करण्याकरितांच केवळ त्यानें तहास अनुमोदन दिलें. पुढें फ्रेंच सुमंताची गांठ पडली तेव्हां पुनः 'येरे माझ्या मागल्या' असें होऊन त्याचें मन वळवावें लागलें. सर्व ठिकाणीं जयलाभ मिळाल्यावर फ्रेंच बादशहाकडून सरकारी नात्यानें हा तह लार्डकौलेकडे आला. त्यानें आपल्या सरकाराकडे 'यावर हुकूम मिळावा' या अर्थाचें पत्र पा-

ठविलें. इकडे काब्डेन अश्रांत श्रमानें व अनंत युक्त्यांनीं तहाचें कलमवार समजूत पडेल अशी व्यवस्था लावीतच होता तों त्यास सरकारी हुकूम तह करावा ह्मणून आला. बादशाहाच्या गांठी घ्याव्या लागल्या. फ्रान्स एकसत्ताक राज्य असल्यामुळें बादशाहाच्या लहरीवरच कायतो सर्व कारभार अवलंबून असे. इंग्लिशलोक तहास आतुर आहेत असें समजून इटलीच्या स्वारींत त्यांस सामील करून घ्यावें असें बादशाहा येत करूं लागला तेव्हां काब्डेननें या तहाचा असा विपरीत परिणाम होणार ह्मणून त्याचा नाद सोडून देणार होता. असो; पुनः सर्व सुरळीत होऊन तहाचा कलमवार मसुदा फ्रेंचप्रधानमंडळापुढें आला. तेथें पुनः लढाई सुरू झाली ती सारखी दोन दिवस चालली होती. फ्रान्स देशांत चळवळ उत्पन्न झाली. कोणी संरक्षकपद्धतीपासून स्वहिताचा नाश होता म्हणून, व इतरत्र बादशाहास चांगलें कृत्य करून द्यावयाचें नाहीं ह्मणून, या तहासंबंधानें सर्वत्र हल्ला सुरू झाला. प्रत्येक तासाला तहाच्या विरुद्ध असणाऱ्या लोकांचें बल वाढूं लागलें. लोखंडाचे व कापसाचे व्यापारी राजवाड्यांत गर्दी करून जमले. वर्तमानपत्रांतून, पुस्तकांतून सरोष लेख येऊं लागले. इतक्या सगळ्या आगींतून बाहेर पडून तहाची सही करण्या पर्यंत मजल येऊन पोहोंचली. काब्डेनास जीव नकोनकोसा होऊन तो रंजीस आला. पण या खटपटीच्या योगानें दोन्ही देश एकमेकांवर अवलंबून एकेरीवर बहुधा येणार नाहींत असा सत्परिणाम लक्ष्यांत येऊन त्यास आनंद झाला. त्याची प्रकृति बिघडलेली होतीच, पण त्यानें ज्यान्युआरी २९ ला आपणच होऊन अंगावर घेतलेल्या कामाचा निकाल लावला.

जुलूम आणि गैरकायदा हें जिचें मूळ, लोकमत बंद करण्याचा जेथें यत्न, कुमार्गास लावण्याची जेथें शिस्तवार योजना व चौकशीशिवाय मारक तुरुंगांत पाठविण्याची जेथील न्यायपद्धति, अशा राज्यपद्धतीचा प्रतिनिधी नेपोलियन याच्याशीं तह केला हें, काब्डेननें वाईट काम केलें, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. राज्यपद्धति कांहीं अन्य हेतु साध्य करण्याकरितां आहे व ती चालविणारास पूर्णाधिकार पाहिजे असें ह्मणणाऱ्यापैकीं काब्डेन एक होता व तात्विक राज्यपद्धति उत्पन्न करणारे, राज्यसंस्था नको ह्मणणारे, व बडबडणारे, अशा लोकांच्या हातांत राज्यसत्ता असण्यापेक्षां कांहीं व्यवस्था राखून चांगली राज्यपद्धति

सुरू करण्याचा निदान संभव तरी फ्रान्स देशांतील एकसत्ताक पद्धतींत आहे असें त्यास वाटत असे, व फ्रेंच लोकांनीं विचार करून सोपस्कारपूर्वक जी राज्यपद्धति स्वीकारली तिला नांवें ठेवण्याचा दुसरे देशांतील लोकांस अधिकार नाहीं, अशी त्याची समजूत होती; व खाणें, पिणें, रास्त रीतीनें संपत्ति उत्पन्न करणें, ह्या गोष्टी या तहानें सुलभ होतील अशी त्याची कल्पना होती ह्मणून तो या सर्व खटपटींत शिरला इतकेंच त्याच्या तर्फेनें ह्मणतां येण्यासारखें आहे.

---

# भाग चवदावा.

## परमार्थ लाभ.

प्रकृति सुधारण्याकरितां तो दक्षिण फ्रान्सांत गेला. तेथील वनशोभा पाहून त्यास आनंद झाला. तेथें अनेक प्रकारच्या लोकांपासून तो आपल्यास उपयोगी माहिती काढून घेई व कांहीं वेळ विनोद करण्यांत घालवी. २२ मार्चला तो पारिसास गेला. तेथें बादशाहानें सन्मानपूर्वक त्यास एक पेला नजर केला. नंतर तो इंग्लंडास परत आला. तेथें पुनः गृहदुःखानें त्यास पछाडलेंच. त्यानें व्याजीं लावलेला सर्व पैसा बुडाला हें पाहून तो मोठ्या फिकिरींत पडला. त्यानें आपल्या जुन्या एका मित्रास दुःखानें पत्र लिहिलें. "तुम्ही १०१५ जण मिळून माझ्या जमिनीवर मला पैसे द्याल तर बघा. माझ्या मागें मुलांचें काय होईल या काळजीनें माझे केंस पांढरे होत चालले. प्रधानमंडळ वर्षाचे २००० पौंडांची जागा देण्यास तयार आहे पण मी ती पत्करूं कोणत्या तोंडानें! मुलांबाळांकरितां मी ती पत्करिली असती पण काय करूं? सार्वजनिक मनुष्याचे पाठीमागें हें एक लचांड असतें कीं त्याचीं सर्व गृहदुःखें जगापुढें मांडलीं जातात!" व्याजानें पैसे मिळण्याची आशा नव्हती तेव्हां १०० मित्रमंडळी एकत्र होऊन त्यास ४०,००० पौंड त्यांनीं बक्षीस दिले!! घरचा संसार सोडून देऊन सार्वजनिक कामास ज्यानें आपल्याला वाहून घेतलें होतें अशा महासाधूस हें बक्षीस योग्य तर होतेंच, पण ज्यांनीं त्यास संकटमुक्त केलें त्यांचें औदार्य व कृतज्ञता हीं या योग्य बक्षिसानें व्यक्त झालीं.

या तहाचा सर्व इतिहास व अंतर्व्यवस्था पाहाण्याची आपल्यास गरज नाहीं. जान रसेलनें पार्लमेंट पुढें तो तह ठेविला, व या तहास अनुलक्षून अंदाजाच्या खर्डयांत काय व्यवस्था केली आहे, तें ग्लाडस्टन यानें आपल्या अत्यंत सुंदर भाषणांत व्यक्त करून दाखविलें, व भाषण संपवितांना ह्मणाला " १४ वर्षांमागें अतिशय महत्वाचें व लक्षांत ठेवण्यासारखें देशाचें काम केल्यानंतर, पदव्या अगर कुलीनता यांनीं सुशोभित न झालेल्या मनुष्यानें फिरून एकवार आपल्या देशाचे हिताचें महत्कार्य सिद्धीस नेल्याचें या क्षणिक जगांत क्वचितच दुसरें उदाहरण सांपडेल." बराच वादविवाद झाल्यावर आपल्या फायद्याची ही गोष्ट आहे अशी खातरी झाल्यामुळें ३१६ मतें प्रधानपक्षास मिळालीं व फ्रान्सांतून आणलेला तह कायम ठरला. नंतर जकात कशी ठेवावयाची वगैरे कच्च्या प्रश्नांचा निकाल करण्याकरितां ३ माणसांचें कामिशन पाठवावें असें प्रधानमंडळीनें ठरविलें. कमी दरजाची जागा ह्मणून काब्डेनचें नांव घालण्यास प्रधान भ्याले, पण आपण गेल्याशिवाय शेवट लागावयाचा नाहीं व आरंभलेलें कार्य सिद्धीस जाणार नाहीं ह्मणून त्यानें आपण होऊनच ' मी जातों ' असें कबूल केलें. इंग्लंडांतील व्यापारसंबंधीं प्रधानाच्या कचेरींत हा तह फारसा आवडत नव्हता व काब्डेननें लोखंडावर शेंकडा तीस जकात ठेऊन दिली, याबद्दल लोकांस फार राग आला होता, पण पूर्णमक्तापद्धतीपासून, निर्बंधव्यापारपद्धतीकडे लोकमत येण्यास फार अडचणी आहेत हें काब्डेन यास माहीत होतें. शिवाय फ्रेंच व्यापारिकप्रधान व बादशाहा यांनीं असें वचन दिलें होतें कीं 'दरवर्षी थोडथोडी जकात कमी करतां येईल. ' या वचनावर भरंवसा ठेवून ती भयंकर जकात काब्डेननें राहूं दिली होती. तथापि त्याची खातरी होती कीं थोड्या दिवसांत ही जकात नाहींशी होईल. त्याची आशा सफल झाली. त्याचें काम करण्याचें साधन कपट अगर लढाई हे नव्हतें. सरळपणा व विश्वास हीं सुमंताचीं दोन मुख्य अंगें आहेत व त्यानेंच जयसिद्धि होते असें त्याचें मत होतें तें खरें झालें. फ्रान्सराजधानींत तो २० एप्रिलला आला. जकातीची खटखट ५ नोव्हेंबर पर्यंत चालली होती. कामाच्या त्रासदायक पर्वतानें त्याचा पुरा वचपा काढिला. जकातीचें सर्व प्रकरण एका ' कमिशन ' पुढें सुरू झालें. इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांतून साक्षीदार बोलावले. काब्डेनचें

काम इंग्लिश साक्षीदारांस कोणता मजकूर कशा रीतीनें सांगावयाचा हें तयार करून, पुन: त्याचें फ्रेंच भाषेंत भाषांतर करावयाचें, हें असे. इंग्लिशांचे तीन असामी व फ्रेंचांचे नऊ, असें कमिशन बसे. शेंकडों धंद्यांची माहिती रात्रीं करून घ्यावी व दुपारच्या आंत ती तयार करावी, असा सारखा क्रम चालला होता. फ्रेंच लोकांस जाग्यावर माहिती मिळत असल्यानें व जन्मादारभ्य तेंच काम केलें असल्यानें त्रास पडत नव्हता. फ्रेंच लोक जकात ३० असावी म्हणत; काब्डेन ह्मणे १० असावी. मोठें तुमुल युद्ध झालें. या युद्धांत पहिल्या प्रतीच्या वकिलाचें चातुर्य व सौजन्य यांची गरज असून व्यापारिक सर्वसंग्रह तयार करणाऱ्या कोशकाराचे काबाडकष्ट करण्याचें सामर्थ्य हवें होतें. लोखंडानें तर त्यास दमविलें. फ्रेंचलोक आपला व्यापार बुडेल या भीतीनें खोटें सांगत, तें जास्तच संतापाला कारण होई. या ' कमिशनांत ' रोहर होता ह्मणूनच कायतो काब्डेनास धीर येई. तो रोहरास इंग्लंडचा पील असें ह्मणे. कामाचा कचका सारखा चाललाच होता. २ पासून ६ पर्यंत सुमंताच्या कचेरींत वाद करावा. जेवल्यावर व्यापाऱ्यांनीं कोष्टकें, माहिती, उतारे वगैरे पाठविले असतील त्यांची समजूत करून घ्यावी. सकाळीं पत्रव्यवहार करावा; कोणाच्या गांठी घेणें असल्यास घ्याव्या. ११ वाजतां इंग्रजी कमिशनरांकडे जाऊन त्यांनीं जमविलेल्या माहितीचें परीक्षण करून वाद करावा व सगळ्यांनीं मिळून २ वाजतां फ्रेंच सुमतांच्या कचेरींत वाद करण्यास जावें, असें सारखें चाललें होतें. मधून मधून त्यास विसावा मिळे हें खरें; कधीं गायनसमाजांत जावें, कधीं सहभोजनास जावें, कधीं फ्रेंच पार्लमेंटांत जावें वगैरे गोष्टींनीं कांहीं विरंगुळा होई, पण रात्रंदिवस तहाच्या संबंधानें काळजी असल्यामुळें त्यास चैन पडेना. यावेळेस त्यानें लिहिलेल्या दिनचर्यालेखांत फ्रेंच लोक बादशहाची कशी मनधरणी करितात, इंग्लिश प्रधान मंडळाविषयीं बादशहाचा ग्रह कसा आहे, लढाईच्या गोष्टी तो किती वेळ बोलतो, जास्त प्रांत मिळविण्याची फ्रेंच लोकांस अपेक्षा किती आहे वगैरे त्याच्या नजरेस आलेल्या गोष्टी त्यानें लिहून ठेवल्या आहेत. आपण ज्याकरितां आलों त्या कामाची काळजी व इंग्लंडांत लढाईची तयारी होत असलेल्या खबरांनीं झालेली उद्विग्नता यानें त्याच्या मनास विक्षोभ झाला. फ्रेंच बादशहा जें काय करी त्याचा विपरीत अर्थ होऊन इंग्लंडांत लढाईचें वेड पिकलें. प्रधानमं-

इळही सर्वांबरोबर चांगले झालें, व पाल्मर्स्टन बादशहाचा मित्र होता तरी 'बादशहाच्या मनांत इंग्लंडचें नाक खालीं करावयाचें आहे' अशी त्याची समज होऊन तो युद्धसामुग्री जमवूं लागला. जान रसेलनें त्यावेळेस एक पत्र काब्डेनास लिहिलें त्यांत इंग्रजी सुमंत ह्मणतातः "तुह्मी केलेलें काम सर्वमान्य होऊन फ्रान्स व इंग्लंडचें युद्ध कधींही न होण्याची पाळी लवकरच येवो. तथापि आपलें बेट चोहोंकडून सुरक्षित असावें तें बरें; कारण स्वायत्त राजाला शासन करण्याचे कामीं हेंच तेवढें स्वतंत्रतादेवीचें स्थान समर्थ आहे!" या वेडांत न शिरलेला असा प्रधानमंडळांत एकच माणूस होता. ग्लाडस्टनच्या भाषणानें जरी सर्व लोक आनंदानें मोहून जात तरी पाल्मर्स्टनइतकें त्याचें वजन नव्हतें; त्याचें कारण हें कीं शांततापक्षाला सध्यां उतरती कळा लागली होती.

हा सर्व प्रकार पाहून काब्डेननें संतप्त होऊन मुख्य प्रधानास खसखशित पत्र लिहिलें त्यांत 'थोडे दिवस दम खाल्ला असतां बादशहाचे हेतु कळून येतील, सर्व तहाचीं कलमें प्रसिद्ध झाल्यावर इंग्लिश लोक लढाईचा विचार सोडून देतील, तुमच्या युद्धाच्या भाषणापासून, तहानें जो फायदा होण्याचा संभव होता, तो कमी होत चालला आहे, बादशहाचा लढाई करण्याचा मुळींच बेत दिसत नाहीं, तुमच्या फौज वाढविण्याच्या बोलण्यानें माझी योग्यता कमी होते हें लक्षांत ठेवून कांहीं दिवस तरी निदान दम खा' असें लिहिलें. या त्याच्या महत्वाच्या पत्रास पाल्मर्स्टननें पार्लमेंट सभेंत उत्तर दिलें!! "मी तहाचें महत्व समजतों, तथापि तह काय, मनास येईल तेव्हां मोडतां येईल. आजपर्यंत फ्रेंच बादशहानें जरी आपल्या विरुद्ध वर्तन केलें नाहीं तरी, न जाणों वेळ आहे, ६००,००० सैन्य व अजिंक्य आरमार घेऊन पटदिशीं ४ तासांच्या आंत इंग्लंडावर तो स्वारी करावयाचा! करितां किनाऱ्यावरील बंदरांची दागदुजी करणें रास्त आहे व तेथें फौजफांटा ठेवणें अवश्य आहे." कसे आहेत खासे प्रधान!!

काब्डेनच्या पत्राला रसेलनें जबाब पाठविला त्याचा आशय इतकाच होता कीं "फ्रान्स आपले सरहद्दीचे संरक्षणाकरितां ६००,००० फौज जमवितो त्याबद्दल आह्मी कांहीं तक्रार करीत नाहीं. आह्मीही आपला समुद्रकिनारा सुरक्षित करितों त्याबद्दल आह्मांला दोष काय

ह्मणून! मला तुमचा तह आवडतो ह्मणून फ्रान्साच्या पायाखालीं मी आपला देश देण्यास तयार नाहीं." काब्डेननें येवढेंच उत्तर आगाऊ देऊन ठेविलें होतें कीं "तटबंदी तयार करावयाची हें वर्षोगणतीचें काम आहे आणि बादशाहानें हल्ला करावयाचें मनांत आणलें तर तो तुमच्या तटबंदीची वाट पाहणार नाहीं!" सारांश तटबंदी व्यर्थ होती. पाल्मर्स्टनच्या भाषणानें काब्डेनच्या अंगाची लाही झाली व एकदां त्यास वाटलें कीं देशीं जाऊन प्रधानमंडळाचा चांगला पाडाव करावा. प्रधानाच्या बोलण्यानें फ्रान्समध्येंही चळवळ उत्पन्न झाली. पाल्मर्स्टन इतका खवळण्याला मूळ मुद्दा येवढाच होता कीं कांहीं लबाड फ्रेंच लोक खोटे कागद करून इंग्लिश वर्तमानपत्रकर्त्यांस विकीत व लार्ड पाल्मर्स्टन त्यांच्यावर विश्वास ठेवी!! इंग्रजी प्रधानाच्या भाषणानें फ्रेंच संरक्षकास चेव येऊन ते लोकांस हिणवूं लागलेः "संरक्षक पद्धति नाहीं आणि उलटी लढाई गळ्यांत पडली. आतां रडा!" बादशाहा काब्डेन यास बोलला कीं 'पाल्मर्स्टन राजकारभारांतून निघेल तर बरें. कारण हा जर्मनी, आस्ट्रिया, इंग्लंड व फ्रान्स यांत कळागती लावणार!'

., तहाचें जाळें हळूं हळूं जमत चाललें होतें. तों मध्येंच एक विघ्न आलें. फ्रान्स देशांतील लोखंड वगैरे पदार्थांवरील नवीन जकात १ आक्टोबरपासून अमलांत यावयाची होती. जकातीच्या चौकशीचें काम १० सप्टेंबरला आटपलें. तेव्हां लार्ड कौलेकडे तें प्रकरण सहीकरितां गेलें. इंग्लंडाहून मंजुरी आल्याशिवाय सही करीत नाहीं ह्मणून त्यानें आग्रह धरिला. तेव्हां काब्डेननें सांगितलें "फ्रेंच प्रधान समक्ष असल्याशिवाय हें प्रकरण इंग्लंडांत समजायचें नाहीं, करितां तुह्मीच सही करा." इंग्लंडास तें प्रकरण गेलें. पण तेथील दिरंगाईमुळें लवकर उत्तर आलें नाहीं. काब्डेनचा जय होऊं नये अशी मुख्य प्रधानाचीच इच्छा! मग उत्तर कशाला लवकर येतें आहे? तेव्हां आक्टोबरला अमलांत येणाऱ्या कलमांवर सह्या करून बाकीचीं सर्व कच्चीं कलमें छापून काढावीं असें रोहर व काब्डेन यांचें बोलणें होऊन तें रोहरनें कौलेस समजाविलें. त्याबरोबर तो खुर्चीवरून ताडकर उठून मला याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं, तुह्मी वाटेल तें करा ह्मणून चालता झाला. शेवटीं बाकीच्या वकीलानीं सह्या केल्या व नवीन जकात आक्टोबरपासून अमलांत येईल असें केलें.

इंग्लंडांतून असा झालेला अपमान पाहून 'मी कशाला हें विकत श्राद्ध गळ्यांत घेतलें!' ह्मणून त्यास भारी पश्चात्ताप झाला. "मी सर्वाधिकारी वकील असूनही शून्याधिकारी झालों आहें याचा मला खेद वाटतो." असे अनेक वेळा त्याच्या तोंडून उद्गार निघाले. अशा हालअपेष्टेंत त्यानें कांहीं दिवस काढले. शेवटीं आक्टोबर १२ ला तहाच्या पहिल्या परिशिष्टावर सह्या झाल्या व नोव्हेंबर १६ ला हें सर्व श्रमदायक काम एकदाचें तडीस गेलें.

नोव्हेंबरामध्यें ब्राइट साहेब त्यास भेटावयास आला. ते दोघे मिळून बादशाहाकडे गेले. तेथें बादशाहानें 'आपल्याबद्दल इंग्लंडमध्यें गैरविश्वास आहे' या संबंधें तक्रार केली, व शांतता कायम ठेवणाऱ्या ब्राइटची पुष्कळ स्तुती केली. त्यानंतर दोघांनीं फ्रान्स देशांत येतांना लागणाऱ्या परवान्याबद्दल गोष्ट काढून सांगितलें कीं व्यापारिक तहानें दोन्ही देश स्नेही झाले, तेव्हां परवान्याची जरूर ठेऊं नये. बादशाहा बोलण्यामध्यें कुंठित होऊन ही सुधारणा करण्याची खटपट करितों असें त्यानें वचन दिलें!! शहाण्या व उदारधी सद्गृहस्थांच्या खासगी वकिलीचे सुद्धां असे चांगले परिणाम होतात. डिसेंबर १६ ला परवान्याची पद्धत रद्द झाली, व दिलेल्या हशिलांत जास्ती वजनाचे लखोटे पाठविण्याची सोय झाली. सारांश एका वर्षांत जकातीची सुधारणा, परवान्याची बंदी व पोस्टखात्याची सोय, इतक्या लोकोपयोगी गोष्टी करण्याचें श्रेय काब्डेननें घेतलें.

मागील हिंवाळ्यांत जो त्यास आजार झाला होता त्यानें त्यास सोडलें नव्हतें. अतिशय थंडी होऊन त्याचा घसा बसला. हिंवाळ्याची बाधा न व्हावी याकरितां आपली बायको व थोरली मुलगी घेऊन तो आल्जियर्स येथें गेला तो मेमहिन्यापर्यंत तेथेंच होता. या वकिलीच्या कामांत त्यास अतोनात श्रम झाले होते, ह्मणून पुनः असलें याज्ञिक पत्करायाचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. ह्या त्याच्या जकातसुधारणेबद्दल इंग्लंडांत चोहोंकडे लोक त्याची अतोनात स्तुति करूं लागले. एखादा मनुष्यमाऱ्या योद्धा परत गेला असता तर त्यास पदव्या व पेन्शन मिळालें असतें; पण कमिशनला ३,००० पौंडांचा खर्च झाला होता तो सुद्धां मोठ्या मारामारीनें सरकारांतून मंजूर झाला!!

आपल्यास पार्लमेंटाकडून कांहीं पैसे देण्याचें घाटत आहे असें ऐ-

कून ब्राइट यास ती सूचना ह्मणून पाडण्याबद्दल लिहिलें. त्यांत मुख्य कारण दिलें होतें तें हें कीं " मुख्य प्रधानाची वागणूक अतिशय घाणेरडी व तिरस्कारयोग्य आहे. मला इंग्लंडचा वकील ह्मणून पाठविलें असतांही मध्यें भिकार चाळे करून मला खालीं पहावयास लावलें; दुसरा एखादा असतां तर कामावर लाथ मारून निघून गेला असता, पण माझ्या मनांतून हा तह कर्तव्यच ह्मणून अपमान सोसून राहिलों. असल्या माणसाकडून मला एक दमडीसुद्धां नको. "

" राणीनें मेहेरबान होऊन तुह्मास बारोनेटची पदवी देण्याची मला परवानगी दिली आहे; कारण तुह्मीं केलेलें काम फार मोठें आहे, करितां ही पदवी आपण घ्यावी. " अशा अर्थाचें पाल्मर्स्टननें पत्र पाठविलें त्यास " राणीच्या मेहेरबानीबद्दल मी फार आभारी आहे. पण माझें मन मला पदवी घेण्याची परवानगी देत नाहीं. हा मनोविकाराचा भाग आहे, समजुतीचा नाहीं. मी केलेल्या कामापासून लोककल्याण झालेलें पाहिलें ह्मणजे माझें बक्षीस मला मिळालें " असें त्यानें उत्तर लिहिलें.

कर्तव्य हेंच ज्याचें बक्षीस त्यास ह्या मर्त्य बक्षीसाचा काय महिमा वाटणार ?

' मना चंदनाचे परी त्वां झिजावें '

ही ज्याची जपमाळ त्यास पदव्या काय होत ? काब्डेन पदव्याबद्दलच्या विचारांची शेखी मिरवित नसे. साधेपणानें आपलें आयुष्य घालवावें, आपल्या मनाचा सन्मान आपल्यास मिळेल असें वर्तन ठेवावें, येवढाच त्याचा बाणा व तो जन्मभर त्यानें चालविला.

---

# भाग पंधरावा.

## पत्रव्यवहार, वगैरे.

काब्डेन या व्यापारिक संधींत जरी गढून गेला होता तरी त्यानें आपला पत्रें लिहिण्याचा सपाटा कमी केला नाहीं. आपल्या घरीं (दे

शांत ) राजकीय प्रगमन कसें चाललें आहे व इतर देशांत काय व्यवस्था सुरू आहेत याकडे त्याचें पूर्ण लक्ष होतें. सर्वसत्तात्मक राज्यपद्धति व श्रमकारांचे हितानहित हे दोन ब्राइटचे आवडते विषय असत. तो बोलतांना श्रमकारी वर्गाचे वकीलपत्र घेऊन बोलत असे, व त्यांच्या हातांत राज्यसत्ता गेली असतां कर वगैरे बसविण्याची पद्धति शहाणपणाची होईल असें सांगत असे. हें मत काब्डेन यास सर्वथैवच पसंत नव्हतें. विद्यादानाशिवाय कामकरी लोकांच्या हातांत सत्ता जाणें हें अनिष्ट आहे अशा अर्थाचीं अनेक पत्रें ब्राइट यास लिहिलीं. टाइम्सपत्रांतील अनामक लेखकांनीं कल्पनासृष्टीमध्यें देशास शत्रू उत्पन्न करून सर्व लोकांस आपल्या बाजूस १८५९ सालीं वळविलें व संकट निवारणार्थ २६० लक्ष पौन्ड व्यर्थ पाण्यांत टाकिलें हें पाहून त्याचें अंतःकरण भंगलें. "दिलेल्या वेळांत पुष्कळ गोष्टी करण्याचें आपण मनांत आणिलें ही चुकी आहे. जसजसा मी वृद्ध होतों आहे तसतसा, मानवमहत्वाच्या संबंधानें माझा विश्वास नाहींसाच होत नाहीं खरा पण आमच्याच पिढींत कांहीं मोठा फेरफार होईल कीं नाहीं याची मला मोठी शंका वाटूं लागली आहे. धर्मसंस्था व कुलीनसंस्था ह्या तुमच्या आमच्या ह्यातींत जशा आहेत तशा खास राहणार हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. आपला औद्योगिक मध्यवर्गही बडे लोकांच्या वर्गांत शिरूं पाहतो आहे ही दुःखाची गोष्ट आहे.व दुःखतर गोष्टही आहे कीं हे सर्वजण युद्धराक्षसास उत्पन्न करून देशाचा पैसा मातींत टाकीत आहेत !" तथापि तो निराशेनें उदासीन होणारा नव्हता. इतरत्र कोठें लढाईची वार्ता नसली ह्मणजे लोक आपली स्वस्थिति सुधारण्याकडे वळतात, ह्याविषयीं अनुभवानें त्याची खातरी झाली होती. हिंदुस्थानचें राज्य इंग्लिश लोकांस करितां येणार नाहीं, लष्करी कायद्यानें तेथें अंमल करणें अशक्य आहे, आपले लोक हिंदुस्थानांत जाऊन बिघडणार असा ग्रह त्याचा जो जाहला होता तो जशाचा तसा कायम होता. बडे लोक पैसे मिळविण्याकरितां लढाया उत्पन्न करितात, तेव्हां त्या लोकांस 'पेन्शन' देऊन स्वस्थ घरीं बसवावें, व दारुगोळ्याचा खर्च व प्राणहानी हीं वांचवावीं अशी त्यानें चीनच्या लढाईच्या वेळेस युक्ति सुचविली होती पण ती पसंत कोणाला पडणार ? "मध्य वर्गाच्या लोकांनीं अतिश्रमदायी संक्षोभन केल्याशिवाय त्यांचें राजकीय प्रकरणांत एकही पाऊल पुढें पडलें नाहीं. त्याप्र-

माणेंच श्रमकारी लोकांनीं सटपट केली पाहिजे हें त्यांस जितकें लवकर समजेल तितकें बरें ! " शारीरिक शक्तिचा उपयोग करण्याचें मान जसें जसें कमी होत जाईल तसतसा नैतिक शक्तीचा प्रभाव जास्ती होत जातो, यावरून स्त्रीपुरुषांची योग्यता बरोबरीची होणार हें त्यानें कित्येक वेळां बोलून दाखविलें होतें.

मेच्या सहाव्या तारखेस तो पारिस शहरास येऊन १२ वीस बादशहास भेटला. व १६ वीला इंग्लंडकडे जाण्यास निघाला. रेलवे कंपनीनें त्याच्या ताब्यांत एक डबा दिला. त्यास मानपत्र वगैरे देण्याचा बेत डोव्हरच्या लोकांनीं केला होता पण तो साधला नाहीं, कारण तो दुसऱ्याच मार्गानें गेला. याप्रमाणें दोन देशास हितकारी असें मोठें कृत्य करून व नानालोकांचे व शहरांचे रीति रिवाज पाहून आमचा नायक पुनः स्वदेशास परत आला.

त्याची शक्ति कमी होत होती व बोलण्याचें सामर्थ्य तर अगदींच कमी झालें होतें. ' माझें काम मी केलें. ' असें तो समाधानपूर्वक ह्मणे- जास्ती काम केलें तर फार दिवस जगणार नाहीं असें जरी त्यास माहित होतें तरी " कांहीं काम न करितां पुष्कळ दिवस जगावें या पेक्षां खूप मेहनत करून लोककल्याण करावें, त्यांत मेलों तरी हरकत नाहीं " असें तो ह्मणूं लागला. असो ; त्याचा जिकडे तिकडे सत्कार झाला, *लार्डमेयरनें त्यास मेजवानी दिली. या अयनामध्यें तो कागदावरील जकात रद्द करावी या विषयावरच कायतं बोलला, पण सर्व मंडळींनीं त्याच्याकडे लक्ष दिलें, कारण त्यांस ठाऊक असें कीं योग्य वस्तुस्थिति दिसल्या शिवाय अगर सत्यकारण असल्या शिवाय तो कधीं बोलावयास उठावयाचाच नाहीं.

प्रख्यात वक्ता डिसरायली त्याच्या विषयीं ह्मणे :—" वादविवादाच्या कामांत कॉब्डेनचा हात धरणारा एखाद् दुसराच असेल. बोलण्यांत तो मुद्देशीर, आटपसर, चतुर, तर्कशास्त्रशुद्ध, व तीक्ष्ण बुद्धिचा असा आहे. "

१८६२ आंत अमेरिकेतील लढाई सुरू झाल्याबरोबर इंग्लंडात दोन तट झाले. वाद हा होताकीं अमेरिकन संभूयसंस्थेला ( Federation. ) दक्षिणसंस्थानांस ' तुह्मी गुलामाचा व्यापार व दास्यसंस्था ठेवितां

* शहरचा मुख्य अधिकारी.

उपयोगी नाहीं ' असें सांगतां येईल किंवा कसें. पहिल्या प्रथम काब्डेन याचा मनोघ दक्षिण प्रांतस्थ लोकांकडे वळला याचें कारण हें होतें कीं गुलाम ठेऊं नका असें सांगण्यांत उत्तर प्रांतीय लोकांनीं भांडणाचें मूळ उकरून काढलें होतें व शिवाय दास्यविक्रय बंद करण्यांत त्यांचा फायदाही होता. परंतु लवकरच ब्राइटनें त्याचें मन वळविलें. अमेरिकन संहतीचा ( Union ) नाश होणें ह्मणजे जगांतील स्वातंत्र्य देवीचा अंत करणें होय असें ब्राइटास चटदिशीं समजलें व त्याच्या नैसर्गिक स्वातंत्र्यच्छेला दास्यसंस्थाजन्य असह्य द्वेष मिळून त्यानें उत्तरस्थ प्रांतीयांचा पक्ष घेतला. ब्राइट व काब्डेनच्या उद्योगानें कोणासही या लढाईत पडतां आलें नाही. अमेरिकेचे राज्य बुडालें तर बरें, असें ह्मणणारीं पुष्कळ माणसें होतीं पण दासस्वातंत्र्य असा मुख्य मुद्दा निघाल्याबरोबर इंग्लिश लोकांचीं तोंडेच मिटलीं व ब्राइटास यश आलें. या लढाईत नवीनच प्रश्न उद्भवला तो हा कीं लढाई चालली असतां भांडणारीं राष्ट्रें व तटस्थ राष्ट्रें यांचे परस्पर हक्क कोणते? काब्डेनचें पुढील सर्व आयुष्य या दोन गोष्टी साध्य करण्याकडे लागलें. एक, लढाई सुरूं असतां व्यापारास धक्का पोंहचविणारे राष्ट्रांनियमांची सुधारणा व दुसरी, स्वदेश संरक्षणाच्या अनावश्यक उपायांकडे होणाऱ्या खर्चास कांहीं धरबंद घालण्याचे उपायाची योजना; पहिलीच्या संबंधानें त्यानें म्यांचेस्टर व्यापारी सभेचे अध्यक्षास एक सुरेख पत्र लिहिलें, त्यांत शत्रूंचा अगर तटस्थ लोकांचा खासगत माल समुद्रांत बुचाडूं नये, तटस्थ लोकांच्या जहाजांवर काय आहे तें तपासण्याचा कोणासही हक्क नसावा व शत्रूंच्या व्यापारिक बंदरांस कधींही वेढा पडूं नये, हे तीन मुद्दे स्पष्टपणानें व युक्तीनें सिद्ध केले होते. इंग्लंडच्या संबंधानें वरील तीन्ही गोष्टी फायदेशीर होत्या. याचवर्षी पाल्मर्स्टनच्या लढाउ पद्धतीवर त्यानें दणकून हल्ला केला. त्यास जय येण्याचीं चिन्हें नव्हती, ह्मणून त्यानें पुस्तकरूपानें तीन सालीं ( १८४८, १८५२, व १८६२ ) लढाईची कशी उठावणी झाली त्याची गोष्ट लिहून प्रसिद्ध केली तेव्हां लोकमतावर कांहीं परिणाम झाला आणि खर्चाच्या हौसेचें मान कमी झालें. तथापि पाल्मर्स्टन जिवंत होता तों पर्यंत त्याचें अगर ब्राइटचें कांहीं चाललें नाहीं. वेळेस एक गोष्ट करावयाची व ती सिद्धीस गेल्या शिवाय दुसरीस हात घालावयाचा नाहीं असा त्याला जन्माभ्यास असल्यामुळें ग्रोषम

सारख्या विशालबुद्धीच्या माणसानें दहापाच गोष्टी हातीं घेऊन एकही कडेला लावूं नये याचें त्यास वाईट वाटे. राष्ट्रांतनियम सुधारण्याच्या कामीं तो झपाटून लागला. व आपल्या मित्रांस व इतर लोकांस अनेक पत्रें या विषयावर लिहिलीं. "लढाईनें कधीं कार्यसिद्धि होईल, असें मला वाटत नाहीं. पालमर्स्टनचें गाणें निराळें आहे. देशास संकटांत नेल्यावर त्यांतून सुरक्षितपणानें त्यास निभावून आणण्यांत आपली चतुराई कितीं आहे, हें दाखविण्यामध्यें तो गुंतला आहे. त्याच्या ह्या विजातीय व घरबुडव्या राज्यपद्धतीचा मला आतां ओकारी आली आहे.

१८६४ त कालिफोर्निया येथील लोकांनीं काब्डेन व ब्राइट यांच्या नांवांच्या फळ्या करून त्या ३०० फूट उंच झाडावर, अक्षय्य राहाव्या ह्मणून ठेवल्या. परोपकार आणि सौजन्य यांचा महिमा स्वदेशांत स्वकालीं न समजला तरी इतरत्र व अन्यकालीं त्यांचे बक्षीस मिळतेंच मिळतें. चांगल्याचा परिणाम चांगला, हें काब्डेनचें वाक्य वाचक विसरले नसतीलच.

राजकीयमतामध्यें बदल करूं इच्छिणारा व तत्सिध्यर्थ खटपट करणारा काब्डेन याचें व इंग्लंडांतील प्रमुखपत्रांचें वैर असणें साहजिकच होतें. टाइम्सचा धंदा आपले ग्राहकांचे मताप्रमाणें निबंध ठोकून द्यावयाचे असा होता व काब्डेन लोकमत सुधारणारा होता, तेव्हां उभयतांचा उभा दावा होता त्यांत कांहीं नवल नाहीं. धान्याचा कायदा रद्द करतांना, ज्ञानावरील कर नाहींसा करतांना व फ्रान्सशीं व्यापारिक तह करितांना, काब्डेन यावर त्या पत्रांत प्रमुक्त टीका आली होती व त्यामुळें काब्डेन ही त्यापत्राशीं नेहमीं वांकून राही कधीं कोठें त्या पत्रांतील लेखकांस कसली सरकारी जागा मिळाली कीं तो ती हटकून बाहेर काढी. त्या पत्रकर्त्याला लोक मान देत असत ते त्यास खपत नसे. प्रत्येक लेखकानें आपलें नांव निबंधाच्या शेवटीं घालावें हें त्यास आतां अवश्य वाटूं लागलें. १८६३ मध्यें त्यानें आपल्या राचडेल येथील व्याख्यानांत जमीनीच्या कायद्याचा उल्लेख केला व ब्राइटनें ही तोच विषय प्रतिपादिला. दुसरे दिवशीं टाइम्समध्यें हे राचडेलचे दोन * ग्रकाय गरीब लोकांमध्यें असमाधान उत्पन्न करून

* रोमन भाऊ भाऊ, ह्यानीं बडे लोकांचीसत्ता मोडून लोकसत्ता व्हावी एतदर्थ खटपट केली व शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला !

जमीनीची लुटालुट करावी ह्मणून त्यांस उपदेश करीत आहेत अशा अर्थाचा एक खरमरीत लेख आला. काब्डेनच्या नजरेस तो लेख पडल्या बरोबर त्यानें सणसणीत उत्तर त्याच पत्रांत छापण्यास पाठविलें पण पत्रकर्त्यानें तें छापलें नाहीं. तेव्हां दोघांच्यामध्यें कांहीं दिवस कागदी लढाई होऊन अखेरीस तें प्रकरण मोठ्या मिनतवारीनें मिटलें. ह्या भांडणांत दोघांचाही थोडाबहुत दोष होता. असो, त्याचा परिणाम असा झाला कीं कांहीं पत्रांमध्यें लिहिणाराच्या सहीनिशी निबंध येऊं लागले व ज्ञानावरील कर निघाल्यामुळें वर्तमानपत्रें पुष्कळ होऊन सत्याचा पुष्कळच अंश बाहेर येऊं लागला.

१८६४ मध्यें जर्मनी व डेन्मार्क या दोन देशांत सुरू असलेल्या लढाईमध्यें इंग्लंडने कांहीं भाग घ्यावा असें मुख्य प्रधानाचें मत दिसल्याबरोबर, सर्व देशांत असा भयंकर गवगवा झाला व प्रतिनिधींची मनें इतकी खवळून गेलीं कीं प्रधानास आपलें मत पुढें आणण्याची छातीच झाली नाहीं. परराज्यांच्या कारभारांत हात न घालण्याची पद्धति एव्हांपासून सुरू झाली. सुमंत कचेरीचा पुरा हवजा, आणि पौराणिक सुमंतगिरीचा प्रतिनिधी पाल्मर्स्टन यानें घातलेल्या भयांचा खोटेपणा ह्यांवरून लोकांची खातरी झाली कीं काब्डेन पूर्वीपासून ह्मणत होता तेंच खरें आणि मांचेस्टर पंथ सत्यमार्गाचाआहे.प्रधान मंडळावर आणलेली विश्वासाभावाची सुचना पसंत झाली नाहीं तरी १८ च मनुष्यें आपल्या बाजूकडे जास्त आहेत असें पाहून लार्ड पाल्मर्स्टन यास वाटलें असेल कीं 'व्यापार स्वातंत्र्यानें जे अनेक फेरफार केले त्यांत शांतता ठेवणें अगर लढाई करणें याची सत्ता जुन्या जमीनदारकुलीन लोकांच्या हातांतून पूर्णत्वानें नाहींशीं झाली, हा एक महत्वाचा फेरफार केला.'

सरकारानें आपल्यास लागणारें सामान स्वतांच उत्पन्न करण्याची खटपट न करितां सर्वत्र सारखाच दर असणाऱ्या बाजारांतून विकत घ्यावें अशा अर्थाचें काब्डेन यानें एक मुद्देसूद भाषण केलें. 'यूरप आणि अमेरिका या खडांतील देशांच्या अंतःस्थ राजकीय कारभारांत जसें इंग्लिश लोक ढवळाढवळ करीत नाहींत त्याप्रमाणेच चीनच्या दरबारांत ही त्यांनीं हात घालूं नये व तरुण व्यापारी लोकांचा पक्ष घेऊन लढाईस तयार होऊं नये, असल्या भांडखोर पद्धतीनें देशावर अनिवार अनर्थ

परंपरा कोसळेल अशा तात्पर्याचें त्यानें, दुसरें भाषण या अयनामध्यें केलें. हें त्याचें हाउसमधील शेवटलें भाषण होतें. त्यानें सार्वजनिक कामांतून रजा घेतली असती तर तो ८।१० वर्षें जास्त जगला असता. पण लोक कल्याणाचें 'ज्यानें व्रत पत्करिलें त्यास प्रकृतीची काळजी अगर मृत्यूचें भय काय होत ?

# भाग सोळावा.

## मृत्यु.

नोव्हेंबर महिन्यांत तो वार्षिक भाषण करण्याकरितां राचडेल येथें गेला त्यावेळीं त्याची प्रकृति चांगलीशी नव्हती. प्रवासाच्या दगदगीनें व बोलण्याच्या श्रमानें त्याची प्रकृति अधिकच बिघडली. हजारो लोक त्याचें भाषण ऐकण्यास आले होते. भाषण फार वेळ झालें व ब्राइटनें तें भाषण उत्कृष्ट ह्मणून ठरविलें. 'जमीनीचा प्रश्न' हा बोलण्याचा मुख्य विषय होता. "जर मी पंचवीस तीस वर्षांचा असतों-दुर्दैवानें माझी उमर साठीच्या जवळ जवळ येत चालली-तर * ॲडम-स्मिथचें पुस्तक हातांत घेऊन मी 'कृषिकर्म स्वातंत्र्य' या विषयाचा पाठलाग केला असता. जसा 'व्यापार स्वातंत्र्या'च्या कटास जय मिळाला तसें या संक्षोभनासही यश आलें असतें. फक्त अर्थशास्त्राचीं सरळ तत्वें घेऊन मी भांडलों असतों. सारांश इनामदारांचें, कुळांचें, व रोजंदारांचें कल्याण करावयाचें आहे तर कौलाचें चिरस्थाइत्व अवश्य पाहिजे." आणखीही पुष्कळ विषय त्याच्या बोलण्यांत आले. ही दगदग आटपल्यावर २०० लिबरल पक्षाचे प्रमुख त्याची भेट घेण्यास आले, त्यांच्याशीं सौजन्यानें बोलण्यांत श्रम झाल्यानें त्यास फारच दगदग झाली. तेथून घरीं जातांना प्रवासांत प्रकृति जास्तच बिघडत चालली. घरीं आल्यावर त्यास कांहीं बरें वाटलें पण एकदा घडी बिघडली ती पुनः कसूची जमते ? दमा वाढला, आणि त्यांतच ताप ! त्या वर्षीं थंडी फारच कडक पडली होती त्यामुळें तर तो जास्तच

* अर्थशास्त्राचा जनक.

संगत जाऊं चालला. साधारण निवडणूक, १८६५ च्या जूनमध्यें होणार ह्मणून त्यानें ऐकिलें तेव्हां त्यास बरें वाटलें. आपण इतके अशक्त असतांना राजकार्यांत पडावें कीं नाहीं हें त्याचे मनांत घोळूं लागलें. तथापि राजकारणी पत्रें पाठविण्याचा त्याचा सपाटा सुरूं होताच. 'राष्ट्रीय खर्च' हा विषय त्यानें सोडून दिला नव्हता. त्या प्रश्नाची कांहीं तरी दाद लागावी याकरितां त्यानें ग्लॅडस्टनास दोन पत्रें लिहिलीं. निरनिराळ्या मतांच्या लोकांचे प्रतिनिधी हाउसमध्यें यावे याकरितां शहरांत जितक्या निराळ्या ठिकाणीं निवडणूक होईल तितकें चांगलें असें त्यानें ब्राइटास पत्रद्वारें कळविलें.

या वर्षी ग्लॅडस्टनानें त्यास खर्च तपासणाऱ्या मंडळीच्या अध्यक्षाची जागा देण्याचें मनांत आणलें व त्या प्रमाणें कॉब्डेनास लिहिलें. जाग्याचें वेतन २००० पौंड होतें. कामास हुषार मनुष्य पाहिजे होता. आणि तेथें फारशी दगदगही पडण्याचा संभव नव्हता. ग्लॅडस्टननें शेवटीं लिहिलें होतें कीं, "आपण २५ वर्षेंपर्यंत जीं मोठमोठालीं लोककार्यें केलीं त्यांच्या ऋणांतून ही जागा दिल्यानें मुक्त झालों असें आह्मीं समजत नाहीं, पण प्रधानमंडळाच्या हातांत अतिशय मोठी जागा आहे ती त्यांनीं आपल्यास अर्पण केली आहे त्यास या जागेचा आपण अंगिकार करावा." ह्या पत्राचा कॉब्डेननें दोन दिवस विचार केला व नंतर पुढील अर्थाचें पत्र लिहिलें. "वर्षभर सारखें नियमितपणानें श्रम करण्याची ताकद मला नाहीं. दम्यानें माझी प्रकृति वरचेवर बिघडते. त्याची लहर आल्यावर कोणतेंही काम होत नाहीं. हीं कारणें सयुक्तिक व पुरेशीं आहेत. पण जरी धट्टाकट्टा असतो तरी ही जागा मीं नाकारिली असती. माझे जमाखर्चाचे विचार आपल्यास ठाऊकच आहेत. लोकांच्या रक्तापासून निघालेला पैसा सरकारांत वाटेल तसा खर्च होतो. तो खर्च मंजूर करण्याची पाळी येणार! त्यापेक्षां मला तुरुंगांत जाणें बरें. या त्रासानें माझी प्रकृति लवकरच बेताल होईल. तेव्हां बाहेरच राहून खर्चावर टीका करण्याचें अप्रिय काम मला बरें वाटतें. आपल्या मायेच्या पत्रांबद्दल मी खरोखर आभारी आहे." ही जागा पत्करिली असती तर त्याचें आयुष्य कदाचित् जास्ती वाढलें असतें खरें, पण त्यानें केलें तें बरोबर केलें. अमेरिकन कानड्याचा प्रश्न हाउस पुढें आला तेव्हां त्यानें आपलें मत एका अमेरिकन मित्रास कळविलें तें असें:—

होतें:-" ज्या राजकीय तंतूनें आपले दोन्ही समाज एकत्र झाले आहेत तो तंतु जितका लवकर तुटेल तितकें दोघांसही चांगलें आहे. तुमचा व आमचा व्यापारिक व मित्रत्वाचा संबंध असावा, इतर संबंध ठेवणें निव्वळ ढोंगाचें असून उभय पक्षांस तो संकटपरंपरेमध्यें नेऊन ठेवणारा होईल. तुह्मांस स्वातंत्र्य देण्याचें आम्हीं कबूल केलेंच आहे. आतां तें केव्हां द्यावयाचें येवढाच कायतो प्रश्न आहे."

याच प्रश्नावर आपण हाउसमध्यें बोलावें अशी त्यास अनावर इच्छा उत्पन्न झाली. वाइट हवा पडली असतांही तो लंडनास गेला. बरोबर बायको व दुसरी कन्या आल्या होत्या. तेथें पोहोंचल्यावर त्यानें कांहीं पत्रें लिहिलीं. पण हें काम आटपतें तों त्यास दम्याचा झटका येऊन तो निपचित् पडला. एक आठवडाभर तो तसाच अजारी होता. नंतर तो जरा बरा झाला व त्यास आपल्या एक दोन मित्रांशीं बोलण्याची परवानगी मिळाली. पण हें बरेंपण फारच थोडा वेळ टिकलें. शेवटीं दोन दिवस त्याची बायको व मुलगी सारख्या त्याच्या अंथरूणापाशीं बसल्या होत्या. आशा व भय या दोन विकारांनीं त्यांचें मन सारखें क्षुब्ध होत होतें. पुढें विकोप होऊन श्वासमार्ग कुंठित झाला तेव्हां सर्वांचा धीर सुटला. त्यानें मोठ्या कष्टानें आपलें मृत्युपत्र लिहिलें. पहिल्या तारखेस संध्याकाळीं ब्राइट आला होता पण त्यास आंत जाऊं दिलें नाहीं. पुनः दुसरे दिवशीं सकाळीं तो आला, तेव्हां काब्डेन बरा होण्याची सर्व आशा अस्तंगत झाली होती ह्मणून त्यास आंत जाऊं दिलें. जार्जमोफॉट बिछान्याजवळ होताच. आपल्या स्नेह्याचा अंत समय जवळ येत चालला हें त्यांस समजलें. सकाळच्या प्रहरची प्रार्थना करण्याकरितां बोलावणाऱ्या सेंटमार्टिन देवालयांतील घंटेचा अवाज होऊं लागला तेव्हां मृत्यूची छाया त्याच्या तोंडावर पसरली आणि लवकरच त्या उत्साहपूर्ण, आणि धैर्यवान लोकबंधूचा आत्मा शांतपणानें या जडलोकांतून निघून गेला. वाचक हो! काब्डेनचें नांव माहीत होतें तेथें तेथें अश्रूंचे पूर लोटले हें सांगावयास पाहिजे काय?

सन १८६५ च्या चवथ्या मार्चला ब्राइट त्याच्या भेटीस गेला होता. दोघेही शेतांत पुष्कळ वेळ हिंडून परत येत होते. वाटेनें काब्डेन यास आपल्या मृतपुत्राची आठवण होऊन त्यानें ब्राइटला तो पुरला

होता ती सुंदर जागा दाखविली आणि ह्मणाला "माझा गरीब मुल-गा येथें निजला आहे व मीही त्याच्या भेटीस लवकरच जाणार आहें." हा प्रसंग फारच लवकर ओढवला. दुसऱ्या एप्रिललाच त्याचा आत्मा आपलें मर्त्य कवच फोडून चालता झाला. तो पंचत्व पावला त्याच दिवशीं चमत्कारिक दैवयोगानें अमेरिकेंतील दास्योत्तेजक मंडळींचा शतधा पराजय करून प्रेसिडेंट लिंकन आपल्या विजयी अनुचरांसह रिचमंड शहरीं प्रवेश करिता झाला !

त्याचें ६१ वें वर्ष पुरें होण्यास दोनच महिने अवकाश होता. १८५७ मध्यें आपल्या एका मित्राबरोबर तो फिरतां फिरतां *सेंटपालच्या पूरण भूमिकेंत गेला होता, तेव्हां तेथें त्यानें सहज ह्मटलें कीं "तुमचें नांव येथें केव्हां तरी खोदलें जाणार." "शांतंपापं" काब्डेन ह्मणाला. "मला या वीरांच्या संगतींत कधींही झोंप यावयाची नाहीं."! असो आपल्या मुलाच्या शेजारींच तो शेवटची झोंप घेण्यास निजला. त्याचें आयुश्चरित्र ह्मणजे स्वत्यागाची एक लांब मालिकाच आहे, तेव्हां त्यास स्मशानांत पोहोंचविण्यास हजारो लोक गेले यांत आश्चर्य मानण्याजोगें काय आहे ?

वर सांगितल्याप्रमाणें त्याच्या मरणानें सर्व इंग्लंडास अतिशय शोक झाला. यूरोपांत व इतरत्र जेव्हां त्याच्या मरणाची वार्ता समजली तेव्हां अतिशय मोठा पुरुष पृथ्वी सोडून गेला असें सर्वांस वाटलें. कारण युद्धकालाचा निरास करणाऱ्या विश्वशांततेच्या दिवसांचें भावी आगमन त्यानें जवळ आणलें होतें. प्रसिद्धीस आणणारें कुल अगर संपत्ति यांचें बिलकुल साहाय्य नसतांना, आपल्या देशाची इमानी सेवा करण्या-करितां स्वसामर्थ्यानें व खऱ्या देशभक्तिनेंच तो केवळ पुढें आला, एकापेक्षां एक वरचढ अशीं कामें त्याच्या हातून पार पडलीं, आपल्या प्रमेयांच्या वरिष्ट आणि श्रेष्ट अशा योजना अमलांत आणण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त झालें, चांगले किंवा वाईट दिवस आले असतांनाही त्या पर्वतप्रायधैर्यानें आपले मतांचा अवलंब सोडला नाहीं, मोठमोठ्या मुत्सद्यांस आपल्या पादारविंदीं आणून त्यांस राजकार्यामध्यें उपदेश केला, परस्परांमध्यें सद्भाव उत्पन्न करून शांततेच्या सुकालामध्यें राष्ट्रांस एकजीवि करण्याची खटपट केली, आणि आपल्यास ज्या पदव्या मिळत

* येथें प्रसिद्ध पुरुषांच्या देहास पुरतात

होत्या त्यांचा अव्हेर करून सत्यसिद्धि हेंच परब्रह्म आहे, त्यास इतर बक्षीस नको, असें जगास उदाहरण दाखविलें. शाबास या धन्यपुरुषाची! स्वकार्य मोहास्तव ज्या मध्यें कधींही कमीपणा आला नाहीं, विसंगतवर्तणुकीमुळें ज्याची दिशा फिरली नाहीं, दोषामुळें ज्यावर डाग पडला नाहीं, आणि सत्य आणि न्याय जगाचे मालक आहेत तोंपर्यंत जें विसरलें जाणार नाहीं, असें आपलें लोककल्याणकारी आयुष्य परमेश्वराचे हवाली करून टाकिलें; आणि आपल्या जाण्यानें सर्वांस दुःखसागरांत लोटून दिलें.

दुसरे दिवशीं सोमवारीं हाऊसमध्यें चोहींकडे दुःखमय देखावा दिसत होता. प्रधान मंडळ आलें तेव्हां चोहींकडे कुजबुज चालली होती ती बंद पडली. ब्राइट शेजारीं त्याचा नेहमींचा मित्र नाहीं असें पाहून लोक गहिंवरून गेले. देशाचा किती भयंकर तोटा झाला हें सांगत असतां पांढरेशुभ्र केस झालेल्या व खिन्नवदन असलेल्या पालमर्स्टनाचा कंठ सद्गदित होऊन त्यानें अगदीं हळू परंतु करुणपूर्ण स्वरानें काब्डेनचे गुण वर्णन केले. डिसरायली मोठ्या उदारांतःकरणानें ह्मणाला, "काब्डेनच्या चरित्राचें व स्वभावाचें भविष्यकाळीं खरें परीक्षण होईल, तेव्हां त्याविषयीं असें ह्मणतील कीं, केवळ मध्यवर्गांतून जे मुत्सद्दी उदयास आले त्या सर्वांत हा श्रेष्ट होता, या हाऊसमध्यें तो एक अमोलरत्न होता आणि इंग्लंडाचें तर अविनाशि सन्मानस्थान होता."

ब्राइटनें दोन वेळां बोलण्याची खटपट केली, पण त्याच्या तोंडांतून शब्दच निघेना. शेवटीं स्खलित स्वरानें परंतु आपल्या नैसर्गिक रसवंती वाणीनें ह्मणाला "महाराज, माझ्यानें आतां एक अक्षर सुद्धां बोलवत नाहीं. या रात्रीं काब्डेनविषयींचे जे उद्गार निघाले ते ऐकून मी आपला फार आभारी आहें. (—येथें त्यास हुंदका येऊन त्याच्यानें कांहीं वेळ बोलवेना—) धैर्याचें स्थान असूनही पुष्पापेक्षां मृदु ज्याचें अंतःकरण असा माझा परमस्नेही इहलोक सोडून परलोकास कालच गेल्यामुळें शोकविकारांनीं आकुल झालेल्या माझ्या हृदयांत केवढा अग्नि पेटला आहे त्याचें वर्णन करण्याची आज माझी छाती नाहीं. (—येथेंही कांहीं वेळ त्यास स्तब्ध राहावें लागलें—) माझ्या पवित्र स्नेह्याच्या आयुश्चरित्रापासून काय शिक्षण शिकावयाचें हें सांगण्याचा मला लवकरच प्रसंग

येईल, तेव्हां मी काय बोलावयाचें तें बोलेन. महाराज, आतां येवढेंच सांगतों कीं २० वर्षेपर्यंत त्याचा अतिशय ऋणानुबंध ठेऊन व बंधुप्रेमानें वागून सुद्धां मी त्याच्यावर किती प्रीति करीत होतों, तें मला समजलें नाहीं. तो गेल्यावर माझें किती अमोलिक स्नेहस्थान गेलें याची खरी किंमत आतां कळूं लागली आहे ! "

आयुष्याचा तिसराप्रहर लागण्यापूर्वीच काब्डेनचा अवतार संपल्यामुळें त्याच्या अंतःकरणांतील लोककल्याणेच्छेची उग्र वृद्धापकाळानें थंड झाली नव्हती, अथवा त्याच्या वाक्चातुर्याचा जोम व सौंदर्य यांचाही लय अस्पष्ट भाषेमध्यें झाला नव्हता. त्याचें कोमलांतःकरण व हितकारी स्नेहभाव हीं आमरणांत जशींच्या तशींच राहिलीं. धर्मावर त्याचा विश्वास असून प्रार्थनेनें सद्गति मिळते अशी त्याची खातरी होती हें मागें सांगितलेंच आहे. सारांश ' वसुधैव कुटुंबकं ' हा त्याच्या स्वभावाचा पाया होता. मनुष्यवर्ग हा बंधुत्वाच्या नात्यानें बद्ध आहे अशा कल्पनेच्या विरुद्ध भांडणाऱ्या, व व्यापारिक रेशमी बंधनानें सर्व राष्ट्रें एकवट करून टाकण्याचा ओघ प्रतिरोध करणाऱ्या, आणि राष्ट्रसमुदाय लढाईंत कधींही गुंतूं नये अशा शिक्षण पद्धतीच्या विरुद्ध आक्रोश करणाऱ्या, मुत्सद्यांच्या पौराणिक पद्धतीच्या भर अमदानींत कार्यभाग उरकावयाचा असतांही काब्डेनचें वर्तन व भाषण विश्वकुटुंब्याप्रमाणें असे हें केवढें आश्चर्य आहे !

सातव्या एप्रिलला पूरणविधी झाला. हाउसचे प्रतिनिधी, राजघराण्यांतील कांहीं वडे लोक, इंग्लंड मधील पुष्कळ शहरांच्या तर्फे आलेले नियुक्तप्रेषित हे आघाडीस चालले होते. सुमारें अर्धा मैल पर्यंत लोकांचा थवा पसरला होता, सर्व व्यवस्था साधेपणाची होती. १॥ मैल गेल्यावर ते पूरणभूमिकेंत आले. प्रेतावरील चादर काब्डेनच्या अत्यंत जिवलग मित्रांपैकीं चारा असामींनीं धारण केली होती, त्यांत, ब्राइट, ग्लाडस्टन, व्हिलियर्स, विल्सन, इत्यादि होते. तेथें गेल्यावर आचार्यांनीं और्ध्वदेहिक प्रार्थना केली. सर्वांस आंत जागा नसल्यामुळें पुष्कळ लोकांस बाहेर उभें राहावें लागलें. सूर्यप्रकाश लख्ख पडला होता, त्यानें मात्र थोडके व खिन्न वदन झालेल्या दुःखी मनुष्यांस उत्तेजन दिलें. प्रेत आंत ठेवण्याचे वेळीं अश्रूंनीं ज्याचे वदनास स्नान होत आहे, असा

ब्राइट, अतिशय फिकट चेहरा होऊन नेत्र झांकलेले आहेत असा ग्लाडस्टन व इतर मंडळी जवळ उभी होती. त्या वेळीं त्यांस झालेलें दुःखवर्णन करण्यास शब्दांमध्यें सामर्थ्यच नाहीं. तें फक्त कल्पनेच्या साह्यानेंच समजणार ! ज्या स्मशानभूमींत त्यास पुरलें, तेथें हल्लीं हजारो लोक जाऊन काब्डेनच्या कबरेचें दर्शन घेऊन येतात. या महाप्रतापी व मनुष्य हितकारी श्रेष्ठ पुरुषाचें 'सर्व पृथ्वी' हेंच कबरस्थान होय हें खरें, परंतु केवळ स्थलविशेष माहात्म्यानें अनंत लोक त्या स्थानिक कबरस्थानांत यात्रानिमित्तानें जातात हें जनसमजुतीस योग्यच आहे.

सन १८७७ मध्यें ब्राडफर्ड येथें काब्डेनचा पुतळा उघडतांना ब्राइट ह्मणाला:—

"ज्ञानदुर्ग थोडे चढताति जन । कर्तव्यसाधन मार्ग सर्वां ॥ १ ॥

काब्डेनच्या आयुष्य चरित्राची ज्यांस थोडी तरी माहिती आहे, त्या लोकांस कबूल केलें पाहिजे कीं त्यास जो रास्त कर्तव्यमार्ग दिसला त्या मार्गानें तो नेहमीं गेला आहे. या वाटेनें जातांना त्याचें पाऊल कधींही आडखळलें नाहीं, किंवा रस्त्या आड गेलें नाहीं. आपल्यापुढें हा जो त्याच्यासारखा हुबेहुब पुतळा आहे त्यावर एकही डाग नसून तो पांढरा स्वच्छ आहे, कारण काब्डेनचें नांव आणि वर्तणूक हीं धुतल्या तांदुळाप्रमाणें स्वच्छच होतीं. या प्रांतामध्यें सन्मार्गानें जाऊं इच्छिणारे काब्डेनचे पुष्कळ शिष्ये तयार होतील अशी माझी खातरी आहे. त्यांस मला हें सांगितलेंच पाहिजे कीं आपण आज जो हा पुतळा उभा केला आहे, किंवा जी मूर्ति तुमच्या हृदयांत नेहमीं वास करीत आहे, हीं काब्डेननें जो स्वतः आपला कीर्तिरूप पुतळा बांधून ठेवला आहे त्यापुढें कांहींच नाहींत. तो पुतळा भव्य आहे. मित्रहो देशामध्यें अशी कोणतीही झोंपडी नाहीं कीं त्या सत्पुरुषाच्या श्रमामुळें जेथें जास्ती सुख वाढलें नाहीं, व जेथील लोकांस चिरस्थाई नोकरी, अधिक पगार व जास्त महत्वाचें स्वातंत्र्य मिळालें नाहीं. हेंच त्याचें चिरस्थाई स्मारक होय. ह्या इष्ट हेतूंची व कार्यसिद्धि करण्याकरितां ह्या महादृढानुसरणी पुरुषानें आपली आयुर्ज्योत विझेपावेतों अखंड श्रम केले. हा महात्मा तर गेलाच. पण त्याची वर्तणूक, त्याचीं कृत्यें, त्याचें चरित्र, आणि त्याचें उदाहरण हीं लोकांच्या हृत्पटिकेवर खोदलेलीं आहेत. रिचर्ड काब्डेन यानें आ-

पल्या देशबंधूंस उद्योगस्वातंत्र्य पूर्णत्वानें मिळावें, आणि ह्या सद्वस्तुंबरोबर विपुलता व शांतता मिळावी एतदर्थं सर्व जन्मभर खटपट केली असें, इंग्रजी भाषेंत जोंपर्यंत इंग्रजी मुत्सद्याचें चरित्र लिहिलें जाईल तोंपर्यंत सर्वत्र मोठ्या भक्तीनें ह्मणत राहतील.

"ज्याच्या आकस्मिक मरणानें पडलेली मोकळी जागा भरून येणें कठीण आहे, त्या रिचर्ड कॉब्डेन याच्या मर्त्य आयुष्यांतील पुण्य चरित्रासंबंधें जें काय लिहिलें आहे, दक्षिण युरोपांत वाढणाऱ्या द्राक्षवेलीस जशीं अमोल व सुवर्णाचीं फळें येतात त्याप्रमाणें ज्याच्या श्रमाचें मौल्यवान फळ प्रत्येक घरामध्यें दिसत आहे, त्याच्या श्रमासंबंधीं जें काय ह्मटलें आहे, सार्वजनिक सन्मानास पात्र करणाऱ्या व मत्सराचा नाश करणाऱ्या त्याच्या चाकरीची जी स्तुति झाली आहे, स्नेह्यांनीं, कृतज्ञ लोकांनीं अगर दुःखित लोकांनीं जे अश्रु ढाळले आहेत, ते लेख, तीं व्याख्यानें ती स्तुति, ते अश्रु ह्या सर्वांवरून कॉब्डेन महात्म्याविषयीं जी पूज्यबुद्धि उत्पन्न होते, ती, ८००० पौंडच काय ती त्याची सर्व मालमिळकत तो मेला त्यावेळीं होती हें वाचून, अगदीं फिक्की पडून जाते, व त्याच्या निर्लोभत्वाची खातरी होते.

आपल्यास त्याच्या आयुष्याची, काम करण्यास उत्तजन देणाऱ्या त्याच्या हेतूंची, त्यास इष्ट असणाऱ्या वस्तूंची, त्यावर आलेल्या अडचणींची, बहुतेकांशीं त्यास युद्ध करावें लागलें त्या प्रसंगांची व श्रमांची नित्य टोंचणी ज्याकरितां सहन केली त्या चिरकाळ टिकणाऱ्या उदार कार्योत्साहाची,-या एकंदर सर्वांची गुरुकिल्ली एका गोष्टींत सांपडणार आहे. त्याच्या स्वाधीन जें वजन होतें, हातांत जी सत्ता होती, त्याच्या पायांशीं जी अमर्याद संपत्ति लोळत होती, त्या सर्वांस पाठमोरें होऊन कॉब्डेनसारखा परमार्थ साधणें व जी इभ्रत त्यास प्राप्त झाली त्याचा देशकार्य करण्याकडे उपयोग करणें, हीच त्याची जुडिबुट्टी हीच एक गोष्ट अत्यंत मोठी व वैभवदायक होय" असें त्या वेळचा एक लेखक ह्मणतो.

आस्ट्रेलियांतील कायदे करणाऱ्या मंडळींनीं आपल्या ताब्यांतील एका प्रांतास कॉब्डेनचें नांव दिलें हीच खरी कृतज्ञता!

याप्रमाणें हातीं घेतलेल्या लेखाचा शेवट झाला ! व आजपर्यंत कॉब्डे-नचें जें नित्य नामस्मरण होत असे तें आज संपलें! ज्याच्या पुण्यश्लोक चरित्रानें कोणत्याही प्रसंगीं मनास विश्रांती व उपदेश मिळतो, त्या माहात्म्याच्या स्वत्याग मालिकेच्या गुंफनाचा आज शेवट झाला हें पाहून फारच वाईट वाटतें. ययाति, हरिश्चंद्र, कर्ण, शिबि इत्यादि पौराणिक राजपुरुषांच्या स्वत्यागनामक आख्यानाचें पारायण केलें असतां, जें मनास समाधान होतें, तें या पुण्यप्रतापि महानराच्या चरित्रपठनावरून झालेल्या महानंदापुढें काय होय ! मनुष्यामध्यें उदारधी, कर्तव्यसामर्थ्य, व इच्छा हीं असलीं ह्मणजे त्यांपासून मनुष्यकोटीचें केवढें हित उत्पन्न होतें व लोकसेवा करणाऱ्या महासाधूंच्या अवतारापासून देशविशेष, किंबहुना सर्व जग कशी धन्यता पावतें, याची साक्ष कॉब्डेनचें आयुश्चरित्र अनंत कालपर्यंत देत राहील, व लोकांस त्यापासून सदैव उपदेश मिळेल अशी इच्छा करून हें चरित्र संपवितों.

## उपसंहार.

—*—

कॉब्डेनसारख्या महासंताच्या स्वभावाचें पृथक्करण करण्याची जरूरी नाहीं. त्याची इच्छा आणि इष्ट हेतु स्वच्छ आणि प्रत्यक्ष असत. राज्यपद्धतीमध्यें फेरफार करूं इच्छिणाऱ्यांस अवश्य लागणारा पहिला गुण जो व्यवहारचातुर्य तो त्याच्यामध्यें पूर्णत्वानें वास करित होता तरी त्याचे बेत, त्याची सहृदयता आणि व्यवहारसूत्रें उघड असून पारदर्शक होतीं; त्यामध्यें कपटपटुत्व बिलकुल नव्हतें. त्याच्या आंगांत काम सिद्धीस नेण्याकरितां लागणारें अवश्य शहाणपण पुष्कळ होतें. त्यास कधींमधीं मौनव्रत धरावें लागे पण लोकांचें रंजन व्हावें ह्मणून अगर त्यांस फशी पाडावें ह्मणून हें मूकव्रत तो चालवीत नव्हता, त्याचा उगम मेहमीं सद्वासनें मध्यें असे.

असल्या उघड आणि विस्तारशील स्वभावानें त्यानें मित्रांची खरी प्रीति संपादन केली यांत कांहीं आश्चर्य नाहीं. लोकप्रिय होण्यावरच ज्यांच्या सर्व जीवित्वाचा भर असतो, असले लोक गृहस्थाश्रमांतल्या सुखाची परवा करीत नाहींत. पण कॉब्डेन आपल्या घरच्या मनुष्याशीं

ममतेनें, आस्थेनें, सहनशीलतेनें व उदार मनानें वागत असे. मोठमोठीं भाषणें त्यानें तयार केलीं, अनेक छोटेखानी पुस्तकें लिहिलीं हें सर्व म लांबाळाच्या दंग्यांत! आपल्या मुलांच्या मनोरंजक क्रीडेमध्यें का करणें त्यास आवडे. आनंदी व सुखदायक स्वभावामुळें जो कोणी मनु त्याकडे जाई त्यास तो मित्राप्रमाणें वागवी. पैशाच्या गोष्टी बोलणा- व्यापारी मारवाडी किंवा विद्येनें उन्मत्त झालेला पंडित, हे दोघे ही त्याच्या मोहक भाषणानें गार होऊन जात असत. त्यास कटुशब्द माहीत नव्हते, हें खरी आहे तरी कोणी खोटें काम करूं लागला असतां तो त्याचा मुलाजा बिलकुल ठेवीत नसे.

त्याचें सर्व आयुष्य लोकमत सुधारण्यांत गेलें. पाल्मर्स्टनशीं युद्ध करितांना तो एकाकी होता तरी त्यानें आपला अभेद्य उत्साह सोडला नाहीं हें वाचकांस माहीत आहेच. पण हें युद्ध तो कर्तव्य होतें ह्मणूनच करी. स्वभावतां त्यास लोकांचीं मनें दुखविणें अगदीं आवडत नसे. बोलतांना तो आपला एकही मुद्दा न सोडतां मोठ्या धैर्यानें बोले, पण त्यांत व्यक्तीस दुखविण्याचा कधींही प्रयत्न नसे. "जसजसा माझा अनुभव वाढत जातो आहे, तसतशी माझी लोकांच्या सत्यप्रियतेविषयीं जास्ती खात्री होत आहे." या सन्मानसूचक वाक्यावरून त्याचा निष्पाप व उदार स्वभाव व्यक्त होतो.

त्याचें संभाषण नेहमीं साधें, सयुक्तिक, अनलंकारिक असें असे तरी तें उत्साहजनक आणि विस्तारयोग्य असे. धर्माविषयीं तो कधींही बोलत नसे. आपल्या गांवीं असला ह्मणजे तो देवळांत जाई. त्याचा वर्तनक्रम साधा व बातचेताचा असे. खाण्यापिण्यांत तो चिकित्सखोर नसे. राजकारण हेंच त्याचें मोठें व्यसन आणि सर्व आवडी निवडींचा भर तिकडेच! पण तो स्वपक्षाचा विजय पाहणारा नव्हता. त्याचा राजकारण याचा अर्थ राजनीतिच्या मोठमोठ्या गोष्टी होय, पार्लमेंटस्थ सभासदांचे डावपेंच नव्हे. जगाची आर्थिक व सामाजिक प्रगमनासंबंधें काय खबर आहे येवढ्याचकरितां तो वर्तमानपत्रें व पुस्तकें वाची. तो वाची त्याचा हेतु हा असे कीं त्या वाचनानें आपल्या वर्तनास सोपेपणा कसा आणावयाचा. जें उपयोगी आहे त्याकरितां—मग तें केवढें काम असेना—श्रम करण्याचा त्यास येवढासा सुद्धां कंटाळा नव्हता.

र्वजनिक कामें समजण्याची ज्यास येवढी अक्कल होती त्यानें आ-धंद्यांत सपशेल फसलें जावें हें लोकांस समजत नाहीं. फडणी-कामांत *पिट व †बर्क येवढे पटाईत होतेना पण त्यांच्या स्थितीची कोण तारंबळ होती? यास उत्तर येवढेंच कीं सार्वज-निकांत त्यांचें मन अतिशय गढून गेलें होतें; त्यामुळें त्यांच्या मनांत घरगुती कार्याची योग्य व्यवस्था करावयाची हा विचार येण्यास सवडच नव्हती!

देशामध्यें संपत्तिविपुलता झाली, व जास्त समतेनें तिचें विभाजन झालें ह्मणजे सामाजिक सुधारणा होईल असें त्याचें मत होतें असें लोक समजतात व त्याचे आक्षेपक ह्मणतात कीं "आमच्या समाजास अत्यंतावश्यक गोष्टी ह्मटल्या ह्मणजे ज्ञानसूर्याचा उजेड, आणि वरिष्ट प्रतीची गति ह्या होत. व्यापार स्वातंत्र्यामुळें देशांत वाढलेल्या संपत्तीनें उत्पन्न होणाऱ्या उन्मादांचा प्रति दिवशीं श्रेष्ट पदास जाणाऱ्या नीतीच्या हातून पराजय होणार नाहीं, ह्मणून या अहर्निशी वाढत जाणाऱ्या संपत्तीनें घोर अनर्थ मात्र प्राप्त होतील." काब्डेन यास हें कळलें नव्हतें असें नाहीं एका मित्रास त्यानें पत्र लिहिलें, त्यांत तो ह्मणतो,' संपत्तिवैपुल्य, स्वातंत्र्य व शांतता ह्यांचा भार सहन करण्याची शक्ति लोकांस आली नाहीं. पुढील सुधारणेच्या काळांत लोकांस ही शक्ति येईल.' १८५३ व १८५७ ह्या सालीं वरील वाक्याचा त्यास दुःखद अनुभव आला होता. त्यानें संसारयात्रेस आरंभ करितांना जो हेतु धारण केला होता, तो सिद्धीस जात नाहीं असें त्याचें त्यास वाटलेंच होतें. अजून सुद्धां त्याच्या ह्मण-ण्याप्रमाणें व्यवस्था होत नाहीं. तथापि सर्वांस पोटभर खावयास मिळून आपला धंदा करण्यास मोकळीक असावी, ह्याचा त्यानें जो सत्पाया घातला तो सुमुहूर्तावर घातला व लोकनीति सुधारण्याची योग्य खट-पट केली असें प्रत्येकास कबूल करावें लागेल.

---

* १८ शतकाचे शेवटील कालांतील मुख्य प्रधान.

† प्रसिद्ध वक्ता, मुत्सदी, व ग्रंथकार. वारन हेस्टिंग्स हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल ह्याचा बर्कनें कसा पिच्छा पुरविला हें वाचकांस ठाऊक आहेच.

सारांश संपत्तीची विपुलता, बुद्धीची प्रखरता आणि नीतिश तेजस्विता, ह्या तीन्ही गोष्टी जागरूकपणानें असल्याशिवाय सर्व सुधारणा होणें अशक्य आहे. असो, काब्डेनास ही गोष्ट कळलें किंवा कळून त्याबद्दल त्यानें कांहीं खटपट केली नाहीं, ह्मणून आपण हंसतां कामाचें नाहीं. स्वदेशांत सुखानें राहतां यावें, अशी काची इच्छा असते. त्या इच्छेचें साफल्य होण्याकरितां सुखदायक व्यापा स्वस्त करावयास पाहिजे होते, व त्या जिनसास हा स्वस्तपणा वि स्वातंत्र्याशिवाय येणारा नव्हता; ह्मणून त्यानें व्यापारस्वातंत्र्याचें कर्त घेऊन तो पूर्णपणें सिद्धीस नेण्याचें श्रेय घेतलें, व आपलें बजाविलें. त्या काळांत जी गोष्ट होणें शक्य होती तिची अगोदर यथास्थित ओळख करून घेऊन तिच्या पाठीमागें तो चोहें त त्याचा खरा मुत्सद्दीपणा दिसून येतो आणि व्यापारस्वातंत्र्यातें हें जारीनें पसरलें असतां प्राणघेणी लढाई अस्तंगत होऊं लागेल ओळखून त्याकरितां अपरंपार खटपट केली याबद्दल तो स्तुतीस होतो. सारांश, कालवशात् प्राप्त होणाऱ्या आर्थिक ( पैशासंबंधीं ) व सामाजिक शक्तिसंघांच्या लाटांचा ओघ अगोदरच ध्यानांत आणून या नूतनोघांस आपला समाज योग्य होईल असें त्यास स्वरूप देण्याच्या तरीस लागतात, तेच मुत्सद्दी शहाणे व स्तुतीस योग्य असे होत. स्वरूप बदलण्याच्या कामांत या वीरांस कांहीं काळपर्यंत अज्ञ जनांहून निंदा करून घ्यावी लागते; व या स्वरूपांतरानें ज्यांचा तोटा होत असतो त्यांच्याशीं विलक्षण जोराचा कलहही करावा लागतो. पण ही निंदा व कलहजन्य वैषम्य निजधामास जाऊन सरतेवटीं सत्याचाच जय होतो सत्यपक्षानें भांडणाऱ्या मुत्सद्यांचें नांव अजरामर होऊन बसतें. आमचा चरित्रनायक वरील कोटींतीलच एक महात्मा होय आणि ह्मणूनच आह्मांस खातरी आहे कीं त्याची विमल कीर्ति 'यावच्चंद्रदिवाकरौ' लोकांस 'समाजाची खरी सेवा करा' असा उपदेश करीत राहील.

आतां सरतेवटीं काब्डेनचा इहलोकींचा अवतार संपल्यानंतर फ्रान्स देशांत किती वाईट वाटलें या संबंधानें एकदोन उतारे देऊन हें चरित्र आटपितों.

फ्रान्स देशांतील पार्लमेंटमध्यें ह्या वेळचे उपाध्यक्ष ह्मणाले:

"रिचर्ड काब्डेन याच्या मृत्यूनें इंग्लंडवरच भयंकर प्रसंग गुदरला असें नाहीं तर त्याच्या अकालीं मृत्यूनें फ्रान्सचें किंबहुना सर्व मनुष्य-जातीचें सर्वस्वी नुकसान केलें."

फ्रेंच सुमंतानें पुढील खलीता इंग्लंडसरकारास लिहिला.

"इंग्लिश खाडीच्या उत्तरतीरीं (इंग्लंडमध्यें) काब्डेनच्या अकालीं अतएव अत्यंत दुःखास्पद देहावसानाबद्दल जी खेदजन्य अनुकंपा, व [illegible]गामी शोक उत्पन्न झाला आहे त्याला फ्रान्सच काय पण सर्व सु-[illegible]रलेलें जग वांटेकरी होण्याला इच्छीत आहे. ज्या योगानें राष्ट्रीय सी-[illegible]हींशा होतात व परस्[illegible]रधील मत्सरभावाचा अस्त होतो अशा [illegible]गामी तत्वांचा व समजुतींचा तो पहिल्या पदवीचा अवतार होय [illegible] येथील समजूत आहे. तो स्वदेशाभिमानी असून त्यामध्यें इंग्रजी स-[illegible] पूर्णत्वानें वास करीत होते हें जितकें खरें आहे, तितकेंच त्यानें आ-पल्या सभोंवतालचें देशकालवर्तमान जाणून केवळ त्यांच्या शिस्तीनें तो आचरण करीत होता हें ही खरें आहे. एकोणिसाव्या शतकांत कोणते संबंध ठेविले असतां अनेक राष्ट्रांचा व अन्योन्य देशीयांचा फायदा होईल हें त्यास जसें समजलें होतें तसें कोणासच समजलें नव्हतें. सारांश काब्डेन हा सार्वराष्ट्रीय मनुष्य होता. तेव्हां त्याच्या मरणानें सर्वत्र दुःख होणें स्वाभाविकच आहे."